
● पुणे, शुक्रवार, १९ जुलै २०२४ ● RASHTRA SANCHAR-Vol-3-issue 221 ● वर्ष ३ रे, अंक २२१ ● किंमत ₹ ६ ● पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com BEYOND THE NEWS



पालिका आरोग्य विभाग चर्चेच्या विळख्यात P3



पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय कुस्तीपटू चमकतील... P12

## धुमसते पुणे : नागरिकांना केली जातेय दमदाटी

# खाऊगल्ल्यांमध्ये गुंडगिरीचे वारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यामधील लब्ध प्रतिष्ठितांचे बार, पब, उच्चभ्रू रेस्टॉरंट येथून चालणारे गुन्हेगारी आणि अवैध व्यवसायांचे बिंग बाहेर पडत असताना आता पुण्यातील सर्वसामान्य लोकांच्या आवडीचे ठिकाण असलेल्या काही खाऊ गल्ल्यांमध्येदेखील गुन्हेगारी फोफावत असल्याचे दिसत आहे. विशेषत: येथे बेकायदेशीरपणे वसलेल्या काही हॉटेल चालकांकडूनच सर्वसामान्य पुणेकरांना गुंडगिरीचा सामना करावा लागत आहे. शहरात अलीकडेच खाऊ गल्लीमध्ये झालेल्या प्रकारांवरून हे वास्तव समोर येत आहे.

पुण्यामध्ये सिंहगड रोड, बाणेर, पौड फाटा अशा अनेक ठिकाणी खाऊ गल्ल्या आहेत. यातील बऱ्याचशा खाऊ गल्ल्यातील दुकाने अवैधच आहेत. अनेक वर्षांपासून या खाऊ गल्ल्यांमध्ये पुणेकर जातात आणि आपली संध्याकाळ आनंदी करतात; परंतु काही खाऊ गल्ल्यांमधील काही दुकानदारांची अरेरावी आणि गुंडगिरी आता या सर्वसामान्य पुणेकरांना धमकवण्या इतपत पुढे गेली आहे.

शहरातील माजी नगरसेवक, आमदार यांच्यासह स्थानिक राजकीय पदाधिकाऱ्यांनी भविष्याचा कोणताही विचार न करता अनेकांना वशिल्याने दिलेले खाद्यपदार्थांचे स्टॉल गुंडगिरीचे अड्डे बनत आहेत. आधीच बेफाम वेगाने वाहने चालवल्याने होणाऱ्या दुर्घटना, किरकोळ कारणावरून पडणारे खून, अवैध मादक पदार्थ वापर आणि

» पान ११ वर



(संग्रहित छायाचित्र)

> खाऊगल्ल्यांमध्ये सिलेंडरचा वापर करणे, जास्त जागा व्यापणे, स्टॉल भाड्याने देणे, अस्वच्छता करणे अशा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जात आहे. ही कारवाई आणखी तीव्र केली जाईल.
>
> — माधव जगताप, उपायुक्त, अतिक्रमण विभाग



### रस्त्यावरच भटारखाने

रस्त्यावर अन्न शिजविण्याची परवानगी नसतानाही अनेकांचे पावभाजी, अंडाभुर्जी, चायनीज यासह अन्य पदार्थांचे स्टॉल आहेत. त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. प्रशासनासह पथारी संघटनांकडूनही याकडे दुर्लक्ष केले जात आहे.

### येथे आहेत खाऊगल्ल्या

- मध्यवर्ती पेठा
- शिवाजीनगर
- डेक्कन जिमखाना परिसर
- पुणे स्टेशन परिसर
- कर्वेनगर

## » At a Glance

### 'भाजपचे आमदार पवार गटात येणार'

**नागपूर :** भाजपचे काही आमदार राष्ट्रवादी शरद पवार गटात येण्यासाठी इच्छुक असल्याचा दावा राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी गुरुवारी केला. अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड विभागाचे प्रमुख अजित गव्हाणे यांचा संदर्भ देत ते म्हणाले, की आमच्या पक्षात आजी-माजी नगरसेवकांच्या रूपाने आगमन सुरू झाले आहे.

### भारतीय क्रू मेंबरचा ओमानमध्ये मृत्यू

**नवी दिल्ली :** ओमानच्या किनारपट्टीवर तेल टँकरच्या एका भारतीय क्रू मेंबरचा मृत्यू झाला आहे. भारतीय नौदलाने सांगितले की, मालवाहू जहाजाच्या सदस्यांचा शोध घेण्यासाठी बचाव कार्य करत असताना आयएनएस तेगने आठ भारतीय आणि एका श्रीलंकन नागरिकाची सुटका केली.

### कोटा प्रणाली विरोधात आंदोलन

**कोलकाता :** बांगलादेशातील कोटा प्रणालीच्या विरोधात निदर्शने करतानाच सात विद्यार्थ्यांच्या मृत्यूबद्दल शोक व्यक्त करून ऑल इंडिया डेमोक्रॅटिक स्टुडंट्स ऑर्गनायझेशनच्या सुमारे १०० कार्यकर्त्यांनी पार्क सर्कस येथे निदर्शने केली. विद्यार्थी आंदोलकांवर सुरक्षा दलांनी केलेल्या कथित कारवाईविरोधात कार्यकर्ते फलक घेऊन उभे होते.

### लखनौ एक्स्प्रेस वेवर अपघातात तीन ठार

**उन्नाव :** गुरुवारी आग्रा-लखनौ एक्स्प्रेस वेवर कार उलटल्याने तीन जण ठार झाले आणि अनेक जखमी झाले. संध्याकाळी ६ वाजता दिल्लीहून अयोध्येकडे जाणाऱ्या एका कारचे नियंत्रण सुटल्याने ती उलटली. या घटनेत वैभव पांडे, मनोज सिंग आणि अरविंद सिंग यांचा जागीच मृत्यू झाला.



## शहरनिहाय निकाल जाहीर करण्याचे आदेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नीट-यूजी फुटी प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी महत्त्वपूर्ण सुनावणी झाली. सरन्यायाधीशांनी एनटीएला उमेदवारांची ओळख लपवून शहर आणि केंद्रनिहाय निकाल जाहीर करण्याचे आदेश दिले. एनटीएने त्यांच्या अधिकृत वेबसाईटवर हे निकाल प्रसिद्ध करावेत, असे निर्देश सरन्यायाधीशांनी दिले. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पार्दीवाला व न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने सर्व याचिकांवर आज निकाल दिला.

प्रत्येक परीक्षा केंद्राचा स्वतंत्र निकाल जाहीर करावा, असे आदेश देत सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी या प्रकरणाची पुढील सुनावणी सोमवारी होईल, असेही सांगितले.

## पवार गटाचा रविवारी विजयी संकल्प मेळावा

# पिंपरीत शुभस्य शीघ्रम्

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शरद पवार गटात प्रवेश केल्यामुळे पिंपरीत पवार गट आक्रमक झाला असून, जराही वेळ न घालवता विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू करण्यात आली आहे. यामुळे आधीच बचावात्मक पवित्रा घ्यावा लागलेल्या अजित पवार गटाची आणखी पिछेहाट होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत शहर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शनिवारी (दि. २०) पिंपरी येथील नवमहाराष्ट्र महाविद्यालयाच्या मैदानावर दुपारी चार वाजता विजयी संकल्प



मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी होतील, असा विश्वास शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी व्यक्त केला.

या मेळाव्याची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेला पक्षाचे नेते अजित गव्हाणे, महिला शहराध्यक्षा ज्योती निंबाळकर, युवक अध्यक्ष इम्रान शेख, माजी नगरसेवक विनायक रणसुभे, पंकज भालेकर, धनंजय भालेकर, विशाल जाधव आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी एमआयएमचे अध्यक्ष धम्मराज साळवे हे देखील उपस्थित होते. त्यांनी एमआयएमच्या शहराध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून पवार गटात प्रवेश केला आहे.

कामठे म्हणाले, की आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी शहरात ज्येष्ठ नेते शरद पवार मेळाव्यासाठी येत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. शहराच्या विकासात शरद पवार यांचे मोठे योगदान आहे. पवार यांना भक्कम साथ देणा-या ८५ जुन्या सहकाऱ्यांचा, पक्षाच्या नवनिर्वाचित आठ खासदारांचा सन्मान यावेळी केला जाणार आहे.

» पान ११ वर

## रुळावरून रेल्वे घसरून चार ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लखनौ :** उत्तर प्रदेशमधील गोंडा येथे चंदीगड-दिब्रूगड एक्सप्रेसचे काही डबे रुळावरून घसरून मोठी दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत चार प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तसेच अनेक प्रवासी जखमी झाले असून त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे.

ही घटना गोंडापासून ३० किलोमीटर दूर झिलाही रेल्वेस्टेशनजवळ घडली. प्रशासनाने बचाव पथके गोंडाकडे रवाना केली आहेत. तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अधिकाऱ्यांना तत्काळ घटनास्थळी पोहोचून मदतकार्य सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. या अपघातामुळे गोरखपूर ते लखनौ डाऊन दिशेच्या रेल्वे गाड्या खोळंबल्या आहेत.

## दोन दहशतवाद्यांना कुपवाडामध्ये कंठस्नान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** कुपवाडामध्ये लष्कराला मोठे यश मिळाले आहे. घुसखोरीच्या प्रयत्नात असलेल्या दोन पाकिस्तानी दहशतवाद्यांना लष्कराच्या पथकाने कंठस्नान घातले. या दहशतवाद्यांची ओळख अद्याप समोर आलेली नाही. डोडा येथे दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत लष्कराचे चार जवान (एका कॅप्टनसह) शहीद झाले होते. त्यानंतर, लष्कराने येथे मोठी मोहीम हाती घेतली आहे.

कुपवाडा येथील कारवाईची माहिती देताना, भारतीय लष्कराच्या चिनार कॉर्प्सने एक्सवर लिहिले की, कुपवाडातील केरन सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेवर आज दोन दहशतवाद्यांचा खात्मा करून, घुसखोरीचा प्रयत्न यशस्वीरित्या थांबविण्यात आला आहे. या भागात लष्कराची शोधमोहीम सुरू आहे.

उत्तर काश्मीरच्या कुपवाडा जिल्ह्यातील केरन सेक्टरमध्ये घुसखोरी करणारे सुरक्षा दल आणि पाकिस्तानी दहशतवाद्यांमध्ये जोरदार चकमक झाली. लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितले की, लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी राष्ट्रीय रायफल्स आणि कुपवाडा पोलिसांसह सुरक्षा दलांवर गोळीबार केल्यानंतर चकमक सुरू झाली. तासनतास चाललेल्या चकमकीत दोन दहशतवादी ठार झाले.



## घाटमाथ्याला ऑरेंज अलर्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात पुढील ४८ तासात घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढेल. त्यामुळे या परिसरात हवामानशास्त्र विभागाने ऑरेंज अलर्ट दिला आहे. राज्यात येत्या तीन ते चार दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर कोकण, गोवा, रत्नागिरी जिल्ह्यात अतिजोरदार पावसाची शक्यता असल्याने या जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे. किनाऱ्यालगत असलेल्या कमी दाबाचा पट्टा दक्षिण गुजरात ते उत्तर केरळपर्यंत आहे.

**पुणे तापमान**

| २६.०° | २३.०° | ८७% |
|---|---|---|
| कमाल | किमान | आर्द्रता |

# देशाच्या भवितव्याबद्दल रा. स्व. संघ आश्वस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गुमला, झारखंड :** देशाच्या भवितव्याबद्दल आपल्याला कधीही काळजी वाटत नाही; कारण अनेक लोक एकत्रितपणे देशाच्या भल्यासाठी काम करत आहेत, अशी ग्वाही सरसंघचालक मोहन भागवत यांनी गुरुवारी येथे दिली. सरसंघचालकांच्या या विश्वासपूर्ण विधानामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाजपच्या पाठीशी उभा ठाकल्याचे दिसून आले आहे.

लोकसभा निवडणुकीच्या आधी भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी भाजपला आता संघाची गरज राहिली नसल्याचे मत व्यक्त केले होते. त्यामुळे संघाच्या स्वयंसेवकांमध्ये काहीशी अस्वस्थता निर्माण झाली होती. त्याचा परिपाक म्हणून भाजपतर्फे अलीकडच्या काळात करण्यात आलेल्या राजनीतीलाही संघाच्या मुखपत्रांतून आक्षेप घेण्यात आला होता. महाराष्ट्रात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला सोबत घेण्याचा निर्णय निष्ठावंत स्वयंसेवकांना रुचला नव्हता. यामुळे भाजप व संघात अंतर पडेल की काय, अशी शंका व्यक्त केली जाऊ लागली होती; मात्र आता दस्तुरखुद्द सरसंघचालकांनीच देशाच्या भवितव्याबद्दल काळजी वाटत नसल्याचे सांगून केंद्रातील सरकारच्या कामाविषयी समाधान व्यक्त केल्याचे मानले जात आहे. विकास भारतीने आयोजित केलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत भागवत बोलत होते.

## करिअरच्या रक्षणासाठी...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा




» **पुणे :** नीट २०२४ घोटाळ्याच्या विरोधात परीक्षा पुन्हा घ्यावी या प्रमुख मागणीसह विविध पेपरफुटीच्या विरोधात पुणे शहर युवक काँग्रेसतर्फे बालगंधर्व चौकात आंदोलन करण्यात आले.

## युवक काँग्रेसतर्फे नीट प्रकरणी आंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नीट २०२४ घोटाळ्याच्या विरोधात परीक्षा पुन्हा घ्यावी या प्रमुख मागणीसह विविध पेपरफुटीच्या विरोधात पुणे शहर युवक काँग्रेसतर्फे सरकारच्या विरोधात घोषणा देऊन आंदोलन करण्यात आले. यावेळी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अजय चिकारा, एहसान खान, डॉक्टर वैष्णवी किराड, अक्षय जैन, पुणे शहराध्यक्ष सौरभ अमराळे, उमेश पवार, कौस्तुभ नवले, सुजन मीना प्रथमेश आबनावे, रोहन सुरवसे, आनंद दुबे आधी उपस्थित होते.

या वेळी चीकारा म्हणाले, सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळायचा जो खेळ सुरू केला आहे तो थांबवावा आणि भारताच्या उज्ज्वल भविष्याला स्वतःच्या हाताने अंधारात ढकलू नये.

# जरांगे विरोधक बारस्कर यांची गाडी जाळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** मराठा आरक्षणासाठीचे आंदोलन कर्ते मनोज जरांगे यांचे एकेकाळचे सहकारी परंतु सध्या जरांगे यांचे कट्टर विरोधक अजय बारस्कर महाराज हे आषाढी यात्रेसाठी पंढरपुरात आले असता त्यांच्या गाडीला पेटवून दिल्याची घटना घडली आहे.

दिनांक १६ रोजी रात्री त्यांच्या गाडीची चौकशी करून त्या गाडीला आग लावल्याची घटना घडली असल्याचा प्रकार समोर आला. बारस्कर महाराज हे प्रतिवर्षीचे आषाढीचे वारकरी आहेत. यंदाही ते आषाढी यात्रेला आले असता मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्याचवेळी ते जेथे मुक्काम करतात त्या फडामध्ये काही लोकांनी येऊन त्यांच्याबद्दल चौकशी केली. गावाच्या बाहेर ६५ एकर परिसरात गाड्या पार्किंग कराव्या



लागतात. तेथेच महाराजांची गाडी होती ती गाडी हेरुन काही लोकांनी तिला आग लावली. महाराजांनी पत्रकार परिषद घेऊन जरांगे यांच्या समर्थकांवर थेट आरोप केले. त्यांनी सांगितले की, माझे आणि जरांगे यांचे मतभेद झाल्यानंतर त्यांनी माझ्यावर अनेक प्रकारे चुकीच्या गोष्टी करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्याच काही समर्थकांनी हा प्रकार केला आहे, असा मला संशय आहे. जरांगे यांच्या समर्थकांची कृती ही समर्थनीय नाही. आता हे सर्व प्रकरण हिंसाचाराकडे जात आहे आणि त्यासाठी पंढरीची वारी निवडावी यासाठी दुसरे दुर्दैव नाही.

## महाडजवळ अटक; दोन दिवसांची पोलीस कोठडी

# मनोरमा खेडकर अखेर जाळ्यात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे/रायगड :** सनदी अधिकारी निवडीत कथितरीत्या बोगस प्रमाणपत्रे सादर केल्याने परिविक्षाधीन कालावधी रद्द झाल्याची नामुष्की ओढवलेल्या पूजा खेडकरांच्या माता-पित्याचेही एक एक कारनामे उघड होऊ लागले आणि दोघेही रातोरात पसार झाले; परंतु अखेर पुणे ग्रामीण पोलिसांनी मनोरमा खेडकर यांना महाडमध्ये गाठलेच. गुरुवारी पहाटे त्यांना ताब्यात घेऊन न्यायालयासमोर उभे करण्यात आले.

न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. आधी फक्त शेतकऱ्यांना धमकावल्याचा गुन्हा दाखल असलेल्या खेडकरांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचे कलम ३०७ वाढवण्यात आले आहे. यामुळे एकूणच खेडकर कुटुंब अडचणींच्या गर्तेत सापडले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

» पान ११ वर

### खेडकर दोनदा निलंबित

● दिलीप खेडकर यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून दोनदा निलंबित करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यांची मालमत्ता त्यांच्या उत्पन्नापेक्षा जास्त असल्याच्या तक्रारीनंतर पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्याच्याविरुद्ध चौकशी सुरू केली आहे. खेडकर यांना २०१८ आणि २०२० मध्ये निलंबनाला सामोरे जावे लागले होते. २०१५ मध्ये खेडकर यांच्या विरोधात तीनशे छोट्या व्यावसायिकांनी अनावश्यक त्रास आणि खंडणीची तक्रार केली होती. २०१८ मध्ये खेडकर कोल्हापूरला प्रादेशिक अधिकारी म्हणून कार्यरत असताना स्थानिक सॉ मिल आणि लाकूड व्यापारी असोसिएशनने त्यांच्याविरुद्ध पोलिस तक्रार दाखल केली. त्यांनी त्यांचा वीज आणि पाणीपुरवठा पूर्ववत करण्यासाठी लाच मागितल्याचा आरोप केला होता. खेडकर हे एकावेळी सहा ते सात महिने परवानगीशिवाय गैरहजर होते, असेही एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. २०१९ च्या तक्रारीत खेडकर यांनी एका कंपनीकडून २० लाखांची मागणी केल्याचा आरोप होता.

#रा

## प्रवेश नाकारणाऱ्या संस्थांना चंद्रकांत पाटलांचा इशारा

# अन्यथा संस्थांची मान्यता होणार रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** राज्यात ६४२ अभ्यासक्रमांसाठी मुलींना शंभर टक्के शुल्कमाफ असणार आहे. शिक्षण संस्थांना सरकारकडून सप्टेंबरमध्ये प्रवेशाची रक्कम दिली जाणार आहे. त्यामुळे संस्थाचालकांनीही थोडे थांबावे. शुल्क भरल्याशिवाय मुलींना प्रवेश नाकारणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात येणार असल्याचा स्पष्ट इशारा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि पुण्यातील शासकीय तंत्रनिकेतन यांच्यातर्फे उभारण्यात आलेल्या पहिल्या रोबोटिक्स आणि ऑटोमेशन या विषयातील उत्कृष्टता केंद्राचे (एक्सलन्स सेंटर) उद्‌घाटन पाटील यांच्या हस्ते झाले.

त्या वेळी ते बोलत होते. आमदार सिद्धार्थ शिरोळे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक डॉ. प्रमोद नाईक, विभागीय सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव, सचिव डॉ. महेंद्र चितलांगे, प्राचार्य डॉ. राजेंद्र पाटील या वेळी उपस्थित होते. या कार्यक्रमावेळी बहुउद्देशीय संगणक प्रयोगशाळेचेही उद्‌घाटन करण्यात आले.

अशा पालकांनी माझ्याशी संपर्क करा, मी तातडीने शिक्षणसंस्थांना सूचना दिल्या जातील. कोणतेही शुल्क न घेता मुलींना प्रवेश द्यायचे आहेत. त्याचे शुल्क सप्टेंबरपर्यंत शिक्षण संस्थांच्या खात्यावर जमा केले जाणार आहेत. त्यामुळे शिक्षण संस्थांना थोडी प्रतीक्षा करावी लागेल. त्यानंतर शुल्क न भरल्याने प्रवेश नाकारत असतील, तर संस्थांचे मान्यता रद्द करण्यात येणार आहे.

उच्च शिक्षणाची खाते हाती घेतल्यानंतर राज्यातील विद्यार्थिसंख्या ३३ लाख होती. "स्कूल कनेक्ट'सारखे उपक्रम राबवून, रात्रंदिवस काम करून मुले-मुले मिळून विद्यार्थिसंख्या ४३ लाख झाली. दहा लाख विद्यार्थी वाढले. ही संख्या ५० लाखांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. मुलींच्या शुल्कमाफीमुळे ही संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, असेही चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

> पॉलिटेक्निकसह सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांना शिक्षण शुल्कमाफीचा क्रांतिकारक निर्णय घेतला आहे. आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सर्व मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत असेल. परंतु सध्या काही पालकांकडून शुल्क भरल्याशिवाय मुलींना प्रवेश नाकारत असल्याचे तक्रारी येत होत्या." — **चंद्रकांत पाटील**
> उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

## शरद पवार यांच्या हस्ते प्रदान

# सीए डॉ. एस. बी. झावरे यांना 'जीवनगौरव पुरस्कार'



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशाचे माजी केंद्रीय मंत्री, ज्येष्ठ नेते खासदार पद्मभूषण शरद पवार यांच्या हस्ते ज्येष्ठ सनदी लेखापाल डॉ. एस. बी. झावरे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. सनदी लेखापाल म्हणून तसेच शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रात पाच दशकांहून अधिक काळ भरीव योगदान दिल्याबद्दल सीए (डॉ.) एस. बी. झावरे यांना सन्मानित करण्यात आले. शरद पवार यांनी मुक्तकंठाने झावरे यांच्या कार्याचे कौतुक केले.

सीए (डॉ.) एस. बी. झावरे गौरव समितीच्या वतीने बुधवारी (दि. १७) मोदी बागेतील शरद पवार यांच्या निवासस्थानी छोटेखानी कार्यक्रमात पवार यांच्या हस्ते झावरे यांना मानपत्र प्रदान करण्यात आले. प्रसंगी गौरव समितीचे उपाध्यक्ष सीए धनंजय जोशी, सचिव सीए यशवंत कासार, खजिनदार सीए अभिषेक धामणे यांच्यासह ॲड. अविनाश आव्हाड, डॉ. एम. एस. जाधव, सीए सर्वेश जोशी, सीए जी. एस. थोरात, सीए काशिनाथ पाठारे, सीए किसन गारगोटे, सीए सुहास गार्दी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## Selected




### खानापूरच्या इंग्लिश मिडीयम प्री-प्रायमरी स्कूलची बालदिंडी उत्साहात

**खानापूर :** वारकऱ्यांच्या वेशभूषेतील लहान मुले, पालखी मिरवणूक आणि विठू नामाचा गजर अशा वातावरणात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या इंग्लिश मिडीयम प्री-प्रायमरी स्कूल खानापूर या शाळेत दिंडी सोहळा रंगला.विठ्ठल-रखुमाई,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम व अन्य संतांसारख्या वेशभूषा केलेली विद्यार्थी दिंडीचे आकर्षण ठरले. दिंडीमध्ये नर्सरी ते सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पताका व टाळ, डोक्यावर तुळशी वृंदावन घेवून विठ्ठल भक्तीत रममाण झालेल्या विद्यार्थ्यांनी साऱ्यांचे लक्ष वेधले, विभाग प्रमुख अंजना जावळकर, शिक्षिका प्रियंका जावळकर (ग्रामपंचायत सदस्य),अपेक्षा मोरे तसेच आशा निबांळकर व रूपाली हनमघर यांनी पालखीचे नियोजन केले. महात्मा गांधी विद्यालयाचे माजी प्रभारी मुख्याध्यापक व ज्येष्ठ शिक्षक शशिकांत जाधव व जेष्ठ शिक्षिका ज्योत्स्ना गुरव यांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली. प्रशाला परिसर हा भक्तीमय वातावरणाने निनादला. याप्रसंगी चंद्रकांत यादव, किरण जाधव सह पालकांनीही या वारीमध्ये सहभाग घेतला. खाऊ वाटप जेष्ठ शिक्षक शशिकांत जाधव व पालक चंद्रकांत यादव यांचेतर्फे खाऊ वाटप करण्यात आले. मुख्याध्यापक शिवाजी म्हेत्रे यांनी शुभेच्छा दिल्या.

### राष्ट्रसंचार नवा निर्णय

# अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने संशोधन संस्थेची स्थापना

## बार्टीनंतर आता आर्टी



**पुणे :** राज्यातील मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेच्या धर्तीवर मातंग समाजासाठी अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) कंपनी नोंदणी कायदा २०१३ अंतर्गत नियम ८ नुसार स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्या बाबतचा सामाजिक न्याय विभागाचा दिनांक १६ जुलै २०२४ शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

मंत्रिमंडळाच्या दिनांक ११ जुलै २०२४ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जाती अंतर्गत मातंग व तत्सम जाती (मांग, मातंग, मिनीमादीग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग- गारोडी, मांग-गारूडी, मादगी, मादिगा) या समाजाच्या विकासाकरिता आर्टी संस्था स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संस्थेकरीता व्यवस्थापकीय संचालक व निबंधक अशा दोन पदांना देखील मान्यता देण्यात आली आहे. सदर संस्थेअंतर्गत संशोधन विभाग, प्रशिक्षण विभाग, योजना विभाग, विस्तार व सेवा विभाग, लेखा विभाग आस्थापना विभाग हे कार्यरत असतील. या संस्थेचे कामकाज सद्यस्थितीत भाड्याच्या इमारतीत करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. चिरागनगर, घाटकोपर, मुंबई येथील अण्णा भाऊ साठे यांचे राष्ट्रीय स्मारक पूर्ण झाल्यानंतर स्मारकाच्या इमारतीतून संस्थेचे कामकाज चालेल. तसेच संस्थेला आवश्यक मनुष्यबळ हे सेवा करार पद्धतीने बाह्य यंत्रणेद्वारे तसेच अतिरिक्त पदभार देऊन उपलब्ध करून घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

## आम्ही छोटे वारकरी ..

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**विठ्ठल विठ्ठल ! :** आषाढी एकादशीनिमित्त भवानी पेठेतील बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत सर्व विद्यार्थी वारकरी वेशभूषा करून पालखी सोहळ्यात सहभागी झाले होते.

## बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत

# आषाढीनिमित्त विठूनामाचा गजर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** भवानी पेठेतील बापूसाहेब पवार प्राथमिक शाळेत मंगळवारी विठ्ठल नामाची शाळा भरली. सर्व विद्यार्थी वारकरी वेशभूषा करून पालखी सोहळ्यात सहभागी झाले. विठ्ठल रुख्मिणीच्या मूर्तीचे पूजन मुख्याध्यापिका हेमलता कुऱ्हाडे व छोट्या वारकऱ्यांनी केले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम, संत एकनाथ, संत जनाबाई यांच्या पालख्या घेऊन मुलांची दिंडी काढण्यात आली.

दिंडीत विठ्ठल रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, मुक्ताबाई यांच्या वेशभूषेत आलेल्या विद्यार्थ्यांचे पूजन करून छोटे वारकरी तुळशी वृंदावन डोक्यावर घेऊन टाळ व पताका घेऊन सहभागी झाले. गोल रिंगण करण्यात आले. छोट्या वारकऱ्यांच्या नामघोषाने शाळेचा परिसर विठ्ठलमय झाला. वारकऱ्यांनी फुगड्या घातल्या. विठ्ठल भक्तीवर आधारित भजन व गाणी घेण्यात आली. पालखीची माहिती कसबे बाईनी यांनी सांगितले. मुख्याध्यापिका हेमलता कुऱ्हाडे यांनी पालखी सोहळ्याचे मार्गदर्शन केले.

### राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त दिग्दर्शक विवेक वाघ यांचे निधन



**पुणे :** ज्येष्ठ नाट्यकर्मी, निर्माता, दिग्दर्शक विवेक वाघ यांचे खासगी रुग्णालयात आकस्मिक निधन झाले. त्यांच्या माहितीपटाला २०२१ मध्ये राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले होते. विवेक वाघ दीर्घकाळापासून पुण्यातील रंगभूमी, चित्रपटसृष्टीशी संबंधित होते. व्यावसायिक नाट्यनिर्मितीसह निर्मितीसह चेकमेट या चित्रपटाचे कार्यकारी निर्माते होते. तसेच माझं भिरंभिरं, सिद्धांत अशा चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. काही वर्षांपूर्वी गाजलेल्या जोशी-अभ्यंकर खून खटल्यावर आधारित जक्कल या शोध माहितीपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. या माहितीपटावर आधारित जक्कल वेब मालिकाही त्यांनी केली आहे. त्याशिवाय कोकणातील कातळशिल्पांवर आधारित 'स्टोन अँड एज' हा माहितीपट त्यांनी नुकताच केला आहे. वाघ यांनी मरणोत्तर अवयवदान करण्याचा निर्णय घेतला होता.

### विद्यापीठात अण्णाभाऊ साठे यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन



**पुणे :** आपल्या धारदार लेखणीतून असंख्य कथा, कादंबऱ्या, पोवाडा, लावण्या, वग लिहिणारे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावित्रीबाई फुले विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाच्या जयकर ज्ञानस्त्रोत केंद्रातील अभ्यासिकेच्या दालनामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, जयकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. अपर्णा राजेंद्र, मुकुंद पांडे,डॉ. अजय ठुबे, डॉ. सुनिल धिवार यांनी पुष्पहार अर्पण केला. जयकर ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना आदरांजली वाहण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. १८ ते २१ जुलै दरम्यान विद्यापीठातील सर्व विभागांसाठी व सर्व नागरिकांसाठी हे प्रदर्शन खुले आहे.

### बाल न्याय मंडळाचे २ सदस्य कल्याणीनगर अपघात प्रकरणाच्या विळख्यात

**कल्याणीनगर :** कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन आरोपीला ३०० शब्दांचा निबंध लिहिण्याच्या अटी-शर्तीवर जामीन देण्याचा निर्णय बाल न्याय मंडळाच्या डॉ. एल. एन. धनावडे आणि के. टी. थोरात या दोन सदस्यांना भोवणार आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी नेमलेल्या समितीने दोघांना दोषी ठरवले असून राज्य सरकार त्यांच्यावरील कारवाईबाबत निर्णय घेणार आहे. राज्याच्या महिला आणि बालविकास विभागाने प्रक्रियात्मक त्रुटी आणि गैरवर्तनाबद्दल दोषी धरून बाल न्याय मंडळाच्या दोन सदस्यांविरुद्ध राज्य सरकारकडे अहवाल सादर केला आहे. या संदर्भात पाच सदस्यीय समितीने दिलेल्या अहवालात या दोन्ही सदस्यांवर कडक कारवाई करण्याची शिफारस केली आहे. कल्याणीनगर अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला जामीन देणाऱ्या बाल न्याय मंडळाच्या दोन सदस्यांची अंतर्गत चौकशी सुरू होती.

## पूजा खेडकर यांच्या वडिलांवरही कारवाईची मागणी

# जिल्हा तलाठी संघटनेकडून निषेध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** वादग्रस्त प्रशिक्षार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांच्या अडचणी काही कमी होताना दिसत नाही. गुरूवारी पूजा खेडकर यांच्या आईला पुणे पोलिसांनी जमिनीच्या वादातून शेतकऱ्याला दाखविलेल्या बंदुकीबाबत अटक केली आहे. गेल्या काही दिवसांपासून पूजा खेडकर प्रकरण चांगलेच राज्यात गाजत असताना आता आईनंतर वडिलांवर देखील कारवाईची मागणी पुणे जिल्हा तलाठी संघाकडून करण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

पुणे जिल्हा तलाठी संघाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रात उल्लेख केला आहे की, प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथील प्रशिक्षक कालावधीमध्ये असताना अत्यंत उद्दामपणाचे वर्तन केले आहे. तसेच त्यांचे वर्तन हे आयएएस अधिकाऱ्याला न शोभणारे आहे. शासनाकडून प्रशिक्षणार्थी कोणत्याही अधिकाऱ्याला केबिन, गाडी, निवासस्थान, स्वातंत्र शिपाई असे कोणत्याही सुविधा नसताना आपल्या पदाचा गैरफायदा घेत जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याशी परस्पर संपर्क साधून दमदाटी करून जबरदस्तीने या सुविधा प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न केला.

त्यांच्या वडिलांनीही तहसीलदार दर्जाच्या अधिकाऱ्यांना दमदाटी देऊन अन्य वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या अँटी चेंबरचा ताबा घेऊन, पूजा खेडकर यांना दिला. त्यांचे वडील हे सातत्याने अधिकाऱ्यांना दमदाटी करत असत. पुजा खेडकर यांच्या याबाबतीत समोर येत असलेल्या बाबी म्हणजेच बोगस दिव्यांग प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राच्या आधारे अन्य पात्र उमेदवारांचा हक्क डावलून आयएस अधिकारी पद मिळविले या बाबींचा संघटनेच्या वतीने निषेध करण्यात येत आहे.

तसेच, त्यांच्या वडीलांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केलेली दमदाटी व पुजा खेडकर यांनी सुहास दिवे जिल्हाधिकारी पुणे यांच्यावर, महिला असलेचा फायदा घेऊन स्वतःचा छळ केलेबाबतची केलेली खोटी तक्रार याचा संघटनेच्या वतीने निषेध करणेत येत आहे. जिल्हाधिकारी यांच्यावर केलेले आरोप हे चुकीचे असून स्वार्थासाठी केलेले आहे. वडील यांच्यावर कठोर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन करेल असा इशारा संघटनेने दिला आहे.

# भाजीपाल्याचे दर चढतेच राहणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** बाजारात केवळ भाजीपालाच नव्हे तर डाळीचे दर तेजीत आहे. त्यामुळे पुढील काही दिवस तरी भाजीपाल्याचे दर चढतेच राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आहे. आठवडाभरापासून भाजीपाल्याचे दरही गगनाला भिडले आहेत. किरकोळ बाजारात लसूण तीनशे रुपये किलो झाला आहे.

दोन दिवसांपासून होत असलेल्या पावसामुळे पावसामुळे राज्यातील विविध बाजार समितीमध्ये भाजीपाल्याची आवक घटली आहे.तर दुसरीकडे मागणी अधिक असल्यामुळे किरकोळ बाजारात भाजीपाल्याचे दर कडाकडले आहेत. कोथिंबीर, कोबी, मिरची, टमाटे शंभर रुपये किलोने किरकोळ बाजारात विकली जात आहेत. होलसेल बाजारात टमाटे प्रति कॅरेट २,२५० पर्यंत पोहोचले आहेत. बाजार समित्यांमध्ये स्थानिक भाजीपाला उत्पादकांऐवजी इतर जिल्ह्यातून माल विक्रीस येत आहे.

## एसटी उभारणार स्वतंत्र पंप व्यवस्था

# आता जुन्या एसटीचे रूपांतर सीएनजीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे एसटी विभागात सध्या जवळपास ८०० पेक्षा जास्त बसेस आहेत. त्यापैकी ७०० ते ७५० बस या मार्गावर धावतात. उपलब्ध असलेल्या बसेसमध्ये ५०० बस जुन्या झाल्या असून, त्या सर्व बस सीएनजीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे.त्यासाठी बारामती, शिरुर, सासवड आणि मंचर या चार आगारांत स्वतंत्र सीएनजी पंप उभारण्याचे काम सुरू आहे

डिझेलच्या वाढत्या किमती, तुटवडा आणि होणारे प्रदूषण यामुळे डिझेलवरील धावणारी लालपरी (एसटी बस) आता सीएनजीवर करण्याचा निर्णय एसटी महामंडळाकडून घेण्यात आला आहे.त्यानुसार पहिल्या टप्प्यात पुणे विभागातील शिरूर, राजगुरूनगर, बारामती आणि सासवड या चार आगारांतील एकूण १३२ लालपरी बसना सीएनजीत रुपांतरित करण्यात आले आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली.

पुणे विभागात एकूण १४ आगार असून, दररोज हजारो प्रवासी एसटीने प्रवास करतात. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यांसह पर्यटनासाठी प्रवाशांची हक्काची सेवा असलेली एसटी खऱ्या अर्थाने जीवनवाहिनी ठरत आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यातील अनेक बस जुन्या झाल्या आहेत. त्यामुळे महामंडळाने नव्याने इलेक्ट्रिक बस घेण्यावर जास्त भर दिल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान या जुन्या बस डिझेलवर चालणाऱ्या असून, डिझेलच्या वाढत्या किमतीमुळे महामंडळाचा सगळ्यात जास्त खर्च इंधनावर होत असल्याचे दिसते. त्यामुळे आर्थिक तूट निर्माण होते. त्याला पर्यायी व्यवस्था म्हणून डिझेलवरील लालपरी सीएनजीवर करण्यात येणार आहे. त्याचा एसटी महामंडळाला फायदा होत असून, येत्या वर्षभरात पुणे विभागातील सर्व डिझेलच्या एसटी बस या सीएनजीवर रुपांतरित करण्यात येणार आहेत. येत्या दोन- तीन महिन्यांत हे काम पूर्ण होईल, तसेच सासवड आणि शिरूर आगारांतही खासगी गाड्यांना सीएनजी विक्रीची सुविधा करण्यात येणार आहे.

> डिझेलची वाढती किंमत आणि प्रदूषणामुळे डिझेलवरील सर्व बसेसचे सीएनजीत रूपांतर करण्यात येणार आहे. सध्या चार आगारांतील १३२ बसेसचे सीएनजीत रूपांतर करण्यात आले आहे." — **प्रमोद नेहूल,**
> विभाग नियंत्रक, पुणे विभाग

#रा

## ‘ज्ञानदा’च्या पालखी वारीत पर्यावरणाचे संदेश



**पुणे :** गेल्या ३८ वर्षांच्या प्रथेप्रमाणे यंदाही ज्ञानदा प्रतिष्ठानतर्फे आषाढी एकादशीनिमित्त पालखी-वारीचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञानदाच्या गुरुकुल, पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर आणि संस्थेचे पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. ज्ञानदाचे हितचिंतक - देणगीदार नंदकिशोर राठी आणि त्यांचे बंधू रतन राठी यांच्या उपस्थितीमधे शाळेमधे पालखी सोहळा आनंदात पार पडला. विठ्ठल रखुमाईच्या वेषातील मुलामुलींनी प्रत्यक्ष देवांच्या दर्शनाचा आनंद दिला. वारीमध्ये प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी फलकांद्वारे पर्यावरण विषयीचे संदेश दिले. डी-पी-रस्त्यावरील ज्ञानदापासून निघालेल्या पालखीचे स्वागत आणि पादुका पूजनाचा आनंद नागरीकांनी घेतला. अत्यंत शांततापूर्ण वातावरणात परंतु ढोल-ताशाच्या मर्यादित आवाजात मुलींच्या लेझिम पथकाने वारीची रंगत वाढली. कर्वेनगरमधील विठ्ठल मंदिरामधे पोहोचल्या नंतर संस्थेचे संचालक, आणि शिक्षक वर्गाने श्री विठ्ठलाची आरती केली, तर विद्यार्थ्यांनी भक्तिगीते आणि विठुनामाचा गजर गाऊन आपली भक्ति सेवा अर्पण केली. सुयोग्य नियोजन, वारी मधील विद्यार्थ्यांवरचे शिक्षकांचे नियंत्रण आणि अलंकार पोलीस चौकीमधील पोलीस बांधवांचे मार्गदर्शन यामुळे हा पालखी-वारी सोहळा निर्विघ्नपणे आणि भक्तिरसाच्या आनंदाने संपन्न झाला.

### मुले घरी येईपर्यंत कुटुंबियांचा जीव टांगणीला

# बेशिस्त रिक्षाचालकांमुळे जीवघेणे अपघात

**पुणे :** ड्रंक अँड हिट च्या घटना सातत्याने घडत आहेत. हडपसर गांधी चौकामध्ये बुधवारी (दि. १७ जुलै) कारने रिक्षाला चिरडले. रिक्षाचालक जखमी झाला, दोघांत तडजोड झाली आणि प्रकरण मिटले. अशा जीवघेण्या अपघातामुळे मुले घरी येईपर्यंत कुटुंबीयांचा जीव टांगणीला लागत आहे. त्यामुळे आता तरी वाहतूक पोलिसांनी वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या रिक्षासह सर्वच वाहनांवर धडक कारवाई करण्याची अत्यंत गरज आहे, अशी मागणी चेतन जगताप, मोहन बलाई यांनी केली.

मागिल काही महिन्यापूर्वी बसथांब्यावर उभ्या राहणाऱ्या रिक्षांवर पीएमपी अधिकारी, वाहतूक पोलीस आणि आरटीओची संयुक्त कारवाई करण्याचे जाहीर केले होते. मात्र, ही फक्त घोषणाच ठरली, अद्याप कोणतीही कारवाई झाली नाही, त्यामुळे बेशिस्त रिक्षाचालक आणि खासगी प्रवासी वाहनचालक सुसाट सुटले आहेत. प्रशासनाच्या घोषणा हवेत विरून जातात, एखादी दुर्घटना घडली की पुन्हा त्या घोषणांचा महापूर सुरू होतो, असा तक्रारींचा सूर नागरिकांमध्ये उमटला जात आहे.



- आर्थिक हितसंबंधांमुळे कारवाई नाही?
- बेशिस्त रिक्षाचालक आणि खासगी प्रवासी वाहनचालक सुसाट
- रिक्षामध्ये सहा-सात प्रवासी?
- रिक्षासह सर्वच वाहनांवर धडक कारवाईची गरज

हडपसर गावठाण-सय्यदनगर दरम्यान धावणाऱ्या अनेक रिक्षा कालबाह्य झाल्या आहेत, अनेक रिक्षाचालकांकडे बॅच-बिल्लानाही, ड्रेसकोड नाही, रिक्षाचालकांकडून नियमांना तिलांजली दिली जात आहे. रस्त्यावर कुठेही कशाही बेशिस्तपणे रिक्षा उभ्या केल्या जातात, दामटल्या जातात, त्यामुळे वाहतूककोंडी होऊन अपघात होत आहेत. नो पार्किंगचा फलक असला तरी त्या ठिकाणी बेमुर्वत रिक्षा थांबतात, त्यांच्यावर पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने त्यांची मुजोरी वाढली आहे. प्रवाशांची अडवणूक केली जाते.

> हडपसर गांधी चौक, मंत्री मार्केट, गाडीतळ, बसथांबा, पीएमपी आगारासमोर रिक्षाचालकांचा गराडा असतो. वाहनांना आणि पादचाऱ्यांना रस्ता शिल्लक ठेवला जात नाही, तरीसुद्धा पोलिसांकडून धडक कारवाई होताना दिसत नाही."
> — **दिलीप भुजबळ,** हडपसर

> गर्दीच्या ठिकाणी चौकात, रस्त्यावर, बसथांब्यावर बिनदिक्कत कुठेही कशाही रिक्षा उभ्या केल्या जातात. पोलीस बघ्याची भूमिका घेत असल्यानेच रिक्षाचालकांची मुजोरी वाढली आहे. वाहतुकीला अडथळा ठरतो, अपघातसदृशस्थिती निर्माण होत आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला, मुलांना रस्त्याने चालताना जीव मुठीत धरून चालावे लागत आहे."
> — **तुषार हिंगणे,** हिंगणेमळा

> वाहतूक विभागातील पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून वाहतूक सुरळीत करण्याकडे लक्ष असायला पाहिजे. मात्र, तसे होताना दिसत नाही. हडपसर गावठाणामधील रिक्षाचालक रिक्षामध्ये सहा-सात प्रवासी कोंबतात. पोलीस त्यांच्यावर कारवाई का करत नाहीत."
> — **किरण कासट,** हडपसर

बसथांबा नव्हे, रिक्षाथांबा अशी अवस्था झाली आहे. कोणी प्रवासी बोलला, तर त्याच्या अंगावर धावून जातात, पोलिसांकडे तक्रार केली, तरीसुद्धा कारवाई होत नाही. वाहतूक पोलीस अशा बेशिस्त रिक्षांवर आर्थिक हितसंबंधांमुळे कारवाई करीत नाहीत का, असा संशय येत असल्याची तक्रार मोहन रायकर, अजय ससाणे, निलेश आरू यांनी दै. राष्ट्र संचारशी बोलताना केली.

## अवतीभवती

CITY UPDATE



### ‘गानवर्धन’च्या नवोन्मेष युवा पुरस्कारांची घोषणा

**पुणे :** भारतीय शास्त्रीय संगीत क्षेत्रात ४५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या गानवर्धन संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या नवोन्मेष युवा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. नवोन्मेष कथक नृत्य युवा कलाकार पुरस्कारासाठी रेणुका टिकारे-केळकर यांची तर शास्त्रीय संगीतामधील नवोन्मेष संगतकार पुरस्कारासाठी तबला आणि सारंगीवादक मंदार बगाडे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती गानवर्धन संस्थेचे अध्यक्ष दयानंद घोटकर यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. पुरस्कार वितरण समारंभ शनिवार, दि. २७ जुलै रोजी सायंकाळी ५:३० वाजता एस. एम. जोशी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. शाल, स्मृतिचिन्ह व दहा हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. रेणुका टिकारे-केळकर या ज्येष्ठ विदुषी डॉ. सुजाता नातू आणि ऋतुजा सोमण यांच्याकडे कथक नृत्याचे शिक्षण घेत आहेत. मंदार बगाडे हे तबला वादनाचे प्रशिक्षण धनंजय पंडित यांच्याकडे तर सारंगी वादनाचे प्रशिक्षण पं. किशोर दातार आणि पं. मोहनकुमार दरेकर यांच्याकडे घेत आहेत. अनेक कार्यक्रमांमधून त्यांनी सारंगीवादन केले आहे. पुरस्कार ज्येष्ठ कथक नृत्यगुरू डॉ. सुजाता नातू यांनी पुरस्कृत केले आहेत. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

### एक कोटींच्या खंडणीसाठी शेअर दलालाचे अपहरण, तिघांना अटक



**येरवडा :** शेअर बाजारात तोटा झाल्याने शेअर दलालचे अपहरण करून एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी अमरावतीतील तिघांना अटक केली असून, शेअर दलालाची सुखरुप सुटका करण्यात आली. याप्रकरणी डॉ. सुहास भांबुरकर, भूषण तायडे, अल्पेश गुडदे (तिघे रा. अमरावती) यांना अटक करण्यात आली. याबाबत एकाने येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुणाचा मावसभाऊ शेअर दलाल आहे. शेअर दलालाच्या माध्यमातून आरोपींनी ५० लाख रुपये गुंतविले होते. शेअर बाजारातील व्यवहारात तोटा झाल्याने आरोपी दलालावर चिडले होते.

शेअर बाजारातील तोट्यास दलाल कारणीभूत असल्याचा राग आरोपींच्या मनात होता. आरोपींनी त्यांच्याकडे जादा पैसे मागण्यास सुरुवात केली. सोमवारी (१५ जुलै) आरोपींनी संगमवाडीतील खासगी वाहनतळ परिसरात मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास भेटण्यास बोलाविले. त्यानंतर आरोपींनी दलालाला धमकावून मोटारीत बसविले आणि त्याचे चाकूच्या धाकाने अपहरण केले. दलालास आरोपींनी अमरावतीला नेले. तेथून त्यांनी त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. आरोपींनी दलालाची सुटका करण्यासाठी एक कोटी रुपयांची खंडणी मागितली. त्यानंतर शेअर दलालाच्या नातेवाईकांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर यांनी येरवडा पोलिसांनी याप्रकरणाचा तपास करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोलिसांनी अमरावतीतून तिघांना अटक केली. शेअर दलालाची सुखरुप सुटका करण्यात आली. येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्रकुमार शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक अमर कदम तपास करत आहेत.

### रामवाडी स्टेशनवर नो पार्किंग झोन

# वाहनचालकांनाच पडतोय भुर्दंड

**पुणे :** रामवाडी स्टेशनवर नो पार्किंग झोन करण्यात आला आहे. शेकडो संख्येने दुचाकीचालक रामवाडी स्टेशनखाली दुचाकी पार्क करुन मेट्रोने प्रवास करत आहेत. नो पार्किंगमध्ये दुचाकी लावल्याने वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. याचा फायदा घेवून या स्टेशनजवळ एकाने खासगी जागेत पार्किंगची व्यवस्था केली आहे. पोलीस कारवाईच्या भीतीपोटी खासगी पार्किंगचा वापर दुचाकीचालकांना करावाच लागणार आहे. मेट्रोच्या तिकीटाचे आणि पार्किंगचे पैसे जवळपास सारखेच आहेत. त्यामुळे एका प्रवासासाठी दुप्पट पैसे खर्च करावे लागणार आहेत. त्यामुळे या स्टेशनखाली पार्किंग झोन करुन प्रवाशांचा विचार करावा, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वनाज ते रामवाडी या विस्तारित मेट्रो मार्गाला हिरवा झेंडा दाखविण्यात आल्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खूला झाला. मुख्य शहरात येण्यासाठी वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागू नये, म्हणून प्रवाशांकडून या मार्गाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. परंतु रामवाडी मेट्रो स्टेशनजवळ नो पार्किंग झोन करण्यात आल्यामुळे दुचाकीचालक मेट्रो प्रवाशांना वाहतूक पोलिसांच्या कारवाईला सामोरे जावे लागत असून भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे रामवाडीपासून पुढे मेट्रोने प्रवास करण्यासाठी प्रवाशांना तिकीटापेक्षा अधिक पैसे दंड आणि आता खासगी पार्किंगलातच भरावे लागणार आहेत. त्यामुळे काही दिवसांत या मार्गाला असलेला प्रवाशांचा प्रतिसाद कमी होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.





पुणे महापालिकेने आणि मेट्रो प्रशासनाने संयुक्तपणे प्रवाशांच्या सोयीचे धोरण स्वीकारण्याची गरज आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात येणाऱ्या दुचाकीचालकांची संख्या मेट्रोमुळे कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होऊ शकते. सार्वजनिक वाहतूकीला जेवढा जास्त प्रतिसाद मिळेल तेवढ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होणार आहे. याचा विचार करुन प्रशासनाने रामवाडीच नव्हे तर शहरातील प्रत्येक स्टेशनखाली पार्किंगची व्यवस्था करणे आवश्यक आहे, असे प्रवाशांचे म्हणणे आहे.

वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गामुळे पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे मेट्रोच्या सहाय्याने जोडले गेले आहे. या मार्गिकेमुळे विमाननगर, येरवडा, कल्याणीनगर, चंदननगर, शास्त्रीनगर, खराडी, वडगाव शेरी, तळेगाव या भागातील नागरिकांना फायदा होत आहे. या मार्गिकेमुळे वनाझ ते रामवाडी असा १४.५ किलोमीटरचा प्रवास अवघ्या ३६ मिनिटांत करणे शक्य होत आहे. तसेच मेट्रोचे प्रवासभाडेही आवाक्यात आहे. त्याचबरोबर रामवाडी स्थानकाच्या परिसरात असणाऱ्या आयटी कर्मचाऱ्यांना प्रवास करणे सुलभ होत आहे. मात्र वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत असल्याने वाहनचालक त्रासले आहेत.

> पुणे मेट्रोने दुचाकी पार्किंगचा कोणताही विचार केलेला नाही. त्यामुळे दुचाकीचालकांना वाहन पार्क करुन मेट्रोने प्रवास करताना तिकीटापेक्षा अधिक पैसे पार्किंगसाठी मोजावे लागत आहेत. या स्टेशनपासून असलेली पीएमपी फिडर बस सेवा आणि रिक्षा सेवा याचा वेळ साधता येत नाही. मेट्रोने प्रवास करुन आल्यानंतर स्टेशनखाली स्वत:ची दुचाकी पार्क केलेली असल्याने घरी जाताना त्रास सहन करावा लागणार नाही."
> — **निलेश सावंत,** प्रवासी

पोलिसांकडून नो पार्किंगचे फलक लावून दुचाकीचालकांवर कारवाई केली जात आहे. वाहतूक पोलिसांच्या कारवाईमुळे आता खासगी पार्किंग चालकांचे हित साधले जाणार आहे. पोलिसांनी सहकार्य करुन या रस्त्यावर पार्किंग धोरण ठरवले तर त्याचा फायदा प्रवाशांना आणि प्रशासनाला होणार आहे. याचा विचार करुन लवकरात लवकर या स्टेशनखाली अधिकृत पार्किंगला मान्यता देऊन मेट्रो प्रशासन आणि महापालिकेने प्रवाशांना दिलासा द्यावा, अशी मागणी या मार्गावरील प्रवासी सुमित शिंदे यांनी बोलताना केली.

### कधी प्रमुखपदावरून रस्सीखेच तर भ्रष्टाचाराचा आरोप

# पालिका आरोग्य विभाग चर्चेच्या विळख्यात

**पुणे :** महापालिकेचा आरोग्य विभाग सातत्याने चर्चेचा विषय होत आहे. आरोग्य विभाग प्रमुखपदावरून तर चांगलीच रस्सीखेच सुरु आहे. गेल्या काही दिवासात आरोग्यप्रमुख डॉ. भगवान पवार यांचे निलंबन झाल्याने विभागाची चर्चा सर्वत्र होत आहे. त्यानंतर आता आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. ज्या अधिकाऱ्यांवर आरोप करण्यात आले आहेत, त्यांना तात्काळ खुलासा करण्याचे आदेश दिले असून उत्तर देण्यास दोन दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

आरोग्य विभागातील सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. मनीषा नाईक, लिपिक मनोज पानसे आणि शिपाई बाबा इनामदार यांच्यावर रुग्ण हक्क परिषदेने तक्रार केल्यानुसार भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. या तक्रारीची दखल घेत प्रभारी आरोग्य प्रमुख डॉ. कल्पना बळिवंत यांनी थेट या तक्रारीबाबत खुलासा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यावर योग्य खुलासा न आल्यास अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही केली जाईल असे सांगण्यात येत आहे. त्यामुळे आरोप झालेल्या अधिकाऱ्यांकडून नेमका काय खुलासा येणार याकडे लक्ष लागलेले आहे. रुग्ण हक्क परिषदेने प्रभारी आरोग्य प्रमुख डॉ. बळिवंत यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीनुसारच खुलासा सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

> रुग्ण हक्क परिषदेने आरोग्य विभागाकडे काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांविरोधात तक्रार केली आहे. तक्रार आल्यानंतर त्यावर कार्यवाही करणे बंधनकारक असते. तक्रारीत करण्यात आलेल्या आरोपानुसार संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना खुलासा करण्यास सांगण्यात आले आहे. आरोग्य विभागाने दिलेली नोटीस ही कारणे दाखवा नोटीस नसून तो खुलासा मागवण्यात आला आहे.
> - **डॉ. कल्पना बळिवंत,** प्रभारी आरोग्य प्रमुख, पुणे महापालिका.

शहरी गरीब योजना खिळखिळी करण्याचे काम सुरू आहे. गरीब रुग्णांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याने त्यांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहरातील मोठ्या रुग्णालयांकडून या योजनेची देयके मंजूर करून घेण्यासाठी मोठी लाच स्वीकारली आहे. त्यामुळे त्यांचे निलंबन करून त्यांची चौकशी करावी. असे आरोग्य प्रमुखांकडे केलेल्या तक्रारीत नमूद करत भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत.

## भूमी अभिलेख विभागाची सर्व पोर्टल २२ जुलै पर्यंत बंद

**पुणे :** भूमी अभिलेख विभागाचे ऑनलाइन पोर्टल तांत्रिकदृष्ट्या अद्ययावत करण्यात येणार आहे. त्यामुळे १९ ते २२ जुलै दरम्यान विभागाची सर्व पोर्टल बंद राहणार आहेत. परिणामी तीन दिवसांच्या काळात सातबारा उतारा, मिळकत पत्रिका, फेरफार उतारे ऑनलाइन डाऊनलोड करता येणार नाहीत, अशी माहिती ई-फेरफार प्रकल्पाच्या राज्य समन्वयक सरिता नरके यांनी दिली

ई-फेरफार, ई-हक्क, ई-चावडी तसेच ई-महाभूमी या पोर्टलवरून सातबारा उतारे, आठ अ, मिळकत पत्रिका, फेरफार उतारे ऑनलाइन डाऊनलोड करता येतात. या पोर्टलचे सॉफ्टवेअर जुने झाल्याने सध्या वेगाची मर्यादा येत आहे. उतारे डाऊनलोड करताना अडचणी येतात.

हे सॉफ्टवेअर २०१६ पासून वापरात आहे. त्यात आधुनिकता आणणे गरजेचे होते. त्यामुळेच भूमी अभिलेखने हे सॉफ्टवेअर अद्ययावत करण्याचे ठरवले आहे. त्यासाठी विभागाकडून चालविण्यात येणारी सर्व पोर्टल १९ जुलैच्या सायंकाळी ६ वाजेपासून २२ जुलैच्या रात्री १२ पर्यंत बंद राहतील.

नवीन सॉफ्टवेअर हे २०२४ मध्येच तयार करण्यात आले आहे. त्याची चाचणी यशस्वी झाली असून, त्याचा वापर सुरू झाल्यानंतर उतारे कमी वेळेत डाऊनलोड होतील, अशी माहितीही नरके यांनी यावेळी दिली. सध्या ई-पीक पाहणी, खरीप पीक विमा योजना तसेच अन्य योजनांसाठी शेतकरी अर्ज करत आहेत. त्यामुळे अर्ज भरण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे त्यांनी काढावीत, जेणेकरून अर्ज करताना अडचण येणार नाही, असेही नरके यांनी सांगितले.

> नागरिकांना उतारे डाऊनलोड करण्यासाठी येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन नवीन सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. गरजेनुसार उतारे १९ जुलैपूर्वीच काढून ठेवावेत. २३ जुलैपासून सर्व पोर्टल पूर्वीप्रमाणेच काम करतील."
> — **सरिता नरके,** राज्य समन्वयक, ई- फेरफार प्रकल्प, भूमी अभिलेख विभाग, पुणे

### देशात एक हजार नवी विमाने येणार : मुरलीधर मोहोळ

# ‘पॅनासोनिक एव्हिऑनिक्स’ केंद्राचे उद्घाटन

**पुणे :** देशातील नागरी विमान वाहतूक क्षेत्र वेगाने वाढत असून, आगामी पाच ते सात वर्षांत एक हजार नव्या विमानांची भर पडेल. त्यामुळे या क्षेत्रात मोठी संधी आहे, असे प्रतिपादन नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. हिंजवडी येथील पॅनासोनिक एव्हिऑनिक्स कॉर्पोरेशनच्या नव्या सॉफ्टवेअर डिझाइन व विकास केंद्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमाला पॅनासोनिक एव्हिऑनिक्स कॉर्पोरेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी केन सैन, पॅनासोनिक लाइफ सोल्यूशन्स इंडिया व साउथ एशियाचे अध्यक्ष व पॅनासोनिक एव्हिऑनिक्स इंडियाचे संचालक मनीष शर्मा आणि चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर सत्येन यादव उपस्थित होते. मोहोळ पुढे म्हणाले, “गेल्या दहा वर्षांपर्यंत देशात केवळ ४०० विमाने होती, आज ही संख्या ७३० वर गेली आहे. विमान प्रवाशांची संख्या सहा कोटींहून अधिक असून, आगामी काळात ही संख्या आणखी वेगाने वाढणार आहे.

प्रवाशांना आरामदायी, आनंददायी विमानप्रवासासाठी तंत्रज्ञानाचा वापर महत्त्वाचा ठरत आहे. त्यात ‘पॅनासोनिक एव्हिऑनिक्स’सारखी कंपनी मोलाचे योगदान देत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारत आणि पाच लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था करण्याचे उद्दिष्ट गाठण्यात प्रत्येक क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यात नागरी विमान वाहतूक क्षेत्राचाही समावेश आहे. सरकारही या क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करत असून, विमानतळ, नवे विमानमार्ग यासाठी मोठी गुंतवणूक करत आहे.



> आज, भारत संपूर्ण जगाला आयटी सपोर्ट व सेवा देत आहे. त्यात पुण्याची भूमिका महत्त्वाची आहे. हे केंद्र भारतातील पहिले केंद्र आहे. सध्या या केंद्रात सध्या २०० हून अधिक कुशल अभियंते काम करत असून, आगामी काळात ही संख्या ४०० पर्यंत वाढविण्यात येणार आहे. या केंद्रात इन-फ्लाइट एंगजेमेंट अँड कम्युनिकेशनसाठी नावीन्यपूर्ण सोल्यूशन्सची निर्मिती करण्यात येणार असून, विविध बाजारपेठा व विमानकंपन्यांच्या गरजांची पूर्तता येथून केली जाईल. या केंद्राच्या विकासाला गती देण्यासाठी कंपनी राज्यातील, तसेच देशभरातील विद्यापीठांबरोबर सहयोग करत आहे. त्यामुळे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल" — **सत्येन यादव**

# दहशतवाद्यांचा नंगा नाच

केंद्रशासित प्रदेश जम्मू आणि काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ले पुन्हा वाढले आहेत. मध्यंतरी हा भूभाग शांत झाल्याचे भासत होते परंतु आता अचानक बदल झाला असून पुन्हा एकदा दहशतवादी हल्ल्यांनी जोर धरला आहे. ९ जून २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शपथविधी सोहळ्यादिवशी पहिला हल्ला झाला आणि नंतर हल्ल्यांची मालिकाच सुरू झाली. दहशतवाद्यांनी वैष्णोदेवीला जाणाऱ्या यात्रेकरूंच्या बसवर गोळीबार केला. त्यामुळे बसचालकाचे नियंत्रण सुटून बस थेट दरीत कोसळली, त्यात १० जणांचा मृत्यू झाला. दहशतवाद्यांना या हल्ल्यातून दहशतवाद जिवंत असल्याचा संदेश भारत सरकारला द्यायचा होता. जम्मू-काश्मीरमध्ये शांतता प्रस्थापित करून आंतरराष्ट्रीय रडारपासून त्याला दूर ठेवणे सरकारला शक्य नाही, हे सूचित करायचे होते. अनुच्छेद ३७० रद्द झाल्यावर या केंद्रशासित प्रदेशात दहशतवादाला आळा बसल्याचे जाणवत होते, फुटीरवाद संपवण्यात यश आले आहे असे वाटत होते. परंतु आता पुन्हा एकवार हे वाद डोके वर काढत असल्याचे दिसून येत आहे. या भागावर भारताची पकड मजबूत होऊ नये यासाठी पाकिस्तानचे राजकारणी आणि लष्कर यांचा दहशतवादी मार्गाने काश्मीरवर पकड मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. दहशतवाद हे जगासमोरील सर्वांत मोठे आव्हान आहे. दहशतवादामुळे जागतिक आणि प्रादेशिक शांतता धोक्यात आली आहे. दहशतवादी गुन्ह्यांचे सूत्रधार आणि वित्तपुरवठादार यांना शोधून त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची गरज आहे. जम्मू-काश्मीरमध्ये दहशत निर्माण करण्यासाठी अतिरेकी सतत सुरक्षा पथकांना लक्ष्य करीत आहेत. डोडा जिल्ह्यात लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये सोमवारी रात्री झालेल्या चकमकीत एका कॅप्टनसह एक पोलिस आणि चार जवान शहीद झाले. गत आठवडाभरात ११ भारतीय जवानांनी प्राण गमावले आहेत तर ९ दहशतवादी मारले गेले आहेत. या वाढत्या दहशतवादी कारवायांना सीमेपलीकडून खतपाणी घातले जात आहे. ६ जुलैला कुलगाम जिल्ह्यात दोन चकमकी झडल्या, त्यात ६ दहशतवाद्यांना ठार करण्यात आले तर दोन जवान शहीद झाले. १४ जुलैला कुपवाडा जिल्ह्यात नियंत्रण रेषेजवळ घुसखोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला होता. यात तीन दहशतवादी ठार झाले होते. कथुआ, उधमपूर, रियासी, डोडा, किश्तवाड, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यात दहशतवाद्यांच्या कारवाया वाढल्या आहेत. या डोंगराळ भागातील नैसर्गिक गुहांमध्ये लपून बसलेल्या दहशतवाद्यांचा खात्मा करणे हे आव्हान आहे. याशिवाय आयएसआय कार्यकर्त्यांचा शोध घेण्यासाठी व्यापक मोहीम राबवावी लागणार आहे. जम्मू-काश्मीरच्या पुनर्रचनेपासून होत असलेले हल्ले चिंताजनक बनले आहेत. आयएसआय आणि त्यांचे एजंट दहशतवाद्यांना संवेदनशील भागात घुसवण्यास मदत करत आहेत. त्यांना रोखणे हे मोठे आव्हान आहे. सप्टेंबर २१ पासून दहशतवाद्यांनी जम्मू विभागात २१ हून अधिक हल्ले केले, यात ४३ लष्करी जवान शहीद झाले. काश्मीरमध्ये हिंसाचार सुरू झाल्यापासून पाकिस्तान आणि आयएसआय जम्मूला अशांत करण्यासाठी सातत्याने कट रचत आहेत. पाकिस्तानी दहशतवाद्यांना काश्मीरमध्ये घुसखोरी करण्यात जे यश मिळत आहे त्याला प्रादेशिक पक्ष कारणीभूत आहेत असा गंभीर आरोप जम्मू-काश्मीरचे पोलिस महासंचालक आर. आर. स्वेन यांनी केला आहे. राजकारणी लोक भारतीय सेनेद्वारा मारल्या गेलेल्या दहशतवाद्यांच्या घरी जाऊन सार्वजनिकपणे त्यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करतात. मतांसाठी दहशतवाद्यांना आश्रय दिला जातो असे आरोप स्वेन यांनी केले आहेत. उंदीर जसे घरात घुसण्यासाठी बिळांचा वापर करतात तसे दहशतवादी सुद्धा भारतीय हद्दीत घुसण्यासाठी छोटे बोगदे तयार करतात. भारतात घुसण्याचे त्यांचे सर्व मार्ग आम्ही बंद करू असे स्वेन यांनी म्हटले आहे. डोडा जिल्ह्यात झालेल्या हल्ल्याची सरकारने गंभीर दखल घेतली असून या संदर्भात संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी भारतीय लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांच्याशी चर्चा केल्याचे सांगितले जाते. संरक्षणमंत्र्यांनी दहशतवादा विरोधात कारवाई करण्यास लष्करप्रमुखांना हिरवा कंदिल दाखविल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. डोडा भागात भारतीय लष्कर व दहशतवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत भारतीय जवान शहीद झाले. या घटनेबाबत जम्मू-काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनी मोदी सरकारच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्या म्हणाल्या, देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी जवान काश्मीरमध्ये येतात मात्र इथून परत जाते ते त्यांचे पार्थिव-तेही शवपेटीतून! मोदी सरकार म्हणतेय, काश्मीर खोऱ्यातला दहशतवाद संपलाय, मग काश्मीरमध्ये आपल्या जवानांना कोण मारतंय? या सर्व घटनांना कोण जबाबदार आहे? जम्मूत सध्या जे काही घडतेय त्याची जबाबदारी हे सरकार घेणार आहे का? गत ३२ महिन्यांपासून जम्मू-काश्मीर अशांत आहे. प्रामुख्याने नव्या पोलिस महासंचालकांची नियुक्ती झाल्यापासून येथील वातावरण दूषित झाले आहे. सध्याचे पोलिस महासंचालक केवळ राजकीयदृष्ट्या निर्णय घेत आहेत असा आरोप मेहबूबा मुफ्ती यांनी केला असून त्यांच्या बडतर्फीची मागणी केली आहे. सीमेवर काश्मिरी बांधव नाहीत, मुसलमान नाहीत, पत्रकार व व्यापारीही नाहीत. केंद्र सरकार व लष्कर देशाच्या सीमा सुरक्षित करतात मग देशात होणारी घुसखोरी रोखण्याची जबाबदारी कोणाची? ही स्थानिक सुरक्षा बलाची जबाबदारी नाही. मग जबाबदारी कोणाची याचे उत्तर कोण देणार?

**आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या दोन्ही राज्यांमधील तणावपूर्ण राजकीय वातावरणादरम्यान एक आशादायक वाट दाखवली आहे. दोन्ही राज्यांमधील प्रलंबित मुद्दयांचे, प्रश्नांचे, वादविवादांचे निराकरण करण्यासाठी या दोन नेत्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली आणि ती सकारात्मक ठरल्याचे सांगितले जात आहे. तेलंगणाची निर्मिती होऊन दहा वर्षे लोटली आहेत; परंतु आतापर्यंत या दोन्ही राज्यांमधील संघर्षमय वातावरण शमवण्यासाठी कोणतेही ठोस उपाय केले गेले नाहीत. जवळपास १४ प्रश्नांवरुन या दोन्ही राज्यांमध्ये वादविवाद आहेत. त्यांची सोडवणूक करण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणून या बैठकीकडे पाहिले जात आहे.**

# स्वागतार्ह पुढाकार

**के. श्रीनिवासन**

भारतीय लोकशाहीने संघराज्य पद्धती स्वीकारली असली तरी आपल्याकडे केंद्र विरुद्ध राज्य आणि राज्य विरुद्ध राज्य असे संघर्ष सातत्याने दिसून आले आहेत. पंजाब-हरियाणा, महाराष्ट्र-कर्नाटक, आंध्र प्रदेश-तेलंगणा यांसह ईशान्येकडील राज्यांमधील संघर्ष यामुळे अनेकदा तणावाचे प्रसंग निर्माण होत असतात. यामध्ये प्रामुख्याने नदी पाणीवाटप, सीमावर्ती भागातील भूक्षेत्रांचे वाद यांसारख्या समस्या तणावनिर्मितीचे काम करत असतात. यासंदर्भात न्यायालयीन खटले दाखल होतात, लवादांची नेमणूक केली जाते, न्यायनिवाडे होतात; पण संघर्ष आणि तणाव संपत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यांमधील राजकीय पक्षांच्या आणि नेतृत्वांच्या सोयीस्करवादी भूमिका. अशा प्रकारच्या वादांमधून जनतेच्या प्रादेशिक अस्मिता भडकावून किंवा त्यांना फुंकर घालून आपली राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न बहुतांश वेळा राजकीय नेत्यांकडून होत असतो. या पारंपरिक प्रवाहाला नव्याने छेद देण्याचे काम अलीकडेच आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या दोन राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांच्यामध्ये दोन्ही राज्यांमधील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी अलीकडेच एक बैठक पार पडली. एक धाडसी आणि स्तुत्य उपक्रम म्हणून या बैठकीचे वर्णन केले जात आहे. स्वतंत्र तेलंगणा राज्याच्या स्थापनेला दहा वर्षे उलटूनही आजपर्यंत या प्रश्नांबाबत ठोस, अर्थपूर्ण पाऊल उचलले गेलेले नाही.

तेलंगणा राष्ट्र समितीच्या नेतृत्वाखाली प्रदीर्घ आंदोलनानंतर जून २०१४ मध्ये स्वतंत्र तेलंगणा राज्याची निर्मिती झाली. त्यावेळी तेलगू देसमचे एन. चंद्राबाबू नायडू यांच्यासारखे नेते या मागणीच्या विरोधात होते. साहजिकच त्यामुळे दोन्ही पक्ष आणि नेत्यांच्या संबंधात दुरावा निर्माण झाला होता. दोन्ही राज्यातील तत्कालीन राजकीय वातावरण पाहता, वाद मिटवण्यासाठी काही तडजोड करावी लागली असती, तर संबंधित पक्षावर आणि नेत्यांवर राज्याच्या हिताशी तडजोड केल्याचा आरोप करण्यात आला असता. २०१९ पर्यंत नायडू आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. परंतु तोवर दोन्ही पक्षांकडून या दिशेने कोणताही पुढाकार घेण्यात आला नव्हता. २०१९ मध्ये जगन मोहन रेड्डी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री झाल्यावर तेलंगणाचे तत्कालीन मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी त्यांचे स्वागत केले. त्यानंतर दोन्ही राज्यांच्या अधिकाऱ्यांमध्ये काही बैठका झाल्या, पण त्यावर एकमत होऊ शकले नाही. मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत एकमत घडवण्याचा प्रयत्न होऊ शकला असता, तो झाला नाही.

या पूर्वेइतिहासाच्या पार्श्वभूमीवर दोन्ही राज्यांतील नवीन सरकारांचे प्रमुख ज्या तत्परतेने भेटले त्यातून प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने एक आशेचा किरण दिसू लागला आहे. तेलंगणाचे विद्यमान मुख्यमंत्री रेवंत रेड्डी हे टीडीपीच्या तिकिटावर संयुक्त आंध्र प्रदेशात दोनदा आमदार राहिले आहेत. ते एन चंद्राबाबू नायडू यांचे निकटवर्तीय मानले जात होते. त्यामुळे या दोन्ही मुख्यमंत्र्यांमधील पर्सनल केमिस्ट्री चांगली आहे. दुसरी गोष्ट म्हणजे, आंध्र व तेलंगणामधील वादग्रस्त प्रलंबित मुद्द्यांबाबत करार करणे दोन्ही राज्यांच्या हिताचे ठरणारे आहे. प्रलंबित समस्यांमध्ये रोख शिल्लक आणि बँक ठेवींच्या वितरणाचा प्रश्न कळीचा आहे. या समस्येच्या निराकरणामुळे दोन्ही राज्यांच्या सरकारांना कल्याणकारी योजना पुढे नेण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीचा वापर करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. दोन राज्यांमधील वीज देयके एकमेकांकडे सोडवण्यापासून ते ९१ संस्थांचे विभाजन करण्यापर्यंतचे किमान १४ मुद्दे प्रलंबित आहेत. कृष्णा आणि गोदावरी या नद्यांच्या पाणीवितरणासारख्या काही मुद्द्यांवर केंद्राच्या हस्तक्षेपाची मागणी होत आली आहे. मात्र, दोन्ही राज्यांच्या नेतृत्वांनी या उपक्रमातून आपापल्या पातळीवर जास्तीत जास्त सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. देशभरात वाढत चाललेल्या कुरघोड्यांच्या, सुडाच्या आणि अहंकाराच्या राजकारणामध्ये चंद्राबाबू आणि रेड्डी यांचा हा परस्पर सहकार्यातून सोडवणुकीचा मार्ग हे सकारात्मक राजकारणाचे उत्तम उदाहरण आहे. हा पुढाकार धाडसी, स्तुत्य आणि अनुकरणीय आहे. आंध्र प्रदेश पुनर्रचना कायद्याच्या ९व्या अनुसूचीमध्ये ८९ सरकारी कंपन्या आणि कॉर्पोरेशन आहेत, ज्यांचे विभाजन केले जाणार आहे. यामध्ये आंध्र प्रदेश राज्य बियाणे विकास महामंडळ, आंध्र प्रदेश राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ यांसारख्या महामंडळांचा समावेश आहे. त्याच वेळी या कायद्याच्या १० व्या शेड्यूलमध्ये, आंध्र प्रदेश राज्य वक्फ बोर्ड, तेलुगू विद्यापीठ, द्रविडीयन विद्यापीठ, संस्कृत अकादमी, हिंदी अकादमी, आंध्र प्रदेश पोलिस अकादमी यांसारख्या १०७ संस्था आणि प्रशिक्षण केंद्रे आहेत, ज्यांची विभागणी केली जाणार आहे. वीज बिलाची थकबाकी हाही दोन राज्यांमधील मोठा मुद्दा आहे. एका अहवालानुसार, तेलंगणावर आंध्र प्रदेशचे ७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज आहे. तेलंगणाने थकबाकी न भरल्यामुळे आंध्र प्रदेशावरील बोजा वाढत असल्याचे अहवालात म्हटले आहे. दरवर्षी आंध्र प्रदेश सरकार वीज निर्मितीसाठी बँकांना ११% व्याज देते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या प्रश्नावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. गेल्या महिन्यात तेलंगणाचे उपमुख्यमंत्री मल्लू भट्टी विक्रमार्का यांनी सांगितले होते की, सरकारने तेलंगणातील १४४ कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ राज्यात परत पाठवण्याची विनंती केली आहे. विभाजनानंतरही हे कर्मचारी आंध्र प्रदेशात कार्यरत आहेत. राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालमत्तेबाबतही दोघांमध्ये मतभेद आहेत. आंध्र प्रदेश सरकारने हैदराबाद येथील रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनच्या मालमत्तेमध्ये हिस्सा मागितला होता, परंतु तेलंगणाने नकार दिला होता. शीला भिडे पॅनलने दिलेल्या 'मुख्यालया'च्या व्याख्येनुसार ही मालमत्ता आपलीच असल्याचे तेलंगणला वाटते. राज्याचे विभाजन करून आपल्यावर अन्याय झाले असून यामुळे आंध्र प्रदेशावरील आर्थिक बोजा वाढल्याचा राज्य सरकारचा दावा आहे. आंध्रमध्ये ५८ टक्के लोकसंख्या असूनही, महसुलात फक्त ४८ टक्के वाटा दिला गेला. लोकसंख्येच्या आधारावर मालमत्तेचे वितरण केले गेले आणि दायित्वे लोकसंख्येच्या आधारावर वितरित केली गेली. राज्याची जवळपास सर्व मालमत्ता हैदराबादमध्ये होती, कारण ती सहा दशके राजधानी होती, ती तेलंगणात गेली, तर बहुतांश दायित्वे आंध्रमध्ये हस्तांतरित करण्यात आली, असे आंध्रचे म्हणणे आहे. याशिवाय आंध्रवर २४ हजार कोटी रुपयांचे कर्जही लादण्यात आल्याबाबतही नाराजी आहे.

आंध्र प्रदेशपासून वेगळे तेलंगण निर्माण करण्याची मागणी अनेक दिवसांपासून होत होती. १९७० च्या दशकात तेलंगण चळवळ सुरू झाली. अनेक हिंसक आंदोलनेही झाली, ज्यात अनेकांचा मृत्यू झाला. २००४ आणि २००९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसने तेलंगणाची निर्मिती करण्याचे आश्वासन दिले होते. पण २००९ च्या निवडणुका जिंकूनही जेव्हा यूपीए सरकारने तेलंगणाबाबत विशेष काही केले नाही, तेव्हा चंद्रशेखर राव यांनी उपोषण केले. ११ दिवसांच्या उपोषणानंतर तत्कालीन यूपीए सरकारने तेलंगण निर्मितीची प्रक्रिया सुरू करत असल्याची घोषणा केली. २०१३ पर्यंत तेलंगणाबाबतचा गदारोळ वाढला. तेलंगणातील काँग्रेस पक्षाच्या अनेक आमदार-खासदारांनी राजीनामे दिले. आंध्रमध्येही काँग्रेसबद्दल नाराजी होती, कारण येथील काँग्रेस नेत्यांना राज्याचे विभाजन नको होते. २०१३ मध्येच, यूपीए सरकारने राज्याचे विभाजन करण्यासाठी आंध्र प्रदेश पुनर्रचना विधेयक आणले, परंतु आंध्र विधानसभेत ते अपयशी ठरले. काही महिन्यांनी हे विधेयक काही सुधारणांसह आणण्यात आले. फेब्रुवारी २०१४ मध्ये हे विधेयक लोकसभेत मंजूर झाले. या काळात लोकसभेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण झाले नाही. हे विधेयक लोकसभेत मंजूर झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांनी राज्यसभेत मंजूर करण्यात आले. राष्ट्रपतींनी मार्च २०१४ मध्ये या विधेयकावर स्वाक्षरी केली. अखेर २ जून २०१४ रोजी आंध्रमधून तेलंगणा वेगळा झाला. गेल्या १० वर्षात दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी न सुटलेले प्रश्न सोडवण्यासाठी चर्चा केली. २०२० मध्ये, आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनी तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची भेट घेतली होती. यापूर्वी २०१४ ते २०१९ दरम्यान आंध्रचे मुख्यमंत्री असलेले चंद्राबाबू नायडू यांनीही केसीआर यांची भेट घेतली होती. त्यानंतर केसीआर आंध्रची नवीन राजधानी अमरावतीच्या पायाभरणी कार्यक्रमातही सहभागी झाले होते. परंतु या बैठकांमधून ठोस काही साध्य झाले नाही.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग**

शुक्रवार, दिनांक १९ जुलै २०२४
आषाढ शु. १३, श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, नक्षत्र : मूळ, योग : ऐंद्र, करण : कौलव, प्रदोष. महाराष्ट्रीय बेंदूर. सूर्याचा पुष्य नक्षत्र प्रवेश - वाहन - बेडूक. कल्याणस्वामी पुण्यतिथी (डोमगाव- परांडा), सूर्योदय : स.०६.१३ सूर्यास्त : सायं.०७.१७ वा. राहू काळ : सकाळी : १०:३० ते १२:००

**दिनविशेष**

*१५५३ : मेरी पहिली इंग्लंडच्या राणीपदी. *१८७० : फ्रान्सने प्रशियाविरुद्ध युद्ध पुकारले. *१९१२ : अमेरिकेतील हॉलब्रुक शहरावर उल्कापात.*१९६५ : सिंगमन रही, दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष.*१९३८ : डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्मदिन.*१९६९ : भारतीय चौदा बँकांचे राष्ट्रीयीकरण.*१९९३ : ग्रामीण महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल डॉ. बानू कोयाजी यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.

**राशीभविष्य**

* **मेष** : जवळच्या व्यक्तींना दुखवू नका.* **वृषभ** : पोटाची तक्रार राहील.* **मिथुन** : हौसमौज करता येईल. * **कर्क** : कामासाठी सकाळच्या वेळेत खूप धावपळ होईल.* **सिंह** : कटुंबातल्या गरजा भागवा. * **कन्या** : स्वतःच्या व कुटुंबाच्या आवडीनिवडीकडे लक्ष देऊ शकाल. * **तुळ** : मोठे आर्थिक लाभ संभवतात. * **वृश्चिक** : आर्थिक कामे सकाळच्या वेळेत करा. * **धनु** : आज केलेल्या कामाचा आर्थिक मोबदला आजच मिळेल. * **मकर** : आज मनात योजलेले काम आजच पूर्ण करू शकाल. * **कुंभ** : इतरांच्यावर कामाचा प्रभाव पडेल. * **मीन** : हौसमौज करायला पैसा उपलब्ध होईल.

**मेसेज आया**

बंड्या त्याच्या मित्राला सांगतो, 'हे बघ गण्या माझ्यासोबत आई आणि बाबा दोघेही असतील, त्यामुळे तू जा व निकाल बघून ये. एक विषय राहिला असेल तर जय हरी आणि दोन विषय गेले असतील तर 'जय हरी विठ्ठल' असे म्हण! गण्या जातो, निकाल पाहून येतो आणि म्हणतो, 'बोला पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम पंढरीनाथ महाराज की जय...'

---

दहाविचा रिझल्ट लागल्यावर झंप्या घरी येतो. थोड्या वेळाने शेजारी घरी डोकावतात.
**शेजारी** : काय रे, झंप्या किती टक्के मार्क्स मिळाले तुला?
**झंप्या** : (वैतागून नाना पाटेकर स्टाईलमध्ये) लो देखो... आ गये... मेरे (रिझल्ट का तमाशा देखने)



**व्यक्तीविशेष**

### डॉ. जयंत नारळीकर

हॉईल - नारळीकर या गुरुत्वाकर्षणाच्या नव्या सिद्धांतामुळे ओळखले जाणारे प्रसिद्ध ज्योतिर्गणिती शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक डॉ. जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. पुणे विद्यापीठात आयुका या संशोधन संस्थेचा उभारणी करणारे नारळीकर मूळचे कोल्हापूरचे. ४०० पैकी ३९९ गुण मिळवून बी.एस्सी. झालेल्या नारळीकरांनी १९६२ मध्ये केंब्रिज विद्यापीठातून पीएच.डी. संपादन केली. जडत्व हा वस्तूचा मौलिक गुणधर्म नसून, त्याचा विश्वरचनेशी संबंध आहे, असे प्रतिपादन करून डॉ. नारळीकरांनी प्रा. हॉईल यांच्या समवेत गुरुत्वाकर्षणाचा नवा सिद्धांत प्रस्थापित केला. खगोलशास्त्र, भौतिक, गुरुत्वाकर्षण, विश्वोत्पत्तिशास्त्र इ. विषयांवर अनेक संशोधनात्मक निबंध व लेख लिहिणाऱ्या नारळीकरांनी वैज्ञानिक विषयांवर सुलभ, सोप्या भाषेत हजारो व्याख्याने दिली आहेत.

**जिज्ञासा**

### हवेच्या दाबाचा शोध

साधारण १७ व्या शतकातील ही घटना आहे. त्या वेळी खनिजे खाणीतून काढण्यासाठी जमिनीचा पृष्ठभाग खोदून खूप खोलवर जावे लागत असे. खाणीत पाणी लागल्यानंतर तयाचा उपसा करावा लागे. मात्र उपसा करण्यासाठी जे पंप वापरत होते त्याद्वारे ३० फूट उंचीपर्यंतच पाणी चढले जाई. १६४० मध्ये ग्रीस देशातील फ्लॉरेन्स ड्यूक्या राजवाड्यात वरच्या मजल्यावर पाणी चढवण्यासाठी पंप बसवायचा होता. पण पाणी दुसऱ्या मजल्यावर चढवणंदेखील अवघड होतं. बराच विचार करून दरबारातील तज्ज्ञ मंडळी गॅलिलिओ या महान शास्त्रज्ञांकडे गेली. परंतु त्यांनी हे काम आपला शिष्य टॉरीसेली याला सांगितले. तोपर्यंत ॲरिस्टॉटलच्या सिद्धांतानुसार शास्त्रज्ञांची समजूत होती की पंपामुळे पोकळी निर्माण होते आणि निसर्गाला पोकळी आवडत नाही म्हणून पोकळीत पाणी वरचढत असावे. पण टॉरीसेलिला मात्र एका प्रश्नाने भेडसावले होते. निसर्गात पोकळी असू शकत नाही हा नियम केवळ ३० फूट उंचीपर्यंत लागू पडून पुढे उपयोगी का पडत नाही. या प्रश्नावर त्याने बराच विचार केला. पंपाच्या नळीत पाणी चढते म्हणजे आजूबाजूच्या हवेचे वजन पाण्यावर पडत असत आणि हवेच्या चालू असलेल्या दाबामुळे पाणी पंपात चढत असत. असा विचार केल्यानंतर त्याने एक प्रयोग केला. त्यासाठी तयाने ५० इंच लांबीची, एका बाजूने तोंड बंद असलेले काचेची नळी घेतली. त्या नळीत पारा ओतला. नळीत हवा न राहू देता ती पूर्ण भरली. आता नळीचे तोंड पंख्याने बंद करून ते पाण्याने भरलेल्या एका पेल्यात उपडे बुडवले आणि त्यानंतर नळीच्या तोंडावरील अंगठा काढून घेतला. नळीतला पारा खाली उतरून एका उंचीवर स्थिर राहिला. ३० इंच उंचीपर्यंत तो कायम राहिला आणि वरचा भाग निर्वात राहिला. नळीतील पाऱ्याचा हा स्तंभ हवेच्या दाबाने तोलला गेला होता. यावरूनच टेरिसेलिचा निर्वात प्रदेश हा सिद्धांत अस्तित्वात आला. नळीतल्या पाऱ्याची उंची कमी-जास्त होत होती कारण पाऱ्याच्या कोरड्या पृष्ठभागावरील बाहेर हवेचा दाब कमी-जास्त होत होता हेही त्यांनी स्पष्ट केले. या सिद्धांतावरूच पुढ वायूभार मापकाचा शोध लागला.



**नवं संशोधन**

### वेळेचे व्यवस्थापन

ते लोक दारु शिवाय जगत नाहीत. एकदा प्राशन केलेल्या दारुची नशा उतरली की त्यांना लगेच दुसरा प्याला प्यावा लागतो. त्यांचे शरीर सतत दारु मागते. रक्तातले अल्कोहोलचे (म्हणजे दारुचे) प्रमाण कमी झाले की हे लोक बैचेन होतात. ते दारुच्या आधीन गेलेले असतात.

तसेच काही लोक कामाच्या आधीन गेलेले असतात. त्यांचे शरीर, मन सारखे काम मागते. काहीच काम नसेल तर त्यांना चैन पडत नाही. ते टी.व्ही. वरचा एखादा छान कार्यक्रम सुद्धा मनापासून एंजॉय करु शकत नाहीत. कामापासून दूर गेले की ते बैचेन होतात. दारु पिणाऱ्या माणसाचे असेचे काहीसे अल्कोहोलबाबत होते. तसेच या लोकांचे 'वर्क' बाबत होते. म्हणून 'वर्क'च्या आहारी गेलेल्या त्या लोकांना 'वर्कोहोलिक' म्हटले जाते. तेव्हा वर्कोहोलिक होऊन सतत काम करीत राहणे म्हणजे वेळेचे व्यवस्थापन नव्हे. सतत केवळ कामच करणे हे तर वेळेचे आणि वेळेच्या संदर्भात स्वतःचे गैरव्यवस्थापन होय. असे सतत काम करणारे लोक वेळ 'सत्कारणी' लावल्याचे समाधान मानत असतील. पण अशा लोकांचे आयुष्य नक्कीच सत्कारणी लागलेले नसते. कारण कामाच्या आहारी जाऊन त्यांनी कुटुंबाला वेळ दिलेला नसतो.भरपूर वेळ काम करणारे लोकही वेळेचे व्यवस्थापन केल्याचा आव आणतात. पण पुरेशी झोप न घेता केलेले असे भरमसाठ काम त्यांच्या शरीरावर वाईट परिणाम करीत असते. काही लोक कमी झोप घेतात आणि जास्तीत जास्त वेळ काम करतात. पण त्यांची झोप अपुरी झालेली असल्याने ते ज्या वेळांत काम करीत असतात त्या वेळांत त्यांना सतत जांभया येत असतात. (क्रमशः)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक १६८

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | | 3 | |
| | 4 | 2 | 1 |
| | 3 | 1 | 2 |
| 2 | | 4 | |

क्रमांक १६७ चे उत्तर

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | 4 | 1 | 3 |
| 3 | 1 | 2 | 4 |
| 4 | 2 | 3 | 1 |
| 1 | 3 | 4 | 2 |

**महिलायन**

### निवड टी शर्टची

जीन्स आणि टी शर्ट हा सर्वच तरुणींचा अलिकडे आवडता पोशाख बनला आहे. केवळ कॉलेज तरुणी नाही तर विवाहित महिला देखील हा पोशाख मोठ्या आवडीने घालतात. अतिशय सुटसुटीत आणि आरामदायी वाटणारा हा पोशाख आधुनिक काळाशी सुसंगत ठरणाराही आहे. टी शर्ट हे आरामदायी तर असतातच पण त्यामुळे वेगवेगळा लूकदेखील आपण मिळवू शकतो.

कॅज्युअल लूकसाठी सॉफ्ट फॅब्रिकचा टी शर्ट जीन्ससोबत घालावा. यामुळे अधिक आरामदायी वाटते आणि अधिक तरुणही असल्याचे भासते. यासाठी राउंडनेक टी शर्टची निवड करावी. अलिकडे वेगवेगळे संदेश असलेले टी शर्ट अधिक पसंत केले जातात. एखाद्या चॅरिटीला आपण पाठींबा देत असल्यास तिचा लोगो किंवा संदेश देणारे टी शर्ट अलिकडे आवडीने वापरले जातात. इतकेच नाही तर आवडत्या कार्टुन कॅरॅक्टरर्सचे किंवा आपला छंद व्यक्त करणारे डिझाईन असलेले टी शर्टही हल्ली आवडीने घातले जातात. (पूर्वार्ध)



**गंमतग्यान**

### हॉट एअर बलून आकाशात कसा उडतो?

फुग्यात हवा भरून ते उडवणे यातील आनंद वेगळाच असतो. हेच तत्व लक्षात घेऊन अनेक प्रकारचे फुगे तयार झाले. ज्यांच्या सहाय्याने मुले, माणसे आकाशात उडू शकतात. हॉट एअर बलून असाच एक फुगा आहे. याच्या माध्यमातून उडण्याची वेगळीच मजा आनंदायला मिळते. हा हॉट एअर बलून हवेत कसा उडतो ? आधुनिक हॉट एअर बलुनमध्ये इंधनासाठी प्रोपेनचा वापर केला जातो. कंप्रेस्ड लिक्विड प्रोपेन कमी वजनाच्या सिलेंडरमध्ये भरून बलून बास्केटमध्ये ठेवले जाते आणि तो जाळण्यासाठी स्टीलच्या एका डीटींग कॉईलच्या माध्यमातून बर्नरशी जोडले जाते. (पूर्वार्ध)



'राष्ट्र संचार' हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com




# प्राचीन जहाजाचा शोध



तेल अवीव : इस्रायलच्या किनाऱ्यापासून ९० किलोमीटर उत्तरेला समुद्रात २ हजार मीटर खोलीवर संशोधकांना एका जहाजाचे अवशेष आढळून आले. हे जहाज तब्बल ३,३०० वर्षांपूर्वीचे आहे. या जहाजाच्या अवशेषांमधून अनेक प्राचीन भांडी व अन्य वस्तू मिळाल्या आहेत. कांस्य युगातील या जहाजाची लांबी ४० फुटांची आहे. गेल्यावर्षी लंडनच्या एका गॅस कंपनीने रोबोच्या माध्यमातून या जहाजाचा छडा लावला होता. आता या जहाजाचा ठावठिकाणा पाहून त्यामधील अनेक वस्तू पाण्याबाहेर काढण्यात आल्या आहेत. भूमध्य समुद्रात इतक्या खोलीवर शोधण्यात आलेले हे सर्वात जुने जहाज ठरले आहे. प्राचीन काळातील नाविक खोल समुद्रातही जलप्रवास करीत होते, हे यावरून दिसून आले. हे जहाज सागरी वादळामुळे किंवा समुद्री चाच्यांच्या हल्ल्यात बुडाले असावे, असा अंदाज आहे. इस्रायलमधील पुरातन प्राधिकरणाच्या सागरी विभागाचे प्रमुख जेकब शार्विट यांनी याबाबतची माहिती दिली. हा एक महत्त्वपूर्ण शोध असल्याचे त्यांनी सांगितले. या जहाजातील मोठ्या आकाराच्या सुरया किंवा 'एम्फोरा' बाहेर काढण्यात आल्या आहेत. या सुरया किंवा जग अंडाकार असून, त्यांची मान अरुंद आहे. या सुरयांना दोन मुठीही आहेत. तेल, मद्य किंवा फळे नेण्यासाठी, साठवण्यासाठी अशा सुरयांचा वापर केला जात असे.

# एक जोडपे... अतिपगारामुळे चिंतेत






एकीकडे अनेकांना दोन वेळेच्या जेवणाचीही भ्रांत असताना, दुसरीकडे अनेकांना पैसा कसा खर्च करावा, याची काळजी लागते! बंगळूरमधील एक दाम्पत्य दर महिन्याला सात लाख रुपये कमावते. ऐशोरामात राहूनही बराच पैसा शिल्लक पडतो, त्यामुळे तो कसा खर्च करावा? अशी पोस्ट त्यांनी सोशल मीडियात केली आहे !

हे दोघे पती-पत्नी बंगळूरमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करतात. त्यांनी लिहिले आहे की, आम्हाला अपत्य नाही. मासिक कमाई सात लाख रुपये आणि त्यामध्ये वार्षिक बोनसही समाविष्ट आहे. त्यामधील दोन लाख रुपये म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करतो. सर्व मिळून दर महिन्याचा खर्च दीड लाख रुपये आहे. बंगळूरमध्ये एका चांगल्या सोसायटीमध्ये राहतो. कार आहे, खर्च करण्याआधी विचार करीत नाही. इतकं असूनही बँक खात्यात तीन लाख शिल्लक राहतात. हे पैसे कसे खर्च करायचे हे माहिती नाही. आम्ही दोघेही फारसे शौकीन नाही, जिथे आम्ही पैसे खर्च करू. त्यामुळे आम्हाला अधिक कमावण्याची लालसाही नाही. यावर उपाय सांगा, असे त्यांनी लोकांना विचारले आहे. 'एक्स'वर याचा स्क्रीनशॉट शेअर करण्यात आला आहे. त्यावर अनेकांचे भन्नाट रिप्लायही येत आहेत !

# घास बत्तीस वेळा का चावावा?



आपण नेहमी वयस्कर व्यक्तींकडून ऐकत आलो आहोत की, जेवण करताना घास नेहमी ३२ वेळेस चावून खावा. अनेकांना वाटते की, तोंडात ३२ दात असतात व त्यामुळे असे म्हटले जात असावे. खरे तर ३२ वेळेला नसले तरी जेवण चांगल्या प्रकारे चावून खाणे गरजेचे आहे, असेच यामधून सुचवले जात असते. सध्याच्या घाईगडबडीच्या जगात अनेक लोक अक्षरशः बकाबक खाऊन आपल्या कामासाठी धावत असतात. असे घाईगडबडीत खाणे, नीट चावून न खाणे शरीरासाठी हानिकारक ठरत असते. नीट चावून खाल्ले की, जेवणाचा आनंदही मिळतो आणि अन्नात लाळ मिसळून पचनासाठीही मदत होते. एक घास '३२ वेळा' चावून खाण्याचे हे काही लाभ...

पाचन तंत्र सुधारते : जेवण जेवढे अधिक चावून खाल, ते तेवढेच छोट्या छोट्या तुकड्यांमध्ये बदलते. यामुळे पोटामध्ये पाचन क्रिया सुधारण्यास मदत मिळते. तसेच जेवण चांगल्या प्रकारे पचते.

जीवनसत्त्वे आणि खनिजे चांगल्या प्रकारे मिळतात – जेवण चावून खाल्ल्यामुळे जेवणातील पोषकतत्त्वे चांगल्या प्रकारे शोषून घेतली जातात. त्यामुळे शरीराला आवश्यक जीवनसत्त्वे व खनिजे मिळतात. हळूहळू जेवण केल्यास आणि अधिक चावून खाल्ल्यास पोट भरल्याची जाणीव होते व वजन नियंत्रणात राहते.



# चहावाला नागपूरचा, टपरी मालदीवमध्ये!

नागपूरकर असलेला डॉली चहावाला देशभर प्रसिद्ध झाला आहे. परंतु, त्याच्या टपरीवर काही महिन्यांपूर्वी अब्जाधीश व्यक्ती अन् मायक्रोसॉफ्ट कंपनीचे मालक बिल गेटस् आले. त्यांनी त्याने बनवलेल्या चहाचा स्वाद घेतला. त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवर त्याच्यासोबतची पोस्ट टाकली. त्यानंतर डॉली जगभर प्रसिद्ध झाला. सोशल मीडियावर त्याचे यूझर्स लाखोच्या संख्येने झाले. आता डॉलीने १६ जून रोजी त्याच्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ अपलोड केला आहे. त्यानंतर त्याचा चहा जगभरात प्रसिद्ध झाल्याच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. डॉली चहावाल्याने चक्क मालदीवमधील समुद्रकिनारी टपरी लावल्याचा हा व्हिडीओ आहे. व्हायरल व्हिडीओमध्ये डॉली चहावाला मालदीवमधील समुद्रकिनारी चहा बनवताना दिसत आहे. त्यानंतर विदेशी पर्यटकांना तो चहा देताना दिसत आहे. काहीजण कौतुकाने हा काय करत आहे, ते पाहत आहेत. त्यानंतर काहीजण त्याच्यासोबत फोटोही घेताना दिसत आहेत. डॉलीचा मालदीवमधील हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. डॉलीने त्याच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवर हा व्हिडीओ १६ जून रोजी शेअर केला आहे. त्याने इन्स्टाग्राम अकाऊंटवर मालदीव वाईब्स कॅप्शन देऊन हा व्हिडीओ शेअर केला आहे. एका दिवसातच हा व्हिडीओ लाखो लोकांनी पाहिला आहे. अडीच लाखांपेक्षा अधिक लोकांनी त्याला लाईक केले आहे. त्याच्यावर हजारो जणांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी डॉलीच्या दुबई दौऱ्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर धुमाकूळ घालत होता. आता मालदीव दौऱ्याचा व्हिडीओ चर्चेत आला आहे.


# धावत्या कारमध्ये स्विमिंग पूल !



रस्त्यावर चालत्या वाहनांमधून स्टंट करणारे अनेक महाभाग असतात. अशा 'सोशल मीडिया इंफ्लुएंसर्स'ना धडा शिकवणारी एक घटना केरळमध्ये घडली आहे. तिथे काही तरुणांनी चालत्या वाहनात स्विमिंग पूल बनवून त्याचा व्हिडीओ बनवला होता. आता केरळच्या मोटार वाहन विभागाने या यूट्यूब इंफ्लुएंसरचा वाहन परवाना कायमचा रद्द केला आहे!

या तरुणाचे नाव संजू टेक्की असे आहे. त्याने यूट्यूबवर काही दिवसांपूर्वी एक व्हिडीओ शेअर केला होता. त्यामध्ये तो आपल्या मित्रांसमवेत चालत्या गाडीत एका लहान मुलासह अस्थायी स्विमिंग पूलमध्ये डुंबत असल्याचे दिसून आले होते. केरळच्या मोटार वाहन विभागाने यापूर्वी संबंधित वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र निलंबित केले होते. आता विभागाने रस्त्यावर चालत्या वाहनामध्ये स्टंट केल्याबद्दल या यूट्यूबरचे ड्रायव्हिंग लायसेन्सही रद्द केले आहे. संजू टेक्की आता कधीही नवे ड्रायव्हिंग लायसेन्स मिळवू शकणार नाही. हे वाहन चालवणाऱ्या त्याच्या मित्राचे लायसेन्सही निलंबित करण्यात आले आहे. उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान संजू टेक्की अलाप्पुझा मोटार वाहन प्रवर्तन आरटीओद्वारे त्याच्या व्हिडीओ स्टंटबाबत मागितलेल्या स्पष्टीकरणाबाबत समाधानकारक उत्तर देऊ शकला नव्हता. रस्त्यावर अशाप्रकारचे स्टंट करणाऱ्या अन्य सर्व इंफ्लुएंसर्सना सावधान करण्यासाठी संजूवर कडक कारवाई केल्याचे विभागाने म्हटले आहे.


# चर्चा आजीबाईंच्या व्यायामाची



उतारवयातही उत्साही, ऊर्जावान आणि शारीरिक तंदुरुस्तीबाबत सजग असलेले अनेक लोक आहेत. ही मंडळी तरुणाईलाही नवी प्रेरणा देत असतात. सध्या अशाच एका आजीबाईंचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये ७५ वर्षांची आजी घरीच तगडा व्यायाम करताना दिसत आहे. आजीची ऊर्जा पाहून अनेक लोक अवाक् झाले. सध्या हा व्हिडीओ चांगलाच चर्चेत आला आहे.

या व्हायरल व्हिडीओमध्ये तुम्हाला दिसून येईल की, आजी व्यायाम करत आहे. घरच्या घरी उत्साहाने त्या व्यायाम करीत आहेत. कधी भिंतींचा आधार घेऊन आजी व्यायाम करते, तर कधी घरातील वस्तू उचलून व्यायाम करते. या आजीचे वय ७५ वर्षे आहे, पटणारही नाही! या वयातही आजीची इच्छाशक्ती आणि ऊर्जा पाहून कोणीही थक्क होईल. एका इन्स्टाग्राम अकाऊंटवरून हा व्हिडीओ शेअर करण्यात आला असून, या व्हिडीओच्या कॅप्शनमध्ये लिहिलेय, '७५ वर्षांची आहे, व्यायाम हा कोणत्याही वयासाठी चांगला आहे. तुम्हाला सल्ला देईल की, आठवड्यातून एकदा तरी व्यायाम करावा. यामुळे तुम्ही स्वतःला आजारांपासून सुरक्षित ठेवता आणि त्याचबरोबर पालकांसाठीसुद्धा हे खूप फायदेशीर आहे.' या व्हिडीओवर अनेक यूझर्सनी प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका यूझरने लिहिलेय, 'कलियुग आहे. वृद्ध लोक हिंमत दाखवतात आणि आमच्यासारखे युवा झोप घेत आहेत. आमची झोप पूर्ण होत नाही.' तर एका यूझरने लिहिलेय, 'आपण सुरुवात तरी करायला पाहिजे.' आणखी एका यूझरने लिहिलेय, 'खूप छान, आपल्या शरीराची काळजी ही आपण घेतली पाहिजे.' या व्हिडीओवर अनेक यूझर्सनी हार्टचे इमोजी शेअर केले आहेत. काही यूझर्सनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. अनेक यूझर्सनी आजीकडून आपण युवा पिढीने शिकायला पाहिजे, असे लिहिलेय.

# पक्ष्यांच्या उष्ण रक्तावर नवा प्रकाश



आधुनिक पक्ष्यांचा विकास हा डायनासोरपासून, विशेषतः उडू शकणाऱ्या डायनासोरपासून झाला असे मानणारा मोठा वर्ग आहे. मात्र, डायनासोर हे सरीसृप वर्गात येतात. डायनासोर हे मोठ्या आकाराचे सरडे होते. मात्र, सध्याचा काळ विचारात घेतला तर सरड्यांपेक्षा पक्ष्यांची शारीरिक वैशिष्ट्ये वेगळी आहेत. पक्षी हे सस्तन प्राण्यांप्रमाणेच उष्ण रक्ताचे असतात. जर पक्ष्यांची उत्पत्ती डायनासोरपासून झाली तर ते सरड्यांप्रमाणे थंड रक्ताचे नसून उष्ण रक्ताचे कसे, असा प्रश्न अनेकांना पडू शकतो. याचे उत्तर संशोधकांनी दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार पक्षी हे तांत्रिकदृष्ट्या डायनासोरच आहेत, जे ६६ दशलक्ष वर्षांपूर्वीच्या त्या महाविनाशातून बचावले. मात्र, ते सध्याच्या काळातील बहुतांश सरीसृपांप्रमाणे थंड रक्ताचे नाहीत. याचे स्पष्ट कारण हेच आहे की, बहुतांश डायनासोर हे उष्ण रक्ताचेच होते!


पक्ष्यांची उत्पत्ती ही दोन पायांच्या 'थेरोपॉड्स' नावाच्या डायनासोरपासून झाली. याच कुळात महाकाय मांसाहारी डायनासोर प्रजाती 'टी-रेक्स'चा तसेच तीन फूट लांबीच्या लहान 'मोनोनायकस'चाही समावेश होतो. सस्तन प्राण्यांप्रमाणे पक्षीही उष्ण रक्ताचे किंवा एंडोथर्मिक म्हणजेच स्वतःच अंतर्गत यंत्रणेने शरीराचे तापमान नियंत्रित करणारे जीव आहेत. एंडोथर्मिक प्राण्यांमधील चयापचय क्रिया वेगवान असते. त्यामुळे ते अधिक क्रिया करू शकतात जसे की आकाशात उडणे. मात्र, त्यांना यासाठी अधिक कॅलरीजची आवश्यकता असते. ओक्लाहामा स्टेट युनिव्हर्सिटीतील ॲनाटोमी ॲंड पॅलिओंटोलॉजीचे प्राध्यापक हॉली वूडवर्ड यांनी सांगितले की, जे प्राणी उष्ण रक्ताचे असतात ते सहसा अधिक सक्रिय असतात. ते रात्रीही सक्रिय राहू शकतात. त्यामुळे त्यांना अन्न मिळवण्यात इतरांसारखी अडचण येत नाही. पक्ष्यांमध्ये त्यांच्याइतक्याच आकाराच्या सस्तन प्राण्यांच्या तुलनेत चयापचय क्रियेचा वेग अधिक असतो. ते आपल्या शरीराचे तापमान ४१ ते ४३ अंश सेल्सिअस म्हणजेच १०६ ते १०९ अंश फरेनहाईट दरम्यान ठेवतात. हमिंगबर्ड हे चिमुकले पक्षी मिनिटाला ७२० ते ५४०० वेळा आपले पंख हलवतात. त्यांना त्यासाठीची ऊर्जा मिळवण्यासाठी दर दहा ते पंधरा मिनिटांनी खायला हवे असते. याउलट थंड रक्ताचे प्राणी किंवा एक्टोथर्म्स असतात ज्यामध्ये आधुनिक सरीसृप व माशांचा समावेश होतो. ते आपल्या शरीराचे तापमान बदलण्यासाठी आजूबाजूच्या वातावरणावर अवलंबून असतात. त्यांना स्वतः चे तापमान वाढवण्यासाठी अधिक ऊर्जा खर्च करावी लागत नाही. त्यामुळे त्यांना सतत खावेही लागत नाही. उदा. मगरी एक वर्षपिक्षाही अधिक काळ अन्नाशिवाय जगू शकतात. प्राचीन काळातील पक्षीही उष्ण रक्ताचेच होते असे आढळलेले आहे.



# शोध डझनभर नवजात ताऱ्यांचा

जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपने डझनभर नवजात ताऱ्यांचा शोध लावला आहे. या ताऱ्यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते सगळेच एका विशिष्ट दिशेनेच वायू उत्सर्जित करीत आहेत. तारे कसे बनतात हे समजून घेण्यासाठी हा शोध महत्त्वपूर्ण ठरेल, असे संशोधकांना वाटते.

हे सर्व तारे ज्या ठिकाणी जन्मले आहेत त्या 'नर्सरी'त एकाच दिशेने अतिशय वेगाने वायूंचे उत्सर्जन करीत आहेत. त्याचे नेमके कारण संशोधकांना समजलेले नाही. नवजात तारे वायूंचे मोठ्या प्रमाणात उत्सर्जन करतात हे आधीपासूनच संशोधकांना ठावूक होते. 'प्रोटोस्टेलर आऊटफ्लोज' या अनेक वर्षांपासून अभ्यासल्या गेलेल्या विषयाचे हे प्रत्यक्ष दृश्य आता दिसून आले. असे तारे ज्या वायूंच्या ढगाने वेढलेले असतात त्यामध्ये हे वायू उत्सर्जित होतात व हा वायू अशा वायूच्या ढगांना धडकतो. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'ॲस्ट्रोफिजिकल जर्नल'मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. 'नासा'च्या जेट प्रॉपल्शन लॅबोरेटरीमधील मुख्य संशोधक क्लॉस पोंटोपिडन यांनी सांगितले की, ढगच एकमेकांना धडकून तारे बनतात असे दीर्घकाळापासून मानले जात होते. तारे त्याच दिशेने फिरत असतात. मात्र, याबाबतचे प्रत्यक्ष प्रमाण दिसून आले नव्हते.



# पिऱ्हानसदृश नवी मत्स्यप्रजाती

ॲमेझॉन नदीत पिऱ्हानासारख्या माशाची एक नवी प्रजाती आढळून आली आहे. या माशाच्या तोंडात माणसाच्या दातांसारखे दात असून, 'द लॉर्ड ऑफ द रिंग्ज'मधील सौरोनसारखे त्याचे डोळे आहेत. या माशाला 'पाकु' असे संबोधले जाते. मात्र, त्याला चित्रपटातील सौरोनवरूनच वैज्ञानिक नाव देण्यात आले असून ते 'मायलोप्लस सौरोन' असे आहे. हे पाकु मासे पिऱ्हानाचेच अगदी जवळचे नातेवाईक आहेत. त्यामुळे पिऱ्हाना आणि या माशामध्ये बऱ्याच वेळा गफलत होते. संशोधक ज्यावेळी तशीच एक मत्स्य प्रजाती 'एम. शोम्बुगकी'चा अभ्यास करीत असताना या नव्या मत्स्य प्रजातीचा शोध लागला. खरे तर हे मासे १८४१ मध्येच अमेझॉन नदीत शोधण्यात आले होते. मात्र, संशोधकांनी त्यावेळेपासूनच ही एक वेगळीच प्रजाती आहे याकडे दुर्लक्ष केले होते. आता या माशावर नवे संशोधन झाले असून, त्याची माहिती 'निओट्रॉपिकल इचथायोलॉजी' मध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. संशोधकांनी एम. शोम्बुर्गकी या माशाच्या जनुकीय रचनेचा अभ्यास केल्यावर दिसून आले आहे की, एम. शोम्बुर्गकी, एम. सौरोन आणि एम. एलन्स या तीन वेगवेगळ्या प्रजाती आहेत. अगदी बारकाईने निरीक्षण केल्यावर या तिन्ही प्रजातींच्या माशांच्या शारीरिक रचनेतही सूक्ष्म फरक असल्याचे दिसून आले.

# आहारात डाळी का गरजेच्या?



शरीरातील प्रोटिन्स म्हणजेच प्रथिनांचे प्रमाण योग्य राखण्यासाठी आपल्या आहारात डाळीचा समावेश करणे आवश्यक आहे. डाळी हा प्रथिनांचा प्रमुख स्त्रोत आहे. विशेषतः शाकाहारी लोकांसाठी, जे मांस आणि मासे खात नाहीत, त्यांच्या आहारात कडधान्यांचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे. प्रथिनांसह, डाळींमध्ये फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजेदेखील असतात, जे आरोग्यासाठी आवश्यक असतात. डाळीच्या सेवनाने शरीरातील स्नायू, हाडे आणि त्वचेचे आरोग्यही चांगले राहते. या डाळी प्रोटिन्सचा खजिनाच असतात.

सोयाबीन : सोयाबीन खाणे आरोग्यासाठी खूप चांगले मानले जाते. यामध्ये प्रथिने तसेच जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात असतात.

लाल मसूर : मसूर डाळीमध्ये प्रथिने चांगल्या प्रमाणात असतात. ती येगवेगळ्या प्रकारच्या पदार्थांमध्ये देखील वापरली जाते.

राजमा: राजमा भात हा जवळजवळ प्रत्येकाचा आवडता पदार्थ आहे. या 'किडनी बीन्स' खाण्याचे अनेक आरोग्यासावी फायदे आहेत, कारण, ते प्रोटीनचा खूप चांगला स्त्रोत आहे.

हरभरा: चणाडाळ म्हणजेच हरभऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असतात, ज्यामुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. सॅलड्स, सूप आणि करी यांसारख्या वेगवेगळ्या पदार्थांमध्ये हरभरा वापरला जाऊ शकतो.

उडीदडाळ : उडीदडाळ भातासोबत खायला अनेकांना आवडते. हे मुख्यतः दुपारच्या जेवणाच्या वेळी केले जाते. उडिदाच्या डाळीमध्ये प्रथिनांचे प्रमाणही चांगले असते आणि ते उच्च प्रथिन स्त्रोत म्हणून ओळखले जाते.

मूगडाळ : मूगडाळ ही प्रोटीनचा एक चांगला स्त्रोत आहे ती खाल्ल्याने तुमच्या शरीराला आवश्यक प्रोटिन्स मिळू शकते. मूगडाळ किंवा खिचडी म्हणून तयार करून खाऊ शकता.

तूरडाळ: तूरडाळ आणि भात हे अनेक लोकांचे आवडते जेवण आहे. डाळीमध्ये प्रथिने, फायबर आणि इतर पोषक घटकदेखील असतात. ही डाळ खाल्ल्याने अनेक प्रकारच्या आजारांपासून आपला बचाव होतो.

## विठ्ठल विठ्ठल! गजर विठूरायाचा

# आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलगीतांची रंगली मैफील

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** 'विठ्ठल नामाचा हो टाहो...', 'हरी भक्तीचा भुकेला...', 'अवघे गरजे पंढरपूर, चालला नामाचा गजर...', 'गोड तुझे रूप.. गोड तुझे नाम...', अशा भक्तिगीतांमध्ये आकुर्डी, निगडी प्राधिकरणातील भाविकांना साक्षात पांडुरंगाच्या भक्तीची अनुभूती अनुभवायला मिळाली. आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला आयोजित 'विठ्ठल ठायी ठायी' अर्थात 'पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती' या विठ्ठलगीतांच्या मैफलीत श्रोते भक्तिरसात तल्लीन झाले.



स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ आणि अनुप मोरे सोशल अ‍ॅण्ड स्पोर्ट्स फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक १६ जुलै २०२४ रोजी निगडी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात भक्तिगीतांचा कार्यक्रम पार पडला. यावेळी पिंपरी - चिंचवड शहराच्या माजी उपमहापौर शैलजा मोरे, माजी नगरसेविका शर्मिला बाबर, सामाजिक कार्यकर्ते सलीम शिकलगार, सामाजिक कार्यकर्ते अविनाश मोरे, राजेंद्र बाबर, मनोज देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे अध्यक्ष विश्वनाथन नायर, कार्याध्यक्ष रमेश बनगोंड, सचिव सागर पाटील, प्रदीप पाटील, ज्योती कानेटकर, चंद्रशेखर जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. विठ्ठलगीतांची अनुभूती घेण्यासाठी प्राधिकरणातील श्रोत्यांनी नाट्यगृह तुडुंब भरले होते.

सर्वत्र आषाढसरी कोसळत असताना ज्ञानेश्वरमाउली, जगद्गुरू संत तुकोबा, संत एकनाथ महाराज, नामदेव महाराज, संत जनाबाई या संतांच्या मांदियाळीपासून ते जगदीश खेबुडकर, पी. सावळाराम, योगेश्वर अभ्यंकर या कवींच्या प्रासादिक रचनांना संगीतकारांनी स्वरसाज चढवून आणि लता मंगेशकर, भीमसेन जोशी, आशा भोसले, किशोरी अमोणकर, सुरेश वाडकर अशा दिग्गज गायकांनी गाऊन अजरामर केलेल्या भक्तिरचनांच्या वर्षावात भाविक चिंब झाले.

डॉ. शशिकला शिरगोपीकर, गौतम मुर्डेश्वर, कुमार करंदीकर, श्रुती करंदीकर, गायत्री सप्रे-ढवळे, सीमा शिरगोपीकर या गायक कलाकारांनी अतिशय तन्मयतेने गायलेल्या लोकप्रिय भक्तिगीतांनी भाविक श्रोत्यांचे वन्स मोअर मिळविले.

त्याचवेळी व्यासपीठावर मृणाल भोंगाळे यांनी आपल्या मूर्त-अमूर्त शैलीतील चित्रकलेतून विठ्ठलाची विविध रूपं साकारून मैफलीची रंगत वाढविली; तर गौरी फडके, राधिका देशपांडे, मंजिरी भाके, शशी यादव, पूर्वा साळुंखे, दर्शनी ठाकूर, गीता कुलकर्णी, गायत्री कुलकर्णी, वैदेही शिंदे, जान्हवी मर्ढेकर, आमरुनी पाटील यांच्या पारंपरिक वेशभूषेतील नृत्याविष्काराने आणि अरुण गवई (तबला), विनीत तिकोनकर (पखवाज), अनय गाडगीळ (की बोर्ड), धनंजय साळुंखे (तालवाद्य) यांनी नेटकी साथसंगत करीत मैफलीला श्रवणीय केले.

स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ, अनुप मोरे सोशल अ‍ॅण्ड स्पोर्ट्स फाउंडेशन, प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ, सुसंगती ज्येष्ठ नागरिक संघ, नुपूर नृत्यालय आणि नृत्यांजली कथ्थक क्लास या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी संयोजनात सहकार्य केले. स्नेहल दामले यांनी आपल्या रसाळ निवेदनाने श्रोत्यांची विशेष दाद मिळविली.

» Selected



## मोहरमनिमित्त भोसरीत ताजिया मिरवणूकीचे आयोजन

**भोसरी :** मोहंमद पैगंबरांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि हसन यांच्या बलिदानाच्या स्मृतिप्रित्यर्थ भोसरीत मोहर्रम ताजियाची मिरवणूक काढण्यात आली. भोसरीतील दिघी रस्त्यावरील गवळीनगर, संविधान चौक, चांदणी चौक, पीसीएमसी चौक, भोसरी गावठाणातील मधले फुगे तालीम मंडळ, लांडगे आळी, मारुती मंदिर, पीएमटी चौक, धावडे आळी या मार्गाने मोहर्रम ताजियाची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भोसरी ग्रामस्थांनी आणि मंडळांनी ताजियाचे जागोजागी स्वागत केले. मुस्लिम बांधवांसह सर्वधर्मीयांनी ताजियाचे दर्शन घेतले. सामाजिक कार्यकर्ते सचिन लांडगे, शेखर गव्हाणे, संदीप गव्हाणे आदींनी ताजियाला चादर अर्पण केली. वैष्णव विचार कीर्तन महोत्सव समितीद्वारेही मोहर्रम ताजियाचे स्वागत करण्यात आले. मिरवणुकीत कासम सय्यद, करीम सय्यद, हुसेन सय्यद, अब्बास सय्यद, सलीम शेख, शफीक सय्यद, मुस्ताक सय्यद, फिरोज सय्यद, शकील सय्यद, समृद्दीन शेख आदींसह मुस्लिम बांधव बहुसंख्येने सहभागी झाले. यावेळी उपस्थितांना सरबताचे वाटप करण्यात आले. या मिरवणुकीनंतर ताजियाचे मोशीतील इंद्रायणी नदीत विसर्जन करण्यात आले.

## कामशेत-पवनानगर रस्त्यावर चिखल, वाहनचालक त्रस्त



**पिंपरी :** कामशेत पवनानगर रोडच्या कडेला चालू असलेल्या ड्रेनेजलाइनचे काम सुरु आहे. या कामासाठी खोदकाम करण्यात आले असून सर्व माती रस्त्यावर टाकण्यात आल्याने संपूर्ण रस्त्यावर चिखल झाला आहे. यामुळे दुचाकी घसरुन अपघाताचा धोका निर्माण झाला आहे तसेच वाहनांमुळे चिखल उडत असल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काम चालू असलेले कोणतेही निर्देशक फलक लावलेली नाही कोणतेही प्रकारची साइड पट्टी लावलेली नाही. रोजरोसपणे रोडवर चिखल टाकला जात आहे. पावसाळ्यापूर्वी सुरू झालेले काम तात्काळ पूर्ण व्हायला हवे होते. मात्र संथ गतीने हे काम चालू असल्यामुळे याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कामशेत पवनानगर रोडवर चालू असलेल्या गटारीच्या कामामुळे तो चिखल रोडवर आल्याने दुचाकी स्वार स्लीप होऊन अपघात होण्याची शक्यता आहे.

## लाडकी बहीण योजनेसाठी ऑफलाईन अर्ज स्विकृती

**पिंपरी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेने बुधवार (ता.१७) पासून ऑफलाइन अर्ज स्वीकृती प्रक्रियेला सुरुवात केली. सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी अर्ज स्वीकृती केंद्रे चालू आहेत. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण भरलेला अर्ज या केंद्रांवर सादर करावा, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी केले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. या योजनेच्या सुविधा केंद्रांवर पात्र लाभार्थ्यांची गर्दी होऊ नये तसेच नागरिकांचा वेळ वाचावा यासाठी ऑफलाइन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत. त्यानुसार, महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी स्वतंत्रपणे ऑफलाइन अर्ज स्वीकृती केंद्रे स्थापित करण्यात आली आहेत. या केंद्रांवर सकाळी ७ ते रात्री ९ या वेळात अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असेल. त्यासाठी सर्व केंद्रांवर दोन पाळींमध्ये (शिफ्ट) ८३ कर्मचारी नियुक्त केले आहेत.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## डेंग्यूला रोखण्यासाठी मनपाने उपयोजना कराव्यात

**पिंपळे सौदागर :** पिंपरी - चिंचवडमध्ये डेंगूचे रुग्ण वाढत असून त्याला आळा घालण्यासाठी मनपा प्रशासनाने योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी केली आहे. यासंदर्भात मनपा आयुक्त शेखर सिंह यांना मंगळवार दि. १६ रोजी नाना काटे यांनी निवेदन दिले आहे. शहरात सार्वजनिक तसेच वैयक्तिक ठिकाणी झाडांच्या कुंड्या, पशु - प्राण्यांना पाणी पिण्यासाठी ठेवण्यात आलेली भांडी, फुटके टायर, मोकळे डब्बे आदि ठिकाणी साठलेल्या पाण्यात डेंगूच्या डासांची उत्पत्ती होत असून त्याचा नागरिकांना प्रादुर्भाव होत आहे. मनपाचे याकडे दुर्लक्ष होत असून त्यामुळे शहरात डेंगूचे रुग्ण वाढत चालले आहेत. मनपाच्या आरोग्य यंत्रणेने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. विनाकारण पाण्याची साठवणूक करुन योग्य ती काळजी न घेणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, डेंगूबाधित रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता त्यावर उपचार करणारी यंत्रणा अधिक सक्षम करण्यात यावी आणि मनपाच्या रुग्णालयात डेंग्यूची लागण झालेल्या रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार करण्यात यावेत असेही नाना काटे यांनी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



## पुण्यतिथी...

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित पोवाडा रशियामध्ये सादर करून आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची ओळख निर्माण करणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य सुवर्णाक्षरात लिहिण्यासारखे असून त्यांचा सामाजिक व साहित्यविषयक वारसा भावी पिढीने जोपासावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस तसेच निगडी येथील पुर्णाकृती पुतळ्यास अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

अभिवादन प्रसंगी उप आयुक्त आण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन घोलप, सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब आडागळे, संदीपान झोंबाडे, मनोज तोरडमल, सुनील भिसे, सतिश भवाळ, अरुण जोगदंड, संजय ससाणे, भगवान शिंदे, सुरेश जोगदंड, संदीप जाधव, संजय धुतरमल, यादव खिलारे, युवराज दाखले, मयूर गायकवाड, एस.डी हांडे, एस.ए वाघमारे, छाया सुरवसे, मनोरंजना आदी उपस्थित होते.

## तक्रार आल्यास नियमानुसार कारवाई

# विशेष रजा मंजुरीचा मार्ग अखेर मोकळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी किंवा कर्मचारी यांनी स्वतः क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग अथवा पक्षाघात आदी आजारांनी ग्रस्त असल्यास आवश्यक ती कागदपत्रे तपासून देय असणारी विशेष रजा नियमानुसार मंजूर करून घ्यावी. याबाबत तक्रारी आल्यास संबंधित अधिकारी अथवा कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात येईल, अशा सूचना महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट तीनमधील नियम ७९ मध्ये क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग अथवा पक्षाघात इत्यादी आजारांबाबत रजेच्या तरतुदी नमूद केलेल्या आहेत. या रजेच्या तरतुदी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना लागू आहेत. परंतु, पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील जे कर्मचारी क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग अथवा पक्षघात इत्यादी आजाराने ग्रस्त आहेत, अशा कर्मचाऱ्यांच्या रजा तसेच त्यांना नियमानुसार देय असणारी विशेष रजा मंजूर केल्या जात नसल्याच्या काही तक्रारी आल्या आहेत. याबाबत पालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने कडक भूमिका घेतली आहे. महापालिकेतील सामान्य प्रशासन विभागाकडून या संदर्भात स्वतंत्र परिपत्रक निर्गमित केले आहे.

तरतुदीनुसार आवश्यक कागदपत्रे तपासून देय असणारी विशेष रजा नियमानुसार मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात यावी, याबाबत कर्मचाऱ्यांची तक्रार आल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असा इशारा परिपत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

### काय आहे नियम?

● महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ च्या परिशिष्ट तीन मधील नियम ७९ मध्ये क्षयरोग, कर्करोग, कुष्ठरोग अथवा पक्षघात इत्यादी आजाराबाबत रजेच्या तरतुदी नमुद केलेल्या आहेत,या रजेच्या तरतुदी अधिकारी आणि कर्मचा-यांना लागू आहेत.



# अनधिकृतरीत्या वायर जोडताना एकजण जखमी

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** वेल्डिंग करण्यासाठी महावितरणच्या फिडर पिलरमधून अनधिकृत वेल्डिंग मशिनची वायर जोडताना विजेच्या धक्क्याने एकजण जखमी झाला.

ही घटना आकुर्डी येथे मंगळवारी (ता. १६) घडली. आकुर्डी येथील मयूर समृद्धी फेज-२ मध्ये फाटक उभारण्याचे काम सुरू आहे.

त्याच ठिकाणी महावितरणच्या उच्चदाब २२ केव्ही बजाज वीजवाहिनीचा फिडर पिलर आहे. मंगळवारी सकाळी बाराच्या सुमारास फाटकाचे वेल्डिंग करण्यासाठी एका कामगाराने २२ केव्ही फिडर पिलरचा दरवाजा उघडून अनधिकृत वीजवापर करण्यासाठी वेल्डिंग मशिनची वायर जोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, या प्रयत्नात कामगाराला विजेचा धक्का बसल्याने तो जखमी झाला. या जखमी कामगारावर पिंपरीतील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयात (वायसीएम) उपचार सुरू आहेत.

## महापालिका करणार दीड कोटीचा खर्च

# मेट्रोच्या विस्तार मार्गावरील पथदिवे, सिग्नल हटविणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरीहून निगडीपर्यंत मेट्रोचे विस्तारीकरण काम सुरू झाले आहे. या मार्गावर मेट्रो पिलरला अडथळा ठरणारे पथदिवे, ट्रॅफिक सिग्नल काढण्यात येणार आहेत. या कामात अडथळा ठरणारे पथदिव्यांचे खांब, ट्रॅफिक सिग्नल हटविण्यात येणार आहेत. याकरिता महापालिकेकडून १ कोटी ४७ लाख ३० हजार रुपये खर्च करणार आहे. हा खर्च महापालिका नंतर महामेट्रोकडून वसूल करणार आहे.



चिंचवड स्टेशन येथील मदर टेरेसा उड्डाणपूल ते निगडी येथील भक्ती-शक्ती समूह शिल्प चौकापर्यंत ४.५१९ अंतर मार्गिका बांधण्यात येत आहे. मार्गिकेच्या व्हायाडक्टचे काम मेट्रोने सुरू केले आहे. त्यातील पहिल्या पिलरच्या काँक्रिटीकरणाचे काम निगडी येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे बस स्थानक येथे करण्यात आले आहे. या मार्गावर महापालिकेने उभारलेले अनेक पथदिव्यांचे खांब आणि ट्रॅफिक सिग्नल मेट्रो मार्गिकेच्या कामास अडथळा ठरत आहेत. ते खांब व सिग्नल हटविण्यात येणार आहेत. तसेच, वीज पुरवठ्यात बदल करून नव्या ठिकाणी पथदिवे, सिग्नल उभारण्यात येणार आहेत. ते काम महापालिकेचा विद्युत विभागाकडून करण्यात येणार आहे. त्यासाठी १ कोटी ४७ लाख ३० हजार रुपयांचा खर्च अपेक्षित आहे.

तसेच दापोडीच्या हॅरिस पूल ते चिंचवड येथील मदर टेरेसा उड्डाण पूल या मेट्रोच्या पहिल्या टप्प्यातील मार्गावर पथदिवे खांब आणि ट्रॅफिक सिग्नल हटविण्यात आले आहेत. त्यासाठी महामेट्रोने महापालिकेकडे ३ कोटी ३७ लाख ५० हजार ८७२ रुपये २० जून २०१७ ला जमा केले होते.

● पहिल्या टप्प्यातील कामासाठी २ कोटी ३२ लाख ५५ हजार ६७१ रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित १ कोटी ४ लाख ९५ हजार १९१ रुपये समायोजित करण्यात येणार आहेत. ४२ लाख ४७ हजार ८०९ रुपये महामेट्रो महापालिकेकडे जमा करणार आहे. हे काम करण्यास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीची मान्यता घेतली आहे.

#रा

## खासगी व सरकारी रुग्णालयात गर्दी

**आकडे बोलतात**

**२,७७५** – १ जूनपासून आढळलेले संशयित रुग्ण

डेंगीचे रुग्ण - ३० जूनपर्यंत - ३, १६ जुलैपर्यंत - १७

मलेरियाचे संशयित रुग्ण जूनपर्यंत १८ हजार ४६६

**२६,९९२** – १६ जुलैपर्यंत मलेरिया झालेले रुग्ण

# सावधान! डेंग्यू, मलेरियाचे थैमान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** - गेल्या काही दिवसांपासून शहरात पावसाने जोर पकडला आहे. वाढलेल्या पावसामुळे शहरात डेंगी, मलेरियाच्या संशयित रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. जूनच्या अखेरपर्यंत शहरात तीन डेंगीच्या रुग्णांची नोंद झाली होती. केवळ १६ दिवसांत ही संख्या वाढून १७ पर्यंत पोचली आहे तर संशयित रुग्णांची संख्याही वाढत आहे. डेंगीचा वाढता प्रादुर्भाव पाहता, नागरिकांनी अधिक दक्षता घेणे आवश्यक असल्याचे आवाहन महापालिका प्रशासनाच्यावतीने करण्यात येत आहे.

**सर्दी, खोकल्याचे रुग्णही वाढले**

एका बाजूला शहरात डेंगीचा प्रादुर्भाव वाढत असताना दुसरीकडे सर्दी, खोकला व तापाचे रुग्णही वाढत आहेत. बदललेल्या हवामानामुळे विषाणूजन्य आजार पसरत आहेत. त्यामुळे शहरातील खासगी व सरकारी दवाखान्यांमध्ये सर्दी व तापाच्या रुग्णांची गर्दी होत आहे. या रुग्णांमध्ये डेंगीची लक्षणे आढळून आल्यास त्यांनाही डेंगीची तपासणी करण्यास सांगत आहेत.

**डेंगीची लक्षणे**

- तीव्र ताप, डोकेदुखी व सांधेदुखी
- उलट्या होणे, डोळ्यांच्या आतील भागात दुखणे
- अंगावर पुरळ उठणे
- घशाला कोरड पडणे
- अशक्तपणा जाणवणे
- भूक मंदावणे
- नाकातून रक्तस्राव होणे
- पोट दुखणे, उलट्या होणे

**याकडे लक्ष द्या**

- संसर्गग्रस्त एडिस इजिप्ती डास चावल्याने डेंगीची लागण होते.
- या डासाची उत्पत्ती घरातील भांड्यात व आजूबाजूला साचलेल्या स्वच्छ पाण्यात होते.
- संक्रमित डास एकदाच चावल्याने डेंगी होऊ शकतो.
- डेंगीचा डास दिवसा चावतो.
- डेंगीची लक्षणे दिसल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने सर्व तपासण्या करून घ्याव्यात

**प्रतिबंधात्मक उपाय काय**

- घरातील पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा रिकामी करून कोरडी करावीत
- पाण्याचा साठा असणाऱ्या टाक्यांची झाकणे घट्ट बसवावी
- डासांची पैदास होऊ नये यासाठी घर व आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवावा
- कुंड्या, फुलदाणी, फ्रिजचा ट्रे यातील पाणी वारंवार साफ करावे
- घराच्या खिडक्यांना मॉस्किटो नेट बसवून घ्याव्यात
- मच्छरदाणीचा वापर करावा
- लहान मुलांच्या कपड्यांवर मॉस्किटो रिपेलंट लावावे
- घराबाहेर पडताना पूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत
- ताज्या व गरम अन्नाचे सेवन करावे.
- अन्नपदार्थ झाकून ठेवावेत
- नियमित व्यायाम करावा
- वापरात नसलेली तुटकी भांडी, ड्रम, टायर यांची विल्हेवाट लावावी.

**डेंगीमुक्त मोहीम**


- कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने डेंगीमुक्त पिंपरी चिंचवड ही मोहीम हाती घेण्यात आली आहे. वैद्यकीय विभागाच्यावतीने या मोहिमेची नुकतीच सुरवात करण्यात आली. या मोहिमेंर्तगत संपूर्ण आठवडाभर विविध क्षेत्रात विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. डासांची उत्पत्ती होणाऱ्या ठिकाणांची तपासणी करणे, शाळांमध्ये डेंगी विषयी जागरुकतेचे व्हिडिओ व ऑडिओ क्लिप ऐकविणे, पोस्टर स्पर्धा, रॅली, व्याख्याने आदी उपक्रमांवर भर देण्यात येणार आहे.

**डेंगीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आरोग्य वैद्यकीय विभागाची कार्यवाही**

- शहरात डेंगीचा प्रादुर्भाव पाहता महापालिकेच्या आरोग्य वैद्यकीय विभागाच्यावतीने ठिकठिकाणी सर्वेक्षण करण्यात येत आहे. १ जूनपासून आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये शहरातील ७२ हजारांहून अधिक घरांची तपासणी करण्यात आली आहे. तर डासांच्या उत्पत्तीला कारणीभूत ठरणाऱ्या २४२ आस्थापनांवर कारवाई करून ८ लाखांहून अधिक दंड वसूल केला आहे.
- तपासलेल्या घरांची संख्या - **७२ हजार ७६७**
- डास अळ्या आढळलेली घरे - **१७०१**
- सापडलेली कंटेनर संख्या - **३ लाख २७ हजार ४२०**
- डास अळ्या आढळलेली कंटेनर संख्या - **१९००**

**तपासलेली बांधकाम**

- आस्थापना **३४८**
- तपासणी केलेली भंगार व टायरची दुकाने - **२६५**
- बजावण्यात आलेल्या एकूण नोटिसा - **६०२**
- दंडात्मक कारवाई केलेली आस्थापने, व्यक्ती - **२४२**
- एकूण दंडाची वसुली - **८ लाख १५ हजार**



**'डेंगी आजाराला रोखण्यासाठी नागरिकांचा सहभाग असणे आवश्यक आहे. त्यासाठी 'बीट डेंगी' ही मोहीम उपयुक्त ठरणार आहे. डेंगीला रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत नागरिकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे.**
**— शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका**

**मोहिमेतील मुद्दे**

- आंतरविभागीय समन्वय समितीची स्थापना
- शाळा, महापालिका कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी डिजिटल फलक व सोशल मिडीयाद्वारे मोहिमेचे आयोजन
- हाउसिंग सोसायट्यांमध्ये स्वच्छता मोहीम राबवून डेंगी मुक्त रहिवासी सोसायट्यांना प्रमाणपत्र
- आशा वर्कर्स व आयईसी टीम झोपडपट्ट्यांवर लक्ष केंद्रित करतील

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

## आवक वाढल्याने पालेभाज्यांचे दर ढासळले

**पिंपरी**- मोशी उपबाजारमध्ये गेल्या आठवड्यांच्या तुलनेने, पालेभाज्यांची अवक वाढली आहे. दुसरीकडे फळभाज्यांची आवक स्थिर आहे. सध्या चिंचवड येथील मंडईत पालेभाज्यांचे दर कमी झाले आहेत. पालेभाज्यांचे दर स्वसत झाल्याने नागरिकांनी पालेभाज्या खरेदीवर जोर लावल्याचे चित्र मंडईत दिसत होते. मोशी येथील उपबाजार समितीत रविवारी (दि. १४) रोजी ४२,४०० गड्डी पालेभाज्यांची, १९९ फळे, तर ३,२३० फळभाज्यांची आवक क्विंटलमध्ये झाली आहे.

चिंचवड येथील भाजी मंडईतील किरकोळ बाजारातील आजचे दर – टोमॅटो १००, शेवगा २००, दोडका १००, मिरची ८०, काकडी ५०, वाटाणा २००, वांगी ८०, गवार १२० रुपये किलो दराने विक्री होत आहे.

पालेभाज्या – दर (प्रति जुडी रुपयांत) मेथी १० ते २०, कोथिंबीर १० ते २०, कांदापात २० ते ३०, शेपू २० ते ३०, पालक २० ते ३० लहान मोठ्या जुडी नुसार.

मोशी उपबाजारातील आवक (क्विंटलमध्ये) – पालेभाज्या – ४२,४०० गड्डी, फळे १९९ आणि फळभाज्यांची आवक ३,२३० क्विंटल झाली. कांदा ४१५, बटाटा ८६७, लसूण ६३, आले २४, भेंडी ६०, गवार १८, टोमॅटो २४६, घेवडा ०८, दोडका २५, मिरची १६५, दुधी भोपळा ८३, भुईमुग शेंग ७, काकडी १२८, कारली ३७,

डांगर ४८, गाजर ९८, फ्लॉवर २६२, कोबी १३९, वांगी १३६, ढोबळी ४४, तोंडली ०६, बीट १५, पावटा ०२, वाल १५, शेवगा १७, कैरी०३, रताळी १७, कडीपत्ता १६, लिंबू ४६, मका कणीस १८५ क्विंटल आवक झाली आहे. तर कोथिंबीर २७,०००, मेथी १२,९००, शेपू ६००, कांदापात १,६००, पालक ६,१०० चवळी १,१००, पुदिना १,९०० गड्डी आवक झाली आहे.



## शून्यातून जग निर्माण करण्याची ताकद

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



### नानासाहेब शितोळे यांच्या स्मृति दिनानिमित्त आयोजन

# रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पुण्याएवढाच पिंपरी-चिंचवडचाही विस्तार झालेला आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने पिंपरी-चिंचवड जिल्हा होणे आवश्यक बनले आहे. पिंपरी चिंचवडच्या विकासात माजी महापौर नानासाहेब शितोळे यांचे मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन आमदार प्रसाद लाड यांनी केले. दरम्यान, रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

जुनी सांगवी येथे माजी महापौर स्व. अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे यांच्या १० व्या स्मृति दिनानिमित्त अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या आवारात आयोजित रोजगार मेळाव्याचे उदघाट्न आमदार प्रसाद लाड यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व स्व. नानासाहेब शितोळे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. रोजगार मेळाव्यातील उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन करताना आमदार लाड बोलत होते. यावेळी अनिता शितोळे, उद्योजिका नीता लाड, उद्योजक अजय शितोळे, अरविंद एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आरती राव, स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अतुल शितोळे, सचिव प्रणव राव, औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडीचे प्राचार्य शशिकांत पाटील, अधिराज शितोळे, बाळासाहेब शितोळे, शिवराज शितोळे, संतोष शितोळे, भटू शिंदे, तसेच विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, पश्चिम ज्येष्ठ नागरिक संघांचे पदाधिकारी, कृष्णाई भजनी मंडळाचे सदस्य, शिक्षकवृंद आदी उपस्थित होते.

आमदार लाड म्हणाले, की शून्यातून जग निर्माण करण्याची ताकद आपल्यात असते. फक्त ती ताकद आपण ओळखून त्या मार्गावरून वाटचाल केली पाहिजे. व्यक्तीमध्ये काम करण्याची हिंमत असेल, तर परिस्थिती बदलू शकते. माणसांनी नेहमी स्वप्न बघितली पाहिजे आणि ती सत्यात उतरवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सांगवीचा विकास करण्यात नानासाहेब शितोळे यांचा मोठा हातभार आहे. पर्यायाने पिंपरी - चिंचवड शहरातील नागरिकांना सुखसुविधा मिळून त्यांचे जीवन सुकर व्हावे, असे त्यांना नेहमी वाटे. शहरात चांगले दवाखाने, प्रशस्त रस्ते त्यांच्याच महापौरपदाच्या तयार झाले. विकासाचे व्हिजन त्यांच्याकडे होते. जनतेचा पैसा जनतेसाठी खर्च केला पाहिजे, असा त्यांचा दृष्टिकोन होता, असेही आमदार लाड यांनी सांगितले. प्रास्ताविक आरती राव यांनी केले. प्राचार्य शशिकांत पाटील यांनीही विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन स्मिता बर्गे यांनी, तर आभार स्वाती तोडकर यांनी मानले.

» Selected



## २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा मनविसेच्या वतीने सत्कार

**पिंपरी :** इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या चिंचवड गावामधील २५० गुणवंत विद्यार्थ्यांचा मनसेच्या वतीने सत्कार करण्यात आला. गुणगौरव व कौतुक सोहळा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने चैतन्य सभागृह पवनानगर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले, मनसे जनहित कक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष राजू भालेराव, विभाग अध्यक्ष मयुर चिंचवडे, मनविसे शहराध्यक्ष अनिकेत परशुराम प्रभु ,जनहित कक्ष शहर अध्यक्ष शैलेश पाटिल, अनिता पांचळ उपशहराध्यक्ष, विभाग अध्यक्ष वैशाली बोत्रे, जैन उपस्थित होते.



## आषाढी निमित्त आनंद हास्य क्लबची दिंडी

**पिंपरी :**सौदागर - येथील आनंद हास्य क्लबच्यावतीने आषाढी एकादशी निमित्त दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पिंपरी - चिंचवड मनपाच्या कै. बाळासाहेब कुंजीर क्रिडांगणावर नुकत्याच झालेल्या या कार्यक्रमात हास्य क्लबच्या सदस्यांनी पांढऱ्याशुभ्र वेशभूषेत हातात भगवी पताका आणि मुखी हरीनामाचा गजर करीत दिंडीच्या माध्यमातून विठ्ठलाची आराधना केली. प्रथम हास्य क्लबचे प्रमुख राजेंद्र जैस्वाल यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीविठ्ठल आणि रुख्मिणीच्या मुर्तीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर काढण्यात आलेल्या दिंडीत विठ्ठल आणि रुख्मिणीच्या वेशभूषेतील विमल मोंढेकर आणि शिला पेंढारकर यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. दिंडीच्या यशस्वीतेसाठी अनिल कुलकर्णी, भामिनी महाले, संतोष वर्तक, दिपूसेठ आणि राजेंद्र जैस्वाल यांनी परिश्रम घेतले.



## पिंपरी-दापोडी महामार्गावर कृत्रिम वाहतूककोंडी

**पिंपरी :**- पिंपरीहून दापोडीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर नाशिक फाटा चौक पार करावा लागतो. मात्र, या चौकापासून सुरू होणाऱ्या बेशिस्त पार्किंगमुळे हा रस्ता अपघातांचे केंद्र बनला आहे. या रस्त्यावरील जवळपास दीड किलोमीटर अंतरापर्यंत वाहने बिनदिक्कतपणे अनधिकृत पार्क केली जातात. याच रस्त्यावर वाहनांच्या सुट्या भागांची दुकाने आहेत. वाहनांना ॲक्सेसरीस बसवण्यासाठी आलेली वाहने मुख्य रस्त्याच्या जवळपास अर्ध्याहून जागा व्यापतात. परिणामी, वाहतूक कोंडीत मोठ्या प्रमाणात भर पडत आहे. यावर कारवाई करण्याची मागणी संतप्त वाहनचालकांनी केली आहे. येथील दुकानांमुळे ही वाहने उभी राहत असून, कोणालाही जुमानत नसल्याचे दिसून येते.

### अंतिम नकाशा १५ दिवसांत मिळणार


# शहरातील रेडझोनची मोजणी अखेर पूर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील रेडझोन हद्दीच्या मोजणीचे काम शासनाच्या भूमी अभिलेख विभागाने सॅटेलाईट इमेजद्वारे पूर्ण केले आहे. ही मोजणी अचूक झाली असून अंतिम नकाशा पूर्ण करण्याचे काम सुरू आहे. येत्या १५ दिवसांत रेडझोनची अचूक आणि स्पष्ट सीमा असलेला अधिकृत नकाशा उपलब्ध होणार आहे. नकाशा उपलब्ध झाल्यानंतर शहरातील रेडझोनबाधित मालमत्तांची अचूक माहिती मिळणार आहे.

देहूरोड ऑर्डनन्स फॅक्टरी डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून २ हजार यार्ड ( १.८२ किलोमीटर) परिघात रेडझोनची हद्द आहे. दिघी मॅगझिन डेपोपासून १ हजार १४५ मीटर रेडझोन हद्द आहे. त्या परिघात कोणतेही बांधकाम करण्यास प्रतिबंध आहे. त्यामुळे शहरातील लाखो कुटुंबे प्रभावित आहेत. रेडझोनची सीमा अस्पष्ट असल्याने मोजणी करण्याची मागणी नागरिकांमधून केली जात होती. अखेर, त्या मोजणीस संरक्षण विभागाने परवानगी दिली. मोजणीसाठी महापालिकेने भूमी अभिलेख विभागाकडे एकूण १ कोटी १३ लाख ६७ हजार ३०० रुपये शुल्क भरले होते.

मे महिन्यामध्ये भूमी अभिलेख विभागाकडून सॅटेलाईट इमेजद्वारे मोजणीच्या कामाला प्रारंभ केला होता. देहूरोड व दिघी डेपोच्या बाह्यसीमा भिंतीपासून निश्चित केलेल्या हद्दीपर्यंत ही मोजणी केली आहे. या मोजणीत सर्व मालमत्ता, बांधकामे, मोकळी जागा, रस्ते, झाडे व इतर संसाधन असे सर्व बाबींचा समावेश



आहे. रेडझोन हद्द सीमेची सॅटेलाईट इमेजद्वारे मोजणी केल्यामुळे नागरिकांसाठी अचूक नकाशा उपलब्ध होणार आहे.

**राज्य शासनाच्या भूमी अभिलेख विभागाला हद्द दाखविण्यात आली होती. त्यानुसार रेडझोन हद्दीची मोजणी पूर्ण केली आहे. सध्या रेडझोनचा अचूक नकाशा करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतरच शहरातील रेडझोन हद्दीत किती मालमत्ता आहे, हे स्पष्ट होणार आहे. येत्या १५ दिवसात नागरिकांना अंतिम नकाशा उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.**
**— प्रसाद गायकवाड, उपसंचालक, नगररचना विभाग.**

### चोविसावाडी-चऱ्होली येथील

# कचरा स्थानांतरण केंद्र अखेर रद्द!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** चोविसावाडी-चऱ्होली येथील प्रस्तावित घनकचरा स्थानांतरण केंद्र रद्द करुन, अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याचा मोठा निर्णय महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी घेतला. या परिसरात मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प निर्माण झाले असून, नागरिकांना त्रास होवू नये. या करिता हा निर्णय घेतल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. त्यामुळे सुमारे १५ हजार सदनिकाधारकांना दिलासा मिळाला आहे.

भोसरी विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे आमदार महेश लांडगे यांनी सोसायटी फेडरेशन आणि स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, प्रस्तावित घनकचरा स्थानांतरण केंद्र (कचरा ट्रान्फर स्ट्रेशन) रद्द करावे. यासाठी महापालिका प्रशासन व राज्य सरकारकडे मागणी केली होती. त्याला यश मिळाले असून, महापालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे.

सध्या पिंपरी-चिंचवड शहरातील वेगवेगळ्या भागातून दररोज सरासरी १००० ते ११०० मे. टन कचरा मोशी येथील डेपोत येतो. शहरात सुमारे २५ ते ३० ठिकाणी रस्त्याच्या कडेला किंवा मोकया जागेवर कचरा संकलन केंद्र कार्यान्वयीत आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने इंदौर शहराच्या धर्तीवर महापालिका हद्दीत ८ क्षेत्रीय कार्यालयात प्रत्येकी २ असे १६ ठिकाणी घनकचरा स्थानांतरण केंद्र उभारण्याचे नियोजन केले. महापालिका विकास आराखड्यात (DP) मध्ये घनकचरा स्थानांतरण केंद्र (SWT) करिता चोविसावाडी येथील जागा आरक्षीत केली होती.

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची १९९७ मध्ये हद्दवाढ करण्यात आली. त्यावेळी चोविसावाडी-चऱ्होलीचा महापालिकेत समावेश झाला. मात्र, समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सोयी-सुविधांपासून दुर्लक्षीत राहिली होती. महापालिका विकास आराखडा तयार केला. त्यावेळी येथे कचरा स्थानांतरण केंद्र प्रस्तावित करण्यात आले. स्थानिक नागरिकांसोबत या केंद्राला सुरूवातीपासून आम्ही विरोध केला. मात्र, प्रशासनाकडून कार्यवाही सुरू केली होती. त्यामुळे व्यापक जनहिताच्या दृष्टीने सदर केंद्र रद्द करावे, अशी आग्रही मागणी प्रशासनाला केली होती. आम्ही केलेला तीव्र विरोध पाहता महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सदर कचरा स्थानांतरण केंद्र रद्द केले. याबाबत मी प्रशासनाचे आभार व्यक्त करतो.**
**- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



**'या'सोसायटींमधील नागरिकांत आनंदोत्सव...**

- महापालिका विकास आराखडा तयार केला. त्यावेळी या भागात नागरीवस्ती नव्हती. मात्र, गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये या भागातील लोकसंख्या व गृहप्रकल्प मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. परिणामी, कचरा स्थानांतरण केंद्र मध्यवस्तीमध्ये येत आहे. महापालिकेतर्फे चोविसावाडी येथे प्रस्तावित कचरा संकलन केंद्राच्या शेजारीच तनिष ऑर्चिड फेज -1, तनिष ऑर्चिड फेज -2, डेस्टिनेशन ओशियान, ग्लोबल हाईट या आणि इतर सहकारी गृहरचना संस्था आहेत. हा सर्व रहिवासी परिसर असून या भागामध्ये 30 पेक्षा जास्त सहकारी गृहरचना संस्था आहेत. १२ ते १५ हजार सोसायटीधारक या ठिकाणी राहतात. या प्रायोजित कचरा स्थानांतरण केंद्रामुळे या भागामध्ये असणाऱ्या सर्व नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागण्याची भिती व्यक्त केली जात होती. महापालिका प्रशासनाने हा निर्णय मागे घेतला. त्यामुळे या भागातील नागरिकांनी आनंदोत्सव केला आहे.

#रा

## सातऱ्यात आगमन; तीन वर्षे महाराष्ट्रभर नेणार

# वाघनखे प्रदर्शनार्थ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे लंडनहून प्रचंड सुरक्षा व्यवस्थेत मुंबईत आणल्यानंतर कोणताही गाजावाजा न करता ती तत्काळ साताऱ्याला आणण्यात आली आहेत. साताऱ्यात शिवप्रेमींसाठी उद्या शुक्रवारी, १९ जुलै रोजी वाघनखांसह शस्त्रास्त्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. पुढील तीन वर्षे शिवप्रेमींना ही वाघनखे महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी पाहता येणार आहेत

शिवरायांच्या स्पर्शाने पावन झालेली वाघनखे याचि देही याचि डोळा पाहण्यासाठी आता लोकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. स्वराज्यावर चालून आलेल्या शत्रूचा कोथळा बाहेर काढणाऱ्या शिवरायांचे अमोघ शस्त्र पाहण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांपासून इतिहासप्रेमी उत्सुक आहेत. शेकडो वर्षांच्या प्रतिक्षेनंतर ही वाघनखे अखेर या पराक्रमी भूमीत परतली आहेत. ही वाघनखे जनतेला पाहण्यासाठी सातारा येथील राज्य वस्तू संग्रहालयात ठेवण्यात येणार आहेत. छत्रपतींची वाघनखे पाहण्यासाठी मोठी गर्दी उसळणार असल्याने राज्य सरकारने चोख बंदोबस्त ठेवला आहे.

शिवरायांची ही वाघनखे लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट वस्तुसंग्रहालयातून सातारा येथील राज्य वस्तू संग्रहालयात पोहचली आहेत. यासाठी सुधीर मुनगंटीवार यांनी खास प्रयत्न केले. या वाघनखांसह शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन १९ जुलैला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार आणि सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत केले जाणार आहे. वाघनखांसमोरील पडदा बाजूला सारून वाघनखांसह शस्त्रास्त्र प्रदर्शनाचे उद्घाटन केले जाईल. छत्रपती घराण्याचे वंशज उदयनराजे भोसले, संभाजी राजे छत्रपती आणि शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची प्रमुख उपस्थिती असेल.

### जगाच्या इतिहासात अजरामर

● महाबळेश्वर आणि जावळीच्या खोऱ्यात बसलेल्या किल्ले प्रतापगडाच्या पायथ्याशी वाघनखांशी निगडीत इतिहास घडला होता. छत्रपती शिवाजी महाराजांची अफझल खानाशी प्रतापगडाच्या पायथ्याशी शामियान्यात भेट झाली होती. यावेळी शिवरायांची मान धिप्पाड, विश्वासघातकी अफझल खानाने बगलेत दाबून त्यांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा प्रयत्न केला. परंतु, चिलखताने महाराजांना वाचविले. त्यानंतर महाराजांनी अत्यंत चपळाईन वाघनखे त्याच्या पोटात घुसवून अफझल खानाचा कोथळा बाहेर काढला. यानंतर मराठी सैन्याने अफजल खानाच्या आदिलशाही सैन्यावर जोरदार आक्रमण चढवून प्रतापगडची लढाई जिंकली होती. जगाच्या इतिहासात ही घटना अजरामर ठरली आहे. तिच्या नुसत्या आठवणीने मराठीजनांच्या अंगावर रोमांच उभा राहतो.

राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स रा

# 'लाडक्या बहिणी' साडेपाच लाख; अर्ज-दीड लाख

### मदतीचा हात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क


**जळगाव :** जिल्ह्यात एकूण ७ लाख ४० हजार रेशनकार्डधारक आहेत. त्यापैकी १ लाख ७८ हजार ८५२ निराधार योजनांचे पेन्शनधारक वगळता ५ लाख ६१ हजार १४८ रेशन कार्डधारक 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' योजनेसाठी पात्र आहेत. तुलनेत या योजनेंतर्गत आतापर्यंत केवळ १ लाख ४९ हजार ४२८ महिलांनी ऑनलाइन व ऑफलाइन अर्ज केले आहेत. अद्यापही जिल्ह्यात चार लाखांवर महिलांनी या योजनेसाठी अर्ज केलेले नाही.

निराधारांसाठी योजनांचे पेन्शन घेणारे लाभार्थी या योजनेसाठी अपात्र आहेत. जिल्ह्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेचे एकूण २ लाख ९८ हजार ८७ लाभार्थी आहेत. त्यात सरासरी ६० टक्के महिला लाभार्थींचे प्रमाण आहे. त्यानुसार १ लाख ७८ हजार ८५२ लाभार्थी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे अनुदान घेण्यासाठी अपात्र आहेत. ही संख्या वगळून ५ लाख ६१ हजार १४८ रेशनकार्डधारक या योजनेंतर्गत लाभ घेण्यासाठी पात्र आहेत.

योजनेच्या पूर्वीच्या अटीनुसार या योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला व अधिवास प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसील कार्यालयात रांगा लागल्या होत्या. आता ते प्रमाणपत्रही तहसील कार्यालयांकडे प्रलंबित आहेत. लाडकी बहीण योजनेशिवाय शैक्षणिक व नोकरीच्या कामासाठी विद्यार्थी व युवकांना या दाखल्यांची आवश्यकता असते. मात्र, जिल्ह्यातील सर्व तहसीलमध्ये दाखले प्रलंबित आहेत.

» Selected

## मुंबईत २५ जागांची ठाकरेंची तयारी



**मुंबई :** शिवसेनेचा पूर्वापार बालेकिल्ला असलेली मुंबई जिंकण्यासाठी उद्धव ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. मुंबईतील एकूण ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी २५ जागांवर लढण्याची तयारी ठाकरे गटाने केली आहे. मुंबईतील बहुतांश विधानसभा मतदारसंघ आपल्याकडेच ठेवण्यासाठी ठाकरे प्रयत्नशील राहणार आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मुंबईत १४ जागा शिवसेनेने जिंकल्या होत्या. त्यातील आठ आमदार ठाकरेंच्या शिवसेनेसोबत आहेत. तर सहा आमदार शिंदेंच्या शिवसेनेत गेले आहेत. जिंकलेल्या जागा, एकापेक्षा अधिक उमेदवार इच्छुक असलेल्या जागा आणि लोकसभा निवडणुकीत विधानसभा क्षेत्रात ठाकरेंचा उमेदवार असताना आघाडी असलेल्या जागांवर निवडणूक लढवण्याचा आग्रह ठाकरे गट धरू शकतो. तसेच, जिथे पक्षाची ताकद आहे, तिथे महापालिका निवडणुकांचा विचार करूनदेखील जागा लढवण्याचे नियोजन ठाकरे गट करत असल्याची माहिती मिळत आहे.

## शहादा येथे सहा महिन्यांचे बाळ गेले नाल्यात वाहून

**नंदुरबार :** जिल्ह्यातील शहादा तहसील कार्यालयाजवळ असणाऱ्या नाल्याच्या पाण्यात पडून सहा महिन्यांच्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मुसळधार पावसात एक व्यक्ती आपली पत्नी आणि सहा महिन्यांच्या बाळाला दुचाकीने घरी घेऊन जात असताना हा दुर्दैवी अपघात घडला आहे. मुसळधार पावसामुळे भेंडवा नाल्याला प्रचंड पाणी आले आहे. नाल्यावरील फरशी पुलावरून जात असताना अचानक पाण्याचा प्रवाह वाढल्यामुळे मनोज भिल यांचा दुचाकीवरील ताबा सुटला व त्यांची पत्नी खाली पडली. पाठोपाठ पत्नीच्या हातात असलेले सहा महिन्यांचे बाळ नाल्यातील पाण्यात वाहून गेले. यानंतर पती-पत्नीने बालकाला शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र, हे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. दुसऱ्या दिवशी सकाळी नाल्यालगत असलेल्या एका काटेरी झुडपात बालकाचा मृत्यूदेह आढळला. आपल्या सहा महिन्यांच्या मृत बालकाला हृदयाशी लावत त्या आईने आक्रोश केला. पावसामुळे घडणाऱ्या अशा दुर्घटना प्रशासनाने पूर्वकाळजी घेऊन टाळल्या पाहिजेत, असे मत नागरिकांनी व्यक्त केले.

# लाडका भाऊ योजना जुनीच : दानवेंचा दावा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना अर्थात 'लाडका भाऊ' योजना जुनीच असल्याची टीका ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ही नवी योजना नसून ५० वर्षांपूर्वीचीच योजना नव्या नावाने आणल्याचा दावा दानवे यांनी केला आहे.

दानवे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेली 'लाडका भाऊ' योजना म्हणजे तरुणांची निव्वळ फसवणूक आहे. ही योजना राज्यात १९७४ पासून सुरू आहे. या योजनेत आधीपासूनच मानधन दिले जाते. यात नवीन काही नाही. ही जुनी योजना मुख्यमंत्र्यांच्या नव्या नावाने समोर आणली आहे. निवडणुकीच्या तोंडावर सरकारला हे सर्व आठवत आहे. लाडका भाऊ आणि लाडकी बहीण या योजना प्रत्यक्षात जुन्या योजना आहेत. आताच्या घडीला रोजगार उपलब्ध नाहीत. सरकार नोकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खासगीकरण करत आहे आणि दुसरीकडे तरुणांना अशाप्रकारे भूल थापा देत आहे, असा आरोपही दानवे यांनी केला. प्रत्यक्षात रोजगार निर्मितीसाठी यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी अनेक योजना आणि रोजगार मिळावे घेतले. परंतु, वास्तवात या योजनांमधून तरुणांना काहीही मिळाले नसून निवडणुकीपूर्वीची ही फसवी घोषणा असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे, असे दानवे म्हणाले. राज्यातील तरुण याला फसणार नाही, असे ते म्हणाले.

### त्याआधी फडणवीसांचे विश्वासू आ. राऊत यांनी घेतली भेट

## जरांगेंची जीभ घसरली; लाड यांच्यावर खालच्या भाषेत टीका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जालना :** मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आज प्रसाद लाड यांच्यावर टीका करत असताना आपला तोल सोडला. अत्यंत खालच्या पातळीवर त्यांनी लाड यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरदेखील टीका केली. नालायक, नीच, गचपन्या अशी शब्दांची लाखोली तर त्यांनी वाहिलीच परंतु त्याही पुढे जाऊन तू फडणवीसचे x x खा , नाहीतर त्याच्याशी लग्न कर, त्याची थुंकी चाटत बस, अशा अत्यंत शेलक्या शब्दांमध्ये त्यांनी टीका केली. ज्यांच्याकडे मराठा आणि कुणबी प्रमाणपत्र आहे अशांना देखील ठाणे पोलिसांच्या भरती प्रक्रियेमधून बाजूला काढण्यात आले याचेही दाखले यावेळी जरांगे यांनी दिले. प्रसाद लाड यांनी काल जरांगे यांच्यावर टीका केली होती त्याबाबत पत्रकारांनी विचारले असता , जरांगे आणि तब्बल तीन मिनिटे प्रसाद लाड आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावर अत्यंत हलक्या शब्दांमध्ये टीकेची झोड उठवली.

दरम्यान, उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे बार्शीतील विश्वासू आमदार राजेंद्र राऊत यांनी मनोज जरांगे यांची अंतरवाली सराटीत भेट घेतली. जरांगे यांचे मागील आमरण उपोषण सोडवण्यासाठी राऊत यांनी मध्यस्थी केली होती.

बुधवारी जरांगे यांनी आमदार राऊत यांच्यावर टीका केली होती. त्यानंतर लगेच राऊत यांनी जरांगे यांची भेट घेत एक तासाहून अधिक वेळ चर्चा केली.

## आमदाराने तहसीलदारांना कार्यालयात कोंडले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अकोला :** बाळापूरचे शिवसेना ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांनी तहसीलदार आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांना नगरपालिकेत कोंडत पीकविमा कंपन्या आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीबद्दल संताप व्यक्त केला. अनुपस्थित अधिकारी आल्याशिवाय कुणालाच सोडणार नाही, असा पवित्रा आमदार देशमुख यांनी घेतला.

आमदार देशमुख यांनी विमा कंपन्यांच्या तक्रारीविरोधात नगरपालिकेत सर्व अधिकारी आणि विमा कंपन्यांची बैठक बोलावली होती. शेतकऱ्यांच्या पीकविमाबाबत अनेक तक्रारी आहेत. कुणाला पीक विम्याचे पैसे मिळत नाहीत, कुणाला विमा उतरवताना अडचणी येत आहेत तर काही तांत्रिक कारणे आहेत. या सर्वांवर तोडगा काढण्यासाठी या बैठकीचे आयोजन केले होते.

## दिलासा !

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**विशाळगड :** उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी विशाळगड परिसरातील गजापूर येथे जाऊन काही दिवसांपूर्वी झालेल्या हिंसचाराची माहिती घेतली. तसेच, पीडितांना दिलासा दिला.

# 'दोन महिन्यांचे मंत्री होण्याची काहींची इच्छा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मंत्रीपदाचे स्वप्न किमान दोन महिने तरी पूर्ण होऊ दे असे म्हणत बरेच आमदार सत्ताधाऱ्यांच्या मागे लागले असल्याचा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी महायुतीला लगावला आहे.

पाटील म्हणाले, 'परत मंत्रिमंडळाचा विस्तार आता होणार नाही, ही शेवटची संधी आहे असे काही आमदारांना वाटते आहे. त्यामुळे आमच्या मंत्रीपदाचे स्वप्न किमान दोन महिने तरी पूर्ण होऊ दे असे बरेच आमदार मागे लागले आहेत.

विशाळगडाच्या पायथ्याला घडलेली घटना गंभीर आहे. पायथ्याला असलेल्या लोकांना वर जाऊ न दिल्याने त्यांनी तेथील धार्मिक स्थळावर हल्ला केला. लोकांची घरेदारे फोडून, तिजोऱ्या लुटून त्यातील संपत्ती नेली. हे शिवप्रेमींचे लक्षण नसून पुण्यातील किंवा कुठूनतरी वेगळ्या ठिकाणावरून आलेले गुंड आहेत. अशा पद्धतीने कोणाच्याही घरात घुसून घरे फोडायला लागली तर राज्यात अराजकता निर्माण होईल. सरकारचे हे मोठे अपयश आहे, असेही पाटील यांनी म्हटले.

दरम्यान, लवकरच राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे. मंत्रिमंडळ विस्तार होणार नाही, असे काहीच नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. सरकार कोणावरही अन्याय करणार नाही, भेदभाव करणार नाही असेही मुख्यमंत्री म्हणाले. गडकोट किल्ल्यांबाबत एक अ‍ॅक्शन प्लॅन तयार करणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्याच्या मंत्रिमंडळ विस्ताराबद्दल शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट म्हणाले की, संपूर्ण मंत्रिमंडळाचा विस्तार झाला पाहिजे, अन्यथा अनेक आमदार नाराज होतील. मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासाठी काही अडचण नाही. त्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असे शिरसाटांनी म्हटले आहे.

## इम्तियाज जलील यांचा शुक्रवारचा कोल्हापूर दौरा रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** विशाळगडावर झालेल्या राड्या प्रकरणी एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी शुक्रवारचा (दि. १९) कोल्हापूर दौरा रद्द केला आहे. पोलिसांनी विनंती केल्याने दौरा रद्द केल्याचे जलील म्हणाले. मात्र, उद्या राज्यभरात सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकारी कार्यालयांसह तहसील कार्यालयांसमोर पक्ष कार्यकर्ते निदर्शने करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कोल्हापूर हे छत्रपती शाहू महाराजांची धरती आहे आणि तिथे अशा प्रकारचे घटना होणे हे अतिशय दुर्दैवी असल्याचे ते म्हणाले.

### दांगट समितीच्या शिफारशी लागू करण्याची मागणी

# 'महसूल'चा संप; कामांचा खोळंबा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** दांगट समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार आकृतीबंध मंजूर करण्याच्या मागणीसाठी महसूल कर्मचारी संपावर गेल्याने राज्यातील महसूल विभागाशी संबंधित कार्यालयांमध्ये काम घेऊन येणाऱ्या लोकांचा खोळंबा होत आहे.

दांगट अहवालाचे पालन करून सुधारित महसूल विभागाचे नमुने लागू करणे आणि महसूल सहाय्यकांना वेतनश्रेणीत १९०० रुपयांवरून २४०० रुपयांची वाढ देणे या प्रमुख मागण्यांसाठी कर्मचारी संप करत आहेत. समितीच्या शिफारशींसह इतर १४ मागण्यांसाठीही हा संप पुकारण्यात आला आहे. यामुळे शासकीय कार्यालये मात्र ओस पडली आहेत.

सर्वच महसूल कर्मचारी संपावर असल्याने कार्यालयात रिकाम्या खुर्च्या दिसत असून, कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिकांची कामे खोळंबली आहेत. जोपर्यंत महसूल विभागाचा आकृतिबंध मंजूर होत नाही तोपर्यंत या संपातून माघार घेणार नसल्याचा पवित्रा महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेने घेतला आहे. राज्य सरकारने या मागण्यांवर विचार केला नाही तर बेमुदत कालावधीसाठी संप सुरू राहील, असे महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे संजय हांगे यांनी सांगितले.

जिल्हा पातळीवरील आपत्ती आणि बचाव दलाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी पाठिंबा दिल्यामुळे कार्यालये सुनसान झाली आहेत. तसेच पूर आणि नैसर्गिक आपत्तीवेळच्या बचाव कार्यासह महत्त्वाच्या सेवा ठप्प झाल्या आहेत. त्यामुळे नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

#रा

# राष्ट्रीय महामार्ग उड्डाणपूलासहीत सहा पदरी होणार ! - आमदार राहुल कुल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पारगांव :** डाळींब बन येथील श्री विठ्ठलच्या महापूजा प्रसंगी आमदार राहुल कुल यांची महत्त्वाची माहिती. पुणे सोलापूर महामार्गावरील हवेली तालुक्याच्या हद्दीत होणारी वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी हडपसर ते कासुर्डी असा इलिव्हेटेड उड्डाणपूल करण्यासह महामार्ग सहापदरीकरण करुन वाहतुकीची समस्या सोडविण्याचा शासनचा प्रस्ताव असल्याची माहिती दौंडचे आमदार राहुल कुल यांनी दिली.



डाळींब बन (ता. दौंड) येथील श्री विठ्ठलाची आषाढी एकादशीची निमित्त महापूजा दौंडचे माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे संचालक रमेश थोरात यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दौंड चे आमदार राहुल कुल हे उपस्थित होते. यावेळी राहुल कुल हे बोलत होते. यावेळी दौंडचे तहसिलदार अरुण शेलार, गटविकास अधिकारी अजय काळे, श्री विठ्ठल देवस्थानचे अध्यक्ष राजेंद्र कांचन, हवेली बाजार समिती संचालक लक्ष्मण केसरकर, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुशांत दरेकर, मोहन म्हेत्रे, उरुळी कांचन सरपंचबाबा कांचन, डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे उपाध्यक्ष रामदास चौधरी, यांच्यासह मान्यवर व भाविक उपस्थित होते.

आमदार राहुल कुल म्हणाले, दौंड व हवेलीच्या शेतीच्या पाण्याच्या प्रश्नासह वाहतुककोंडीसह विविध महत्त्वाचा कामांची शासन स्तरावर सकारात्मक कार्यवाही सुरू आहे. शेतीला मुळशी धरणातून पाणी, जाणाई सिंचन योजनाद्वारे तालुक्याचा पाण्याचा भरून काढण्यात येणार आहे. पुणे -सोलापूर राष्ट्रीय महामार्गासाठी हडपसर ते कासुर्डी उड्डाणपूलासहीत महामार्ग सहापदरीकरण या गोष्टी डीपीआरमध्ये समाविष्ठ करण्यात आल्या आहे. महत्त्वाचे मार्ग प्रशस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.विठ्ठल बन देवस्थानच्या विकासासाठी निधीची तरतूद करण्यात येत असून देवस्थानच्या जमीनीचा विषय मार्गी लावण्यात येईल असे राहूल कुल यांनी सांगितले.तसेच दौंड चे माजी आमदार रमेश थोरात म्हणाले, डाळींब बन विकासात समाधानकारक कामे झाली आहेत. पुढील काळात विकासकामांना सोडविण्यासाठी प्रयत्न प्राधान्याने होतील. कार्यक्रमात महानंदा च्या माजी अध्यक्षा वैशाली नागवडे, सरपंच बजरंग म्हस्के, दौंड पंचायतीचे माजी सदस्य किसन म्हस्के यांचीही भाषणे झाली.

## खेडच्या तहसीलदारपदी ज्योती देवरे यांची नियुक्ती



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** खेड तालुक्याच्या तहसीलदारपदी ज्योती देवरे यांची नियुक्ती झाली. त्यांनी यापूर्वी धुळे, मालेगाव, अंमळनेर, पारनेर या ठिकाणी तहसीलदार म्हणून काम केले आहे. माजी महसूल राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांचे विशेष कार्यकारी अधिकारी (ओएसडी) म्हणूनही त्यांनी मंत्रालयात कामकाज पाहिले आहे. त्यांनी गुरुवारी पदभार स्वीकारून प्रशासकीय आढावा घेतला.

» Selected



## रविंद्र चौधरी यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव

**राजगुरूनगर :** पुणे जिल्हा क्रीडा परिषद, पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटनेच्या वतीने साने गुरुजी विद्यालय खरपुडी बुद्रुक (ता. खेड) येथील मुख्याध्यापक रविंद्र चौधरी पाटील यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मान चिन्ह नुकतेच क्रीडा संकुल राजगुरुनगर येथे देण्यात आला. जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, दादासाहेब देवकाते, आमसिद्ध सोलनकर, खेड तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष नितीन वरकड, उपाध्यक्ष शंकर शिंदे, सचिव लतीफ शेख आदी उपस्थित होते. "मी राजगुरू बोलतोय" या एकपात्री प्रयोगातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये त्यांनी हुतात्मा राजगुरूंचा जीवनपट जनतेसमोर आणला आहे. यावेळी खेड तालुक्यातील व शिरूर तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते. खादी ग्रामोद्योग संघाचे खेड तालुका अध्यक्ष अनिल शिंदे, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, खरपुडी ग्रामस्थ आदींनी त्यांचे अभिनंदन होत आहे.

## २७ जून रोजी राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** राष्ट्रीय लोक अदालतचे आयोजन जुन्नर न्यायालयामध्ये शनिवार दि २७ रोजी करण्यात आलेले असून यामध्ये जास्तीतजास्त दाखल पूर्व प्रकरणांमध्ये नोटीस काढून लोक अदालती मध्ये तडजोड करून दाखल पूर्व प्रकरणे निकाली काढण्याचे आवाहन तालुक्यातील पक्षकार व नागरिकांना करण्यात आलेले आहे.

जुन्नर तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष दिवाणी न्यायाधीश नम्रता बिरादार, सह दिवाणी न्यायाधीश हेमंत बाजड, स्वप्ना घुले यांच्या मार्गदर्शनाखाली दि 27 रोजी जुन्नर न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालती चे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी दाखल पूर्व प्रकरणांमध्ये तडजोड करून ही प्रकरणे निकाली काढली जाणार आहेत. तसेच नियमित फौजदारी किंवा दिवाणी प्रलंबित दाव्या मध्ये आपसात तडजोड होत असेल अशा प्रलंबित दाव्यांमध्ये देखील पक्षकार या लोक अदालती मध्ये आपला दावा निकाली काढून पुढील होणाऱ्या आर्थिक , मानसिक त्रासापासून सुटका होण्यास त्यांना मदत होऊन जलद गतीने न्याय मिळणार आहे. जुन्नर तालुक्यातील पक्षकार व नागरिकांनी या लोक अदालती मध्ये दाखल पूर्व प्रकरणात तडजोड करून आपली प्रकरणे निकाली काढून घेण्याचे आवाहन तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष यांनी केलेले आहे. दरम्यान या लोक अदालती च्या तयारी करिता तालुक्याचे तहसीलदार गटविकास अधिकारी, पोलिस अधिकारी , बँक अधिकारी, पतसंस्था अधिकारी, जुन्नर वकील संघ पदाधिकारी यांच्या समवेत बैठकीचे आयोजन केले आहे.

## चक्कर येऊन पडल्याने इसमाचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** वढू बुद्रुकमध्ये दुचाकीहून घरी आलेल्या इसमाला चक्कर येऊन पडलेल्या इसमाचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून बाळू निवृत्ती भंडारे असे सदर इसमाचे नाव आहे.वढू बुद्रुक ता. शिरुर येथील बाळू भंडारे हे दुचाकीहून त्यांच्या घराजवळ असलेल्या पाण्याच्या प्लांटवर गेलेले होते, तेथील कामे आटोपून बाळू हे दुचाकीहून घरी आले असता त्यांना चक्कर आल्याने जमिनीवर पडले दरम्यान त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी बाळू निवृत्ती भंडारे वय ५२ वर्षे रा. वढू बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे यांचा उपचारापूर्वी मृत्यू झाल्याचे घोषित केले, याबाबत वैभव बाळू भंडारे यांनी पोलीस स्टेशन येथे खबर दिली आहे.

# मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यास नोंदणी करा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** इंदापूर येथे सोनाई प्रतिष्ठानच्या माध्यमातून, सोनाई परिवाराच्या वतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा होणार असून, नागरिकांनी आपल्या वधू वरांची या विवाह सोहळ्यासाठी गुरुवार दि. १८ जुलै ते दि.५ ऑगस्ट २०२४ पर्यंत नोंदणी करावी, असे आवाहन पुणे जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य समितीचे सभापती प्रविण माने यांनी केले आहे.

याबाबत इंदापूर सोनाई पॅलेस येथे गुरुवार दि. १८ जुलै रोजी पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी राजेश जामदार, शुभम शिंगाडे, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते रामदासआप्पा बनसोडे, नागेश गायकवाड, प्रवीण निगडे, साधू नरुटे, भागवत जाधव आदी उपस्थित होते. यावेळी माहिती देताना प्रविण माने बोलत होते.

पुढे बोलताना प्रविण माने म्हणाले की, या विवाह सोहळ्यामध्ये सर्वधर्मीय विवाह, प्रत्येकाच्या धर्मानूसार विधीवत करण्यात येणार असून, नवरदेव - नवरीच्या सर्व हौस पूर्ण करण्यात येणार आहेत. मात्र वधू -वर पित्यांनी विवाह सोहळ्यात तात्काळ नोंदणी करून घ्यावी. हा विवाह सोहळा ऑगस्ट महिन्यात घेण्याची तयारी सुरू आहे.

**वधू - वरांना पोशाख व संसार उपयोगी साहित्य**

- नवऱ्या मुलाला सफारी ड्रेस, उपरने, फेटा, अंतरपाट, हळदीची टोपी व बूट, नवरी मुलीला मणी मंगळसूत्र, शालू, चुनरी, जुडवी, मेकअप साहित्य, सुबक चप्पल जोडे देण्यात येणार असून, लग्नात सर्व प्रकारचे संसार उपयोगी भांडी मिळणार आहेत.दोन्ही परिवाराकडून आलेल्या सर्व पाहुणे मंडळींना जेवणाची उत्तम सोय करण्यात येणार आहे.

## पुणे म. न. पा. शाळा किरकटवाडी येथे पालखी सोहळा संपन्न



**खडकवासला :** पुणे म. न. पा. शाळा किरकटवाडी येथे पालखी सोहळा संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या या पालखी सोहळ्यास किरकटवाडी ग्रामपंचायतचे सरपंच गोकुळ निवृत्ती करंजावणे उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समिती सतोष बांदल,प्रवीण दिघे, पालक व ग्रामस्थ बंधू भगिनी यांनीही उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ढोल ताशा व लेझीम पथकाने जोरदार सुरुवात करत विठ्ठलाचा गजर केला. वारकरी वेशातील विद्यार्थ्यांच्या खांद्यावरील पालखी सर्वांसाठी आकर्षण ठरली. नऊवारी साडी घालून विद्यार्थिनी तालात भजन गाण्यात रममाण झाल्या होत्या. प्रत्येक वर्गाची दिंडी हरिनामाचा गजर करत विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आनंदात पोहोचली. शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता कुरुणकर यांचे समवेत शिक्षक वर्ग खंडाळीकर, भांगरे, चाबके, शेलार, फटांगरे, थिटे आणि धारूरकर यांनी सदर पालखी सोहळा संपन्न होण्यासाठी विशेष मेहनत घेतली. पावसाच्या हलक्याश्या सरी पालखी सोहळा पाहण्यासाठी जणू धावून आल्या. वारकऱ्यांचा उत्साह हा पालखी सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

## महिलेवर अत्याचार; गुन्हा दाखल

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर येथील महिलेची एका लग्नामध्ये ओळख झालेल्या इसमाने महिलेला वाशी येथे भेटायला बोलावून महिलेवर अत्याचार केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे रितेश प्रकाश तांबे या इसमावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिक्रापूर येथील महिलेची एका लग्नामध्ये रितेश तांबे सोबत ओळख झालेली होती, त्यांनतर दोघे एकमेकासोबत बोलत होते दरम्यान १५ जुलै रोजी नुकतेच रितेश याने महिलेला वाशी येथे भेटायला बोलावले होते.

# विविध स्पर्धा परीक्षांमध्ये महात्मा गांधी विद्यालयाने मिळविले नेत्रदीपक यश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** येथील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यलयातील पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ( इयत्ता ८ वी ) २६ विद्यार्थ्यांनी, उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत ( इयत्ता ५ वी ) ११ विद्यार्थ्यांनी तसेच महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेमध्ये ९ विद्यार्थांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून विद्यालयाच्या नावलौकिकात भर घातलेली आहे. विद्यालयातील घोरपडे धैर्यशील या विद्यार्थाने पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत २५८ गुण मिळवून राज्यात २५ वा क्रमांक व महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत राज्यात १२ वा क्रमांक प्राप्त केला आहे. इयत्ता ९ मधील भोकसे सात्विक राज्यात १२ वा व नेहेरे ऋग्वेद यां विद्यार्थाने राज्यात २३ वा क्रमांक व इ. १० वी तील तन्वी सुपेकर या विद्यार्थीनीने राज्यात १५ वा क्रमांक प्राप्त केला आहे.



इयत्ता आठवीच्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांची नावे व गुण पुढीलप्रमाणे : पाचारणे तनिष्का, बिरादार स्वयंम, पाचारणे हर्षवर्धन, गारगोटे मयांक, खोपे स्नेहा, गारगोटे आर्या, नाईकरे अनुष्का, पवळे हर्षद, मनकर अथर्व, कदम श्रावणी, कोरडे पूर्वा, जाधव समृद्धी, वाकचौरे शरयू, टाव्हरे अन्वी, सांडभोर आदेश, राऊत सुदर्शन, पाटील वेदिका, गटे संकल्प, देशमाने प्रतीक, रेटवडे उदय, देशमाने प्रतीक्षा, तळपे संचिता, एरंडे पूर्वा, गोपाळे अपेक्षा, शिंदे दर्शन.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे : गोरडे श्रेयस शरद, कुरणावळ सिद्धीका उमेश, सांडभोर विघ्नेश दत्तात्रेय, जाधव स्वराज संदेश, वडणे श्रेयस संदीप, निकम ऋग्वेद गणेश, बोऱ्हाडे शरयू योगेश, वाघमारे अर्णव विजय, खोल्लम आनंद अतुल, थिटे राजवीर गुलाब, घोडे संस्कार संतोष.

एमटीस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे :- सांडभोर आदेश जिल्हात ४ था क्रमांक, हिरवे वेदांत जिल्हात ६ वा क्रमांक, सांडभोर कनुप्रिया जिल्हात ५ वा क्रमांक. या विद्यार्थ्यांना जैद सुभाष, भोसले वर्षा, लोखंडे नयना, थिटे गुलाब, निकम स्मिता, ढवळे शितल, कुलकर्णी मृणाल, दरेकर सोनाली, तळेकर श्वेता, भोंडवे ऋतुजा, कुटे प्रिया, कापसे सुवर्णा, गोरडे प्रतिपदा, गावडे मंगल, सावंत उर्मिला या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर, उपाध्यक्ष अजित लुणावत, सचिव गणेश जोशी, प्राचार्या कांबळे संध्या, उपमुख्याध्यापक पिलगर दशरथ, पर्यवेक्षक डावरे पांडुरंग, गाडेकर बाळासाहेब, जाधव रेखा, पाठक अस्मिता यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## न्यायालयाच्या आवारात माजी उपसरपंचाचा धिंगाणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** शिरुर ता. शिरुर येथील न्यायालयाच्या परिसरात काही दिवसांपुर्वी एका माजी सैनिकाने स्वतःच्या पत्नीवर गोळ्या झाडून हत्या केल्याची घटना घडलेली असताना नुकतेच एका माजी उपसरपंच व स्वयंघोषित गोल्डमॅन अंकुश बांदल यांनी मद्यपी अवस्थेत न्यायालयाच्या आवारात धिंगाणा घालत शिवीगाळ केल्याची घटना घडली असताना मात्र शिरुर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली जात असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

करडे ता. शिरुर येथील माजी उपसरपंच व स्वयंघोषित गोल्डमॅन अंकुश बांदल यांनी १६ जुलै रोजी शिरुर न्यायालयाच्या आवारात दारुच्या नशेत धिंगाणा घालत शिवीगाळ केली यावेळी उपस्थित काही वकिलांनी अंकुश बांदल यांना समजविण्याचा प्रयत्न केला तरी देखील बांदल यांनी शिवीगाळ सुरु ठेवली. त्यानंतर शिरुर न्यायालयातील एका न्यायाधिशांनी कोर्ट पोलीस कर्मचाऱ्याला सदर इसमावर कारवाई करण्याचे आदेश दिले. मात्र शिरुर पोलिसांनी सदर माजी उपसरपंच अंकुश बांदल यांच्यावर कारवाई केली नसून बांदल यांच्यावर यापूर्वीही शिरुर येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असून त्यातील काही गुन्ह्यात बांदल हे जामीनावर बाहेर असताना नुकतेच त्यांनी न्यायालयाच्या आवारात शिवीगाळ करुनही पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ केली तसेच त्यांच्यावर कारवाई न करण्यासाठी पोलिसांवर कोणता राजकीय दबाव आहे का अशी चर्चा परिसरात रंगली आहे.

**PUBLIC NOTICE**

Know all men by this notice that the property described in the schedule written hereunder is presently owned and possessed by **MR. AMIT ATMARAM JADHAV.** The owner has agreed to sell the said Property to my client. The owner has represented and assured to my client that the Owner is in possession of the said Property and has full and absolute right to sell & convey the said Property to my client and has further represented and assured my client that, the said Property is free from all encumbrances and his title to the said Property is Legal, Clear and Marketable. This notice is issued for verification of the owner's title to the said Property.

Any person/s or corporate body having any interest, claim, lien, mortgage, attachment, charge, maintenance right, easementary right, or any other right, title, etc. of whatsoever nature, in the said Property or any part thereof are here by required to inform the undersigned, in writing with full details of their claim, right, title or interest in the said along with documentary evidence in support within **10 days** from publication of this public notice. In the event no such objection/ communication is received, it shall be presumed that no person has/have any objection for the proposed transfer to be executed in favour of my Client, my Client shall proceed as if, there are no claims. Any right there after claimed shall be deemed to be knowingly waived.

**SCHEDULE OF PROPERTIES**

All that piece and parcels of Flat bearing No. 703, situated on 7th Floor, admeasuring area about 654.99 Sq. Fts. i.e. 60.85 Sq. Mtrs Carpet, Terrace admeasuring area about 12.37 Sq. Mtrs., along with Single Uncovered Parking No. 45 admeasuring area about 13.26 Sq. Mtrs, in Wing/Building No. C', in the Project/ Society known as "PRISTINE FONTANA Co. Operative Housing Society Ltd.". The said building is constructed on land bearing Survey No. 22, Hissa No. 1 to 4/4, at Village Bavdhan Khurd, Taluka Mulshi, Dist. Pune, within the jurisdiction of Sub Registrars Haveli Pune and within the local limits Pune Municipal Corporation, Pune

Together with all the rights, title and/or interest attached thereto.

**Advocate Abhijit Bharat Borole**

**Date:** 16/07/2024
**Place :** Pune

Add: Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030. **Mob: 8007799699**

## राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधील बाधितांना पुनर्वसीत दाखला मिळण्याची आपची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी(NDA) खडकवासला,पुणे उभारणीसाठी कोंढवे धावडे गाव, कोपरे गाव,अहिरे गाव,उत्तमनगर, शिवणे येथील ग्रामस्थांची शेती योग्य जमीन ही देशाच्या संरक्षणासाठी उभारलेल्या प्रबोधिनी साठी 1950 साली घेण्यात आली त्या बदल्यात काही ग्रामस्थांना या संरक्षण प्रबोधनी मध्ये नोकरी सुद्धा देण्यात आली पण सध्या अशा प्रकारच्या नोकर भरतीमध्ये स्थानिकांना प्रकर्षाने वगळले जाते.

आपल्या शेतजमिनीवर उभ्या असणाऱ्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी मुळे देशाच्या संरक्षणासाठी लागणारे अधिकारी या प्रबोधिनी मधून जातील आणि आपल्या या खडकवासला भागाचं नाव मोठं होईल तसेच देशाच्या संरक्षणासाठी आपल्या जमिनीवाटे का होईना एक पुण्याचे काम आपल्या हातून होईल या विचारांनी स्थानिक ग्रामस्थांनी आपली शेती ही संरक्षण प्रबोधिनी उभी करण्यासाठी सरकारला दिली.

महाराष्ट्रात धरणा साठी बाधित असणाऱ्या ग्रामस्थांना पुनर्वसन दाखले मिळतात जेणेकरून पुनर्वसनांसाठी आरक्षित असलेल्या सरकारी नोकरी व इतर सुविधांसाठी त्या पुनर्वसन दाखल्यांचा वापर होतो.धरणांसाठी बाधित शेत जमीन आणि देशाचे संरक्षणासाठी उभारलेल्या संरक्षण प्रबोधिनी साठी बाधित शेत जमीन या दोन्ही ही बाब एकच असल्यामुळे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (NDA) मध्ये गेलेल्या बाधितांना धरण प्रकल्पग्रस्तांच्या धर्तीवर पुनर्वसन दाखला मिळावा अशी मागणी आप पुणे शहर उपाध्यक्ष श्री निलेश वांजळे यांनी पुणे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांना निवेदन देऊन केली.

यावेळी उपस्थित पुणे शहर महिला आघाडी अध्यक्ष श्रीमती सुरेखा भोसले, वैभव टेकाळे, सागर कानगुडे, रॉबिन जेम्स हे उपस्थित होते.

**जाहीर आवाहन**

सर्व लोकांना कळविण्यात येत की धनंजय रामभाऊ तापकीर राहणार मुक्काम पोस्ट देहू मोशी रोड तापकीर नगर आळंदी देवाची पुणे४१२१०५ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असलेले चार चाकी खाजगी वाहन नंबर MH14-HQ-5811 असा असून सदर वाहन त्यांची एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती मनीषा धनंजय तापकीर यांच्या नावावर पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही हे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१९/०७/२०२४

**- श्रीमती मनीषा धनंजय तापकीर**
देहू मोशी रोड आळंदी देवाची
तापकीर नगर पुणे-४१२१०५

**जाहीरात**
**ग्रामपंचायत राजेगाव ता. दौंड, जि. पुणे**
**बी -१ निविदा नोटीस सन २०२३-२०२४**

ग्रामपंचायत यांच्याकडून खालील नमुद केलेल्या निविदा बी-१ निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदाराकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा नमुना ग्रामपंचायत राजेगाव, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक १६/७/२०२४ ते २३/७/२०२४ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ६ पर्यंत पोस्टाने ग्रामपंचायतमध्ये स्विकारले जातील तसेच सीलबंद निविदा ग्रामपंचायतीच्या सोयीनुसार दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | निविदा रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | शिग्रोबामाळ रस्ता काँक्रीटीकरण | ९,९९,९९९/- | १६/७/२०२४ ते २३/७/२०२४ | १००/- | ३०००/- |

**निविदा अटी :**
१. कोणतेही निविदा स्विकारणे, नाकारणे अधिकार ग्रामपंचायतला राहिल.
२. ग्रामपंचायत राजेगांव ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा राजेगांव खाते क्रं. १६०००२५००००००००१ वर फी भरल्याची पावती चलन दिल्यानंतर कोऱ्या निविदा उपलब्ध होतील.
३. पुर्वी कामांचे पुर्णत्वाचे दाखले जोडावित.
४. इसारा रक्कम ग्रामपंचायत राजेगांव खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा राजेगांव खाते क्र. १६०००२५००००००००१ या खात्यावर भरल्याची पावती जोडण्यात यावी तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
५. आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल. आपण सर्व नियमांत पात्र झाल्यावर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास सदर निविदा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायत राजेगांव यांनी राखुन ठेवला आहे.
६. कामाचे मूल्यांकन झाल्याशिवाय बिल अदा केले जाणार नाही.
७. नियमानुसार शासकीय कर कपाती केल्या जातील.

सही /-
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत राजेगांव ता. दौंड, जि. पुणे

सही /-
**सरपंच**
ग्रामपंचायत राजेगांव,
ता. दौंड, जि. पुणे

**PUBLIC NOTICE**

Know all men by this notice that the property described in the schedule written hereunder is presently owned and possessed by **Mr. Jignesh Arvindbhai Patel and Mrs. Shilpa Jignesh Patel.** Those owners have agreed to sell the said Property to my client. The owners have represented and assured to my client that the Owners are in possession of the said Property and have full and absolute right to sell & convey the said Property to my client and have further represented and assured my client that, the said Property is free from all encumbrances and their title to the said Property is Legal, Clear and Marketable. This notice is issued for verification of the owner's title to the said Property.

Any person/s or corporate body having any interest, claim, lien, mortgage, attachment, charge, maintenance right, easementary right, or any other right, title, etc. of whatsoever nature, in the said Property or any part thereof are hereby required to inform the undersigned, in writing with full details of their claim, right, title or interest in the said along with documentary evidence in support within 8 days from publication of this public notice. In the event no such objection/communication is received, it shall be presumed that no person has/have any objection for the proposed transfer to be executed in favour of my Client, my Client shall proceed as if, there are no claims. Any right there after claimed shall be deemed to be knowingly waived.

**SCHEDULE OF PROPERTIES**

All that piece and parcels of Flat No. B-43, situated on 7th Floor, admeasuring area about 540 Sq. Fts. i.e. 50.18 Sq. Mtrs., along with attached terrace admeasuring area about 100 Sq. Fts. i.e. 9.29 Sq. Mtrs., situated in building No. "B", in society known as "Vatsalyapuram (B) Co-operative Housing Society Limited", being constructed on land bearing S. No 52, Hissa No. 38+39 and 42, situated at village Kothrud, Taluka Haveli, Dist. Pune within the limits of Pune Municipal Corporation and jurisdiction of registration Sub Registrar Haveli, Pune.

Together with all the rights, title and/or interest attached thereto.

**Advocate Abhijit Bharat Borole**

**Date:** 16/07/2024
**Place :** Pune

Add: Office No 3, Yojana Complex, Ramanbaug Chowk, 502 Narayan Peth, Pune 411 030. **Mob: 8007799699**

## खा. सुळे यांनी केली घोषणा : १८ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

# शरद पवार इन्स्पायर फेलोशिप जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

SHARAD PAWAR INSPIRE FELLOWSHIP A Journey from Inspiration to Excellence



**बारामती :** आदरणीय शरद पवार साहेब यांच्या सहस्त्रचंद्र दर्शनाच्या निमित्ताने साहेबांच्या देदिप्यमान कारकिर्दीला सलाम करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण सेंटर' च्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप'च्या चौथ्या वर्षाची घोषणा चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी आज केली. ज्येष्ठ अणूशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील या फेलोशिप अंतर्गत कृषी (शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ॲग्रीकल्चर) , साहित्य (शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन लिटरेचर) आणि शिक्षण (शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन) या क्षेत्रातील गुणवंतांना भविष्यकाळातील नेतृत्वासाठी प्रेरीत केले जाणार आहे.

कृषी, साहित्य व शिक्षण क्षेत्रातील फेलोशिपसाठी www.sharadpawarfellowship.com या वेबसाईटवर इच्छुकांनी १८ जुलै ते १८ ऑक्टोबर २०२४ पर्यंत ऑनलाईन अर्ज व प्रस्ताव सादर करावेत. १८ ऑक्टोबर २०२४ नंतर स्वीकारले जाणार नाहीत. आलेल्या सर्व प्रस्तावांची तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली १९ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत तपासणी होऊन निवडप्रक्रिया पूर्ण होईल. निवड समितीच्या वतीने 'शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ॲग्रीकल्चर' साठी ८०, 'शरद पवार इन्स्पायर साहित्य फेलोशिप' साठी १२ तर शरद पवार इन्स्पायर शिक्षण फेलोशिप साठी ३० अशा एकूण १२२ फेलोंची निवड केली जाणार आहे. निवड झालेल्या फेलोंची घोषणा दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ रोजी फेलोशिपच्या वेबसाईटवर केली जाईल. दिनांक ८ डिसेंबर २०२४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे फेलोशिप मिळालेल्या फ़ेलोंना सन्मानपूर्वक फेलोशिप प्रदान केल्या जाणार आहेत.

कृषी क्षेत्रातील फेलोशिपसाठी ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामती व सह्याद्री फर्म्स नाशिक तसेच शिक्षण फेलोशिपसाठी एमकेसीएल फाउंडेशन व विवेक सावंत यांचे सहकार्य मिळाल्याचे खासदार सुळे यांनी यावेळी सांगितले. कृषी क्षेत्रातील फेलोशिपसाठी प्रोफेसर निलेश नलावडे, साहित्य क्षेत्रातील फेलोशिपसाठी प्रा. नितीन रिंढे तर शिक्षण क्षेत्रातील फेलोशिपसाठी विवेक सावंत हे मुख्य समन्वयक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या उपक्रमाला पहिल्या वर्षापासून भरभरुन प्रतिसाद दिल्याबद्दल खासदार सुप्रिया सुळे यांनी सर्व फेलोंचे आभार मानले असून तिन्ही वर्षी फेलोशिप मिळालेल्या सर्वांचे अभिनंदन केले आहे. निवड झालेले सर्वजण अतिशय उत्तमरीत्या काम करत आहेत याचे आम्हाला समाधान आहे व त्यांचा वेळोवेळी नियमितपणे आढावा घेतला जात असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## सासवड येथे गोळीबारात एक गंभीर जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सासवड एस टी स्टँड जवळील आईस्क्रीम पार्लरमध्ये दुसरी चार वाजण्याच्या सुमारास तिन अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबारात केला यात राहुल अशोक टिळेकर वय ४१ हा गंभीर जखमी झाला असून त्यावर पुढील उपचारासाठी पुण्यातील खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. सासवड पोलिस ठाण्याच्या वतीने या ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवला असुन हला कशामुळे झाला व कोणी केला हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. सासवड परिसरात अशा प्रकारे गुन्हे घडु लागल्यावर नागरीक भयभीत होऊन गेले आहेत. गुन्हेगारीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना झाली आहे. सदर घटना सोळंकी हाईट सासवड येथील गाळ्यात झाली आहे.

## Selected



## तळेगावच्या आनंदाश्रम प्राथमिक शाळेत फुलला भक्तीचा मळा

**तळेगाव ढमढेरे :** तळेगाव ढमढेरे ता. शिरुर येथील आनंदाश्रम प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी निमित्ताने दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असता शाळेत भक्तीचा मळा फुलला असल्याचे दिसून आले आहे. तळेगाव ढमढेरे ता. शिरुर येथील आनंदाश्रम प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी टाळ मृदंगाच्या तालात, हरिनामाच्या गजरात ग्यानबा तुकारामचा गजर करत वारीचा अनुभव घेतला, दरम्यान शाळेतील यश गोरे व प्रांजल मदने यांनी विठ्ठल रुक्मिणीची भूमिका साकारली, यावेळी मुख्याध्यापक संदीप गोसावी व अधीक्षिका विजया अहिरे यांनी पालखीचे पूजन करून दिंडी सोहळ्याची सुरुवात केली. दरम्यान विठू नामाच्या गजरात पालखीची शाळेपासून सुरुवात करून भैरवनाथ नगर मार्गे परत शाळेत मार्गस्थ करण्यात आली, यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने रिंगण, फुगड्या खेळून दिंडी सोहळ्यात सहभाग घेतला. सदर दिंडी सोहळ्याचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक संदीप गोसावी, विजय भोर, शंकर शिंदे, निलेश देसले, राजेश्री येरपुडे, सुनीता पाटील, कविता बागले, दिलीप गायकवाड, नवल राठोड आदींनी केले असून सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून करत दिंडीचे समारोप करण्यात आले आहे.

# भिगवणमध्ये रस्त्यांच्या विविध कामांचे भूमिपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भिगवण :** भिगवणमध्ये मजबूत रस्त्यांचे जाळे निर्मितीसह अनेक मुलभूत सुविधांची कामे पूर्णत्वास जात आहे.अनेक नव्या कामांना चालना मिळत असून दि.१७ रोजी भिगवणमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन व उदघाटन मा.सहकारमंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यामध्ये प्रामुख्याने येथील वॉर्ड क्र.१ मधील मेन व्यापार पेठ ते तक्रारवाडी रस्ता काँक्रीटीकरण करणे या कामाचे भूमिपूजन (रक्कम ५६ लक्ष रु) व भिगवण स्टेशन येथे नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडीचे उद्‌घाटन करण्यात आले.(रक्कम ११ लक्ष रु) भिगवणची मुख्य बाजारपेठ परिसरातील २० ते २५ खेडेगावांशी जोडलेली असल्याने याठिकाणी दैनंदिन कामकाजा निमित येणाऱ्या लोकांची संख्या जास्त असून हा वर्दळीचा रस्ता आहे.चांगले रस्ते निर्मितीमुळे विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे. त्यामुळे हा रस्ता चांगल्या दर्जाचा होणे अपेक्षित आहे. यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की,भिगवण ग्रामपंचायत ही तालुक्यातील एक मोठी आणि महत्वाची ग्रामपंचायत आहे.

या ठिकाणी मोठी व्यापारपेठ आहे. यादृष्टीने येथील रस्त्याचे जाळे महत्वाचे आहे. याबाबत मागणी होत असताना आता हे काम सुरू होत असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान आहे.या कार्यक्रमाप्रसंगी सरपंच दिपीका क्षीरसागर, उपसरपंच मुमताज शेख, प्रतिमा देहाडे, विलास वाघमोडे, अशोकराव शिंदे, अभिमन्यू खटके, यशवंत वाघ, पराग जाधव, संजय देहाडे, प्रा.तुषार क्षीरसागर, संजय रायसोनी, जावेद शेख, श्यामराव परकाळे, श्यामराव खटके, संपत बंडगर, प्रशांत वाघ, सतीश काळे, रणजित भोंगळे, अमर धवडे, सुनील वाघ, सुनील काळे, हनुमंत काजळे, राजू गाडे, सुजित सूर्यवंशी,सत्यवान भोसले, तेजस देवकाते, अँड.सुरज खटके, राकेश खटके, दिनेश अनभुले, प्रताप भोसले, सुधीर भोसले व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विकास कामे

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**भिगवण :** भिगवणमध्ये विविध विकासकामांचे भूमिपूजन व उद्‌घाटन मा.सहकारमंत्री व राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

## मुस्लीम बांधवांसह सर्व धर्मीयांनी काढली ताबूत मिरवणूक



**शिक्रापूर :** राज्यभरात मुस्लीम धर्मियांचा मोहरम सण मोठ्या उत्साहात साजरा होत असताना अनेक ठिकाणी मुस्लीम समाजाचे ताबूत मिरवणूक निघत असताना करंदी येथे साजरा होणारा मोहरम सण मोठ्या उत्साहात साजरा झाला असून सर्वधर्मीय नागरिक व ग्रामस्थ यामध्ये सहभागी झाले असल्याने ग्रामस्थांनी सर्व धर्म समभावतेच संदेश दिला आहे. करंदी ता. शिरुर येथे गेली अनेक वर्षांपासून सर्व धर्मियांच्या सहभागाने मोहरम सण मोठ्या उत्साह व जल्लोषात साजरा होत असून नुकताच मोहरम सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, मुस्लीम धर्मियातील हसन व हुसेन यांच्या बलिदानाच्या पित्यर्थ मुस्लीम बांधव हा सण साजरा करण्यात येत असतो, आज आयोजित करण्यात आलेल्या ताबूत मिरवणूक प्रसंगी ताजुद्दीन मनियार, राजुद्दिन मनियार, जुनेद मनियार, देवराम धोत्रे, शफिक इनामदार, अवेज मनियार, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आजिनाथ शिंदे, जितेंद्र पानसरे, पोलीस हवलदार संदीप कारंडे, आत्माराम तळोले, पोलीस पाटील वंदना साबळे, राजू लांडगे, सतीश गावडे, कांतीलाल गावडे, सुभाष शिंदे यांसह आदी मुस्लिम बांधव व नागरिक उपस्थित होते, यावेळी मुस्लीम बांधवांच्या आकर्षक पद्धतीने सजवलेल्या ताबूतची गावातीन मिरवणूक काढण्यात आली.

## तांदूळवाडी चौकातील विठ्ठल मंदिरास रोषणाई,भाविकांची गर्दी

**बारामती :** बारामती शहरातील तांदूळवाडी वेस चौका मधील नामदेव शिंपी समाजाच्या विठ्ठलरुक्मिणी मंदिराला आषाढी एकादशीचे निमित्त विद्युतरोषणाई व सजावट करण्यात आली आहे. आज बुधवार रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी पहाटे ५.३० ते सकाळी ७.१५ वाजेपर्यंत काकडा आरती व भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी तसेच दिवसभर भाविक भक्तांनी विशेषत: महिला भाविकांनी गर्दी केली.आषाढी एकादशीच्या दिवशी दर वर्षीप्रमाणे प्रसाद म्हणून भाविकांना खिचडी वाटपाची व्यवस्था केली. भाविकांनी आषाढी एकादशीला मंदिरात दर्शनाचा तसेच खिचडी प्रसादाचा लाभ घ्यावा,असे आवाहन मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीने पुजारी गणेश वनारसे यांनी अगोदरच केले होते.

# न्यूरोथेरपी व नेचुरोपॅथी चिकित्सा शिबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जुन्नर :** आमदार अतुल बेनके यांच्या वाढदिवसा निमित्ताने जुन्नरमध्ये दि. २३ ते २७ या कालावधीत न्यूरो थेरपी व नेचुरोपॅथी चिकित्सा शिबिराचे आयोजन कोंडाजी बाबा डेरे आश्रम सभागृहात करण्यात आलेले आहे. श्री वल्लभ नागरी सहकारी पतसंस्था जुन्नर व श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था नारायणगाव यांच्या वतीने या पाच दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये गुडघेदुखी, कंबरदुखी, मानदुखी, सांधेदुखी या आजारांवर विना ऑपरेशन जर्मन टेक्नॉलॉजीद्वारा उपचार करण्यात येणार आहेत. राजस्थान, पंजाब, कर्नाटक येथील तज्ञ थेरपिस्ट कडून उपचार व मार्गदर्शन केले जाणार आहे. मंगळवार दि २३ ते शनिवार दि २७ या कालावधीत सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

## सणसवाडीत दारु अड्ड्यावर पोलिसांचा छापा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सणसवाडी ता. शिरुर येथील भुजबळ वस्ती रस्त्याचे कडेला हॉटेल भैरवनाथ खानावळ येथे एक इसम अवैध्य पद्धतीने देशी विदेशी दारुची विक्री करत असल्याची माहिती शिक्रापूर पोलिसांना मिळाली, त्यांनतर सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे, पोलीस हवलदार अमोल दांडगे, विकास पाटील यांनी सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता त्यांना एक इसम दारुच्या बाटल्या विक्री करताना मिळून आला, यावेळी पोलिसांनी सदर इसमाला ताब्यात घेत त्याच्या जवळील दारुसाठा जप्त केला, याबाबत पो. ना.विकास जालिंदर पाटील यांनी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली आहे.

# बारामतीत घडली हृदयद्रावक घटना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** येथील कृषी विज्ञान केंद्राच्या महिला वॉश रूममध्ये एक नवजात स्त्री जातीचे मृत अर्भक सापडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी माळेगाव पोलिस ठाण्यात कृषी विज्ञान केंद्राचे सहाय्यक व्यवस्थापक कृष्णा तावरे यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना कृषी विज्ञान केंद्राच्या कर्मचारी वर्गाच्या लक्षात आल्यानंतर तात्काळ पोलिसांना संपर्क करण्यात आला. मंगळवार दि. १६ जुलै रोजी दुपारी ही घटना उघडकीस आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी तावरे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार माळेगांव येथील कृषी विज्ञान केंद्राच्या महिला वॉश रूममध्ये नवजात स्त्री जातीचे अर्भक कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अर्भकाचा जन्म झाल्याचे लपवून ठेवून बालकाची देखभाल न करता त्याचा मृत्यू घडवून आणण्याच्या उद्देशाने त्यास उघड्यावर टाकून दिले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या कारणावरून अज्ञात व्यक्ती विरोधात तालुक्यातील माळेगांव पोलिस ठाण्यात अर्भकाला जन्माला येण्यापासून रोखण्याच्या किंवा त्यांच्या जन्मानंतर त्याचा मृत्यु होण्यास कारणीभूत राहिल्याच्या कारणावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय नागरगोजे हे करीत आहेत.

POSITIVE NEWS!

खडकवासला

वारकरी, जेष्ठ नागरिकांचा समावेश



# शिवसेनेतर्फे विठ्ठलवाडी येथील भाविकांसाठी मोफत रिक्षा प्रवास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खडकवासला :** शिवसेना खडकवासला मतदार संघातर्फे धायरी, वडगाव आणि माणिकबाग भागातील वारकरी, जेष्ठ नागरिक आणि भाविकांसाठी मोफत रिक्षा सेवा उपलब्ध करण्यात आली होती. या सेवेचा शुभारंभ शहर प्रमुख गजानन थरकुडे यांचे शुभहस्ते करण्यात आला.

माजी नगरसेवक अण्णा दांगट, उपशहर प्रमुख भरत कुंभारकर, विधानसभा प्रमुख नितीन वाघ, नाना मरगळे, केतन शिंदे, संतोष गोपाळ, मनीष जगदाळे, राजू चव्हाण, महेश पोकळे, विनायक नलावडे, शिवाभाऊ पासलकर, संतोष शेलार,रामदास आबा वांजळे, निखिल जावळकर, प्रथमेश भुकण, महेश विटे, धनंजय खाडे, बाळा खाटपे, सचिन भालेकर, राजू गवळी, संजय बालगुडे, किरण पोकळे हे उपस्थित होते. अनेक जेष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांनी या सेवेचा लाभ घेतला. या उपक्रमाचे आयोजन केतन शिंदे आणि नाना मरगळे यांनी केले.

## आषाढी निमित्त फ्रेंड्स स्कूलचा पालखी सोहळा उत्साहात

# कोरेगाव भीमात भरली विठ्ठल नामाची शाळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वाघोली :** विठ्ठल नामाची शाळा भरली...! या उक्ती प्रमाणे कोरेगाव भीमा(ता.शिरूर) येथे फ्रेंड्स एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित फ्रेंड्स स्कूलच्या वतीने गावाला वळसा घालून अतिशय आनंदमय वातावरणात पालखी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला.यामध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर यात्रेनिमित्त पालखी मिरवणूक काढली. यात सर्व विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्याचा व वारकरी संप्रदायाचा पोशाख परिधान करून सर्वांचे लक्ष वेधले.दिंडीत विद्यार्थ्यांच्या हातात मोठा भगवा झेंडा, पालखी व त्यामध्ये पांडुरंग व रुख्मिणी मातेच्या



प्रतिमा,त्यानंतर आरास केलेल्या विद्यार्थिनी, भजन व गायन करणाऱ्या मुलींचा संच, अशी सर्व दिंडी आणि वारकरी संप्रदायाची पताका व ज्ञानोबा तुकाराम असा नामघोष करीत वाद्याच्या तालावर पावली खेळत विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या.


फ्रेंड्स एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या उपस्थित संचालकांच्या हस्ते पालखीचे पूजन पार पडले.विद्यार्थ्यांनी यावेळी विठ्ठल-रुक्मिणी,संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, संत मुक्ताबाई, संत नामदेव, संत एकनाथ अशा अनेक वेशभूषा केलेल्या होत्या.या सोहळ्यामध्ये नर्सरी विभागापासून इयत्ता दहावीच्या वर्गापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी विविध अभंग, भजन यावर ताल धरत विठ्ठल नामाचा जयघोष केला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष पालखी ढोल,ताशा, लेझिमच्या गजरात शाळेपासून कोरेगाव भीमा ग्रामपंचायत पटांगणात आणली. अशी माहिती फ्रेंड्स एज्युकेशन स्कूलचे शिक्षक प्रा.मारुती दरेकर यांनी दिली. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी रिंगण करून विद्यार्थ्यांच्या फुगडीचे विविध प्रकार सादर केले.टाळ,मृदंगाच्या तालावर भजन गायन केले.पालखी सोहळ्याची सांगता पसायदानाने केली.पालखी सोहळ्याचे नियोजन उपमुख्याध्यापिका अजिताकुमारी नायर यांच्या मार्गदर्शकनाखाली नर्सरी विभागाच्या प्रमुख निर्मला गव्हाणे, प्राथमिक विभागाच्या प्रमुख वैशाली वाळुंज, वैशाली धर्माधिकारी तसेच माध्यमिक विभागाचे वरिष्ठ शिक्षक मारुती दरेकर, सत्यम हंबीर, शंकर बोरकर, भाविन सैंदाणे, श्रीमंत प्रताळे, प्रियंका फडतरे, शितोळे मॅडम, जाधव मॅडम, अनिता हुंबे इतर सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी केले. पालखी सोहळ्याच्या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष राजाराम ढेरंगे, सचिव दिलीप भोसले, उपाध्यक्ष प्रकाश खेरमोडे, संचालक शंकर गव्हाणे, संचालक रामदास सव्वाशे, संचालक राजेंद्र गव्हाणे, संचालक सुनील दुगड, संचालक राजेंद्र गव्हाणे, संचालक डॉ.संजय पाटील, संचालक जयकांत देशमुख तसेच कोरेगाव भीमाचे सरपंच संदीप ढेरंगे, माजी सरपंच अमोल गव्हाणे, ग्रामपंचायत सदस्य महेश ढेरंगे पालखी सोहळ्यास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

#रा

## दोन जवान जखमी : सुरक्षा दलांचे प्रत्युत्तर

# डोडात पुन्हा चकमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**जम्मू :** डोडा जिल्ह्यात दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर हल्ला केला असून, त्याला प्रत्युत्तर म्हणून कारवाई करण्यात आली. या चकमकीत आतापर्यंत दोन जवान जखमी झाले असून, त्यांना स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यानंतर त्यांना एअरलिफ्ट करून आर्मी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डोडा येथील कास्तीगड भागात गुरुवारी पहाटे सर्च ऑपरेशन दरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला.

एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, पहाटे पावणेचारच्या सुमारास लष्कराला कडेकोट बंदोबस्त असताना, तपासणीत संशयास्पद हालचाली दिसल्या. शोधादरम्यान दहशतवाद्यांनी गोळीबार केला. सुरुवातीच्या झटापटीत दोन जवान जखमी झाले. असे मानले जात आहे की, हे तेच दहशतवादी आहेत, ज्यांनी सोमवारी देसाच्या जंगलात लष्कराच्या पथकावर हल्ला केला होता. या हल्ल्यात कॅप्टनसह चार जवान शहीद झाले होते.

कास्तीगड परिसरातील जद्दन बाटा गावात पहाटे दोन च्या सुमारास दहशतवाद्यांनी शोध मोहिमेसाठी सरकारी शाळेत उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या सुरक्षा छावणीवर गोळीबार केला. सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर दिले आणि दोन्ही बाजूंमध्ये तासाभराहून अधिक काळ गोळीबार सुरू होता. दहशतवाद्यांच्या गोळीबारात दोन जवान जखमी झाले असून दहशतवाद्यांचा खात्मा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सोमवारी आणि मंगळवारच्या मध्यरात्री दहशतवाद्यांनी केलेल्या चकमकीत एका कॅप्टनसह चार जवान शहीद झाल्यानंतर देसा आणि लगतच्या जंगलात मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू करण्यात आली होती. या कारवाईचा गुरुवारी चौथा दिवस असून मंगळवार आणि बुधवारच्या मध्यरात्री देसा जंगलात दोन ठिकाणी गोळीबार झाला.

---

## राष्ट्रसंचार इन्फोग्राफिक्स

## अग्निवीरांसाठी हरियाणाची मोठी घोषणा

### संरक्षण

**हरियाणा सरकारने** अग्निवीर योजना लाभार्थ्यांसाठी मोठी घोषणा केली आहे. हरियाणा सरकारने अग्निवीरांसाठी विशिष्ट नोकऱ्यांमध्ये १० टक्के आरक्षण जाहीर केले आहे. या आरक्षणाचा लाभ हरियाणातील कॉन्स्टेबल, खाण रक्षक,



वनरक्षक, जेल वॉर्डन आणि विशेष पोलीस अधिकारी (एसपीओ) यांच्या थेट भरतीसाठी लागू होईल, असे हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सैनी यांनी सांगितले. दरम्यान, अग्निवीरांसाठी लागू करण्यात आलेल्या आरक्षणांतर्गत हवालदार, खाण रक्षक, वनरक्षक, जेल वॉर्डन आणि एसपीओ या पदांसाठी १० टक्के कोट्याचा समावेश केला आहे. तसेच, गट ब आणि क नोकरीसाठी तीन वर्षांची वयोमर्यादा आणि पाच वर्षांची सूट समाविष्ट करण्यात आली आहे. पंतप्रधान मोदी यांनी सुरू केलेल्या अग्निवीर योजनेचा युवकांना फायदा व्हावा, हा उद्देश असल्याचे सैनी यांनी स्पष्ट केले. याव्यतिरिक्त, गट सी नागरी पदांसाठी ५ टक्के क्षैतिज आरक्षण तर गट ब नोकऱ्यांसाठी १ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. अग्निवीरांना दरमहा ३०,००० रुपयांपेक्षा जास्त पगार देणाऱ्या औद्योगिक युनिट्सना राज्याकडून वार्षिक ६०,००० रुपये अनुदान मिळेल. शिवाय, अग्निवीरांना व्यवसाय सुरू करायचा असेल तर ते ५ लाख रुपयांच्या कर्जासाठी पात्र असतील, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

---

## » Selected

## निर्देशांक ६२७ अंकांनी वधारला

**मुंबई** : भारतीय शेअर बाजार गुरुवारी सलग चौथ्या सत्रात वधारला आणि निफ्टी २४,८०० वर बंद झाला. निर्देशांक ६२६.९१ अंकांनी वधारून ८१,३४३.४६ वर, तर निफ्टी १८७.८० अंकांनी वधारून २४,८००.८० वर बंद झाला. सुमारे १,९१२ समभाग वधारले, २,१९४ समभाग घसरले आणि ७५ समभाग स्थिर राहिले. टीसीएस, एलटीआय, ओएनजीसी, बजाज फिनसर्व्ह आणि विप्रो यांचे समभाग निफ्टीवर सर्वाधिक वधारले, तर एशियन पेंट्स, हिरो मोटोकॉर्प, ग्रासिम, कोल इंडिया आणि बजाज ऑटो यांचे समभाग घसरले. बँक, ऑटो, आयटी, एफएमसीजी आणि टेलिकॉम क्षेत्रात ०.३-२ टक्के, तर कॅपिटल गुड्स, मेटल, पॉवर, मीडिया १-३.५ टक्क्यांनी वधारले. बीएसईमिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांक प्रत्येकी १ टक्क्यांनी घसरला.

## एल अ‍ॅण्ड टी फायनान्सला नफा

**पुणे** : भारतातील आघाडीच्या नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी एक असलेल्या एल अ‍ॅण्ड टी फायनान्स लिमिटेडने ३० जून २०२४ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीत २९ टक्के वार्षिक वाढीसह ६८६ कोटी रुपयांचा सर्वकालीन उच्च करोत्तर नफा (पॅट) नोंदवला. कंपनीने पहिल्या तिमाहीत (३० जून २०२४ अखेर) १४ हजार ८३९ कोटी रुपयांच्या किरकोळ कर्जाचे वितरण केले आहे. त्यात वार्षिक आधारावर ३३ टक्के वाढ झाली आहे. याच तिमाहीत एकूण रिटेल कर्जवितरणाची रक्कम ८४ हजार ४४४ कोटी रुपयांवर पोहचली असून त्यात वार्षिक आधारावर ३१ टक्के वाढ झाली आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ सुदिप्ता रॉय यांनी यासंदर्भातील माहिती दिली. कंपनीचे ग्राहक-केंद्रीत प्लॅनेट अ‍ॅप हे ग्राहकांसाठी अतिशय शक्तिशाली डिजीटल संपर्क माध्यम ठरले आहे. आजतागायत या अ‍ॅपने डाऊनलोडचा एक कोटींचा टप्पा पूर्ण केला आहे. यात ग्रामीण भागाचा वाटा १२ लाखांपेक्षा अधिक आहे.

---

## पाटणा येथे सीबीआयची मोठी कारवाई

# नीट प्रकरणी तिघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पाटणा :** नीट-यूजी पेपर फुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने पाटणा येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या तीन वैद्यकीय विद्यार्थ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांचे मोबाइल फोन आणि लॅपटॉपही एजन्सीने जप्त केले आहेत.

२०२१ च्या बॅचमधील विद्यार्थ्यांना बुधवारी उशिरा वसतिगृहातून ताब्यात घेतल्यानंतर, चौकशीसाठी अज्ञात स्थळी नेण्यात आले. संबंधित विद्यार्थ्यांच्या खोल्या सील करण्यात आल्याने, संस्थेतील इतर विद्यार्थ्यांना मोठा धक्का बसला आहे. मंगळवारी पाटणा आणि हजारीबाग (झारखंड) येथील पंकज कुमार उर्फ आदित्य आणि राजू सिंह या दोन मुख्य आरोपींच्या चौकशीनंतर विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आले.

पेपर फुटी प्रकरणात सहभागी असलेल्या टोळीच्या संपर्कात एम्स-पाटण्याचे विद्यार्थी असल्याचे सांगण्यात आले.

नालंदा येथील संजीव कुमार सिंह ऊर्फ लुटन मुखिया यांच्या नेतृत्वाखालील 'सॉल्व्हर्स गँग'च्या सदस्यांना झारखंडमधील हजारीबाग येथून मिळालेले प्रश्न सोडविण्यासाठी एम्सच्या विद्यार्थ्यांनी मदत केली होती, अशी माहिती सूत्रांनी दिली.

'एम्स-पाटणा'च्या विद्यार्थ्यांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती तपास यंत्रणेतील सूत्रांनी दिली.

झारखंडमधील बोकारो येथील रहिवासी पंकज कुमार याला ५ मे रोजी होणाऱ्या परीक्षेपूर्वी हजारीबाग येथील एनटीए ट्रंकमधून प्रश्नपत्रिका चोरल्याच्या आरोपाखाली पाटण्यात अटक करण्यात आली आहे.

पंकज ऊर्फ आदित्य हा जमशेदपूरयेथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी) मधून २०१७ च्या बॅचचा सिव्हिल इंजिनीअर आहे. कटकामडाग पोलिस ठाण्याच्या हद्दीतील हजारीबागच्या रामनगर परिसरातील एका गेस्ट हाऊसमधून राजू सिंग असे दुसऱ्या आरोपीचे नाव आहे.

## सुरुंगाच्या स्फोटात दोन जवान शहीद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रायपूर :** रायपूरपासून ३८० किलोमीटर दक्षिणेस असलेल्या विजापूर जिल्ह्यातील तरेम येथील मंडीमार्का जंगली भागात नक्षल्यांनी केलेल्या शक्तिशाली आयईडी स्फोटात विशेष कृती दलाचे (एसटीएफ) दोन जवान हुतात्मा झाले, तर चार जवान जखमी झाले.

कॉन्स्टेबल भरतलाल साहू आणि कॉन्स्टेबल सत्यर सिंग कांगे अशी मृत एसटीएफ जवानांची नावे आहेत. नक्षली लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर सीआरपीएफ, एलिट कोब्रा, छत्तीसगड आर्म्ड फोर्स (सीएएफ), जिल्हा राखीव गार्ड आणि एसटीएफच्या संयुक्त पथकाने विशेष मोहीम सुरू केली होती. शोध मोहीम आटोपून परतत असताना, सुरुंगाच्या स्फोटात जवान शहीद झाले.

# उद्योगजगताच्या विरोधामुळे आरक्षण रद्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बेंगळुरू :** कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी खासगी नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना १०० टक्के आरक्षण देण्याची घोषणा केल्यानंतर, त्याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उद्योग जगतातून उमटल्याने, कर्नाटकातील काँग्रेस सरकारला हा निर्णय मागे घ्यावा लागला.

कर्नाटक सरकारने खासगी उद्योगांमध्ये क आणि ड वर्ग श्रेणीत १०० टक्के स्थानिकांना आरक्षण देण्यात येईल, अशी घोषणा केली होती. मात्र, याविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटल्याने, आता ही मर्यादा क श्रेणीसाठी ५० टक्के तर ड श्रेणीसाठी ७० टक्के इतकी असेल, असे कर्नाटक सरकारने म्हटले होते. मात्र, आता कर्नाटक सरकारने खासगी उद्योगधंद्यामधील स्थानिकांना आरक्षण देण्याचे विधेयक थांबवत असल्याचे बुधवारी रात्री उशिरा जाहीर केले. आयटी उद्योगाने कर्नाटक सरकारला इशारा दिल्याने, हे विधेयक मागे घेतले गेले, अशीही माहिती आहे. खासगी उद्योगांमध्ये आरक्षण देणारे हे वादग्रस्त विधेयक म्हणूनच कर्नाटकातील काँग्रेस सरकारला थांबवावे लागले आहे.

स्थानिकांना खूश करण्यासाठी कर्नाटक सरकारने हे विधेयक आणले होते. तथापि, खासगी उद्योगधंद्यांचे यामुळे नुकसान होणार असल्याने, राज्याच्या जागतिक प्रतिष्ठेला धोका पोहोचू शकते, हे नॅसकॉमसारख्या संघटनांनी स्पष्ट केले. २०० अब्ज डॉलरच्या तंत्रज्ञान उद्योगाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या संघटनेने स्पष्टपणे म्हटले आहे की, अशा कायद्यामुळे कंपन्या अन्यत्र स्थलांतर करण्याची शक्यता आहे. अशा नियमामुळे कंपन्या इतर राज्यात स्थलांतरित होण्याचा विचार करू शकतात. याचा परिणाम टॅलेंटवरही होईल. त्यामुळे बुधवारी रात्री उशिरा हा निर्णय मागे घेतला गेला.

---

## पान १ वरून

### खाऊगल्ल्यांमध्ये गुंडगिरीचे वारे

व्यापार यामुळे पुण्याची देशभरात बदनामी झालेली असताना खाद्यपदार्थ व्यावसायिकांची दहशत पुणेकरांना वेठीस धरत आहे. ही मंडळी दादागिरी करत असल्याने पुणेकर हैराण झाले आहेत. महापालिकेकडे लेखी तक्रार करणाऱ्या नागरिकाला धमकावणे, दमदाटी करणे असे प्रकार शहरात सर्रास घडत आहेत. यामुळे रहिवासी भीतीमुळे तक्रार करण्यासाठी समोर येत नाहीत.

महापालिकेने शहरात अधिकृत व्यावसायिकांना परवाने दिलेले आहेत. पण त्याचसोबत अनधिकृत व्यावसायिकांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पादचारी मार्ग, रस्ता, चौक या ठिकाणी जेथे मोकळी जागा असेल तेथे स्टॉल किंवा गाडा लावून लगेच अतिक्रमण केले जाते. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई केल्यानंतर व्यावसायिक दंड भरून आपले साहित्य सोडवून आणतात आणि पुन्हा त्याच ठिकाणी अतिक्रमण करतात. खाऊगल्ल्यांमधील गाड्या, स्टॉलवर विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची विक्री होते. नागरिकांचा मोठा प्रतिसादही त्यास मिळतो. अरुंद गल्ल्यांमध्ये अनेक स्टॉल लावले असल्याने तेथे पार्किंगची समस्या निर्माण झाली आहे. तसेच, अस्वच्छता निर्माण झालेली असते. अनेक विक्रेते त्यांचे शिल्लक असलेले अन्न, भांडे धुतलेले खरकटे पाणी तेथे जवळच असलेल्या पावसाळी गटारात टाकतात. हे अन्न खराब झाल्यानंतर चेंबरमधून प्रचंड दुर्गंधी परिसरात निर्माण होते. अशा प्रकारे अस्वच्छता निर्माण करणाऱ्या व्यावसायिकांवर महापालिकेकडून कारवाई केली जात नाही.

### पिंपरीत शुभस्य शीघ्रम्

लोकसभा निवडणुकांदरम्यान महाराष्ट्रभर निर्भय बनो चळवळीच्या माध्यमातून जनजागृती करणारे ॲड. असीम सरोदे, विश्वंभर चौधरी, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.

भोसरी मतदारसंघातील माजी नगरसेवकांचा शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश झाला आहे. पिंपरी आणि चिंचवड या दोन्ही मतदार संघातील भाजपसह इतर पक्षातील माजी नगरसेवक, पदाधिकारी लवकरच प्रवेश करणार आहेत. भोसरीतील भाजपचे अनेक माजी नगरसेवक आमदारांच्या कारभाराला कंटाळले आहेत. यातील सात - आठ जण उघड विरोधाची भूमिका घेत आहेत. या माजी नगरसेवकांसह भाजपचे अनेक माजी नगरसेवक संपर्कात असल्याचा दावा कामठे, अजित गव्हाणे यांनी केला आहे.

महापालिकेच्या पाच वर्षांच्या सत्ता काळात आणि भाजप आमदाराच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात महापालिकेतील प्रत्येक कामात रिंग आणि भ्रष्टाचार सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला.

### मनोरमा खेडकर अखेर जाळ्यात

मनोरमा खेडकरांचे काही दिवसांपूर्वी स्थानिक शेतकऱ्यांना धमकावतानाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल व्हायरल झाले होते. पुणे पोलिसांशी त्यांनी हुज्जतही घातली होती. गेल्या सात दिवसांपासून मनोरमा खेडकरांचा तपास पोलिस करत होते. मात्र, त्या गुंगारा देत होत्या. अखेर पोलिसांनी त्यांना



महाडजवळील हिरकणीवाडी येथे हॉटेल पार्वती निवासमध्ये ताब्यात घेतले. श्रीमती खेडकर व अन्य एक व्यक्ती तेथे बुधवारी रात्री साडेनऊच्या सुमारास दादासाहेब ज्ञानदेव ढाकणे व इंदूबाई ज्ञानदेव ढाकणे या नावाने नोंद करून उतरले होते. विशेष म्हणजे, या नावांचा पुरावा म्हणून त्यांनी आधार कार्डदेखील दाखवले होते. पहाटे अडीचच्या सुमारास पुणे ग्रामीणचे पोलीस पथक तेथे पोहोचले. एका अज्ञात क्रमांकावरून आलेला फोन ट्रेस केल्यानंतर त्यातील आवाज मनोरमा खेडकर यांच्यासारखा वाटल्याने संशयावरून पोलीस तेथे गेले होते आणि सदर महिला खेडकरच असल्याचे निष्पन्न झाले. स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करून पोलिस त्यांना पुण्याला घेऊन आले. त्यानंतर सर्व प्रक्रिया पूर्ण करून वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतर कोर्टात पोलिसांनी खेडकर यांना सात दिवसांची पोलिस कोठडी द्यावी, अशी मागणी केली; मात्र न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. मनोरमा खेडकर यांच्यासह त्यांचे पती दिलीप खेडकर, अंबादास खेडकर, दोन पुरुष बाउंसर, दोन महिला बाउन्सर आणि इतरांवर शेतकरी पंढरीनाथ कोंडीबा पासलकर यांच्या फिर्यादीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**वादाच्या जमिनीचा वाद**

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातल्या धडवली गावात खेडकर कुटुंबाने २५ एकर वादाची जमीन खरेदी केली होती. या जमिनीचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे शेजारी शेतकऱ्यांनी विरोध केला होता. त्यावेळी मनोरमा खेडकर बाउन्सर अन् गुंड घेऊन तेथे गेल्या व त्यांनी हातात पिस्तूल घेऊन या शेतकऱ्यांना धमकावले होते. वर्षभरापूर्वीच्या या प्रकाराचा हा व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यानंतर गुन्हा दाखल झाला.

---

## चकमक

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**ढाका :** बांगलादेश येथे सत्ताधारी अवामी लीगची विद्यार्थी शाखा आणि विरोधकांमध्ये कॉलेज परिसरात चकमक उडाली.

## भारतावरील आंतरराष्ट्रीय दबाव अन्यायकारक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत ही एक महान शक्ती आहे जी आपले राष्ट्रीय हित ठरवते आणि आपले मित्र निवडते. तथापि, भारताने रशियासोबत केलेल्या ऊर्जा सहकार्यामुळे भारतावर वाढलेला आंतरराष्ट्रीय दबाव हा पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे मत रशियाचे परराष्ट्रमंत्री सेर्गेई लावरोव्ह यांनी व्यक्त केले. ते पत्रकारांना संबोधित करत होते. लॅव्हरोव्ह यांनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात मॉस्कोमध्ये नुकत्याच झालेल्या बैठकीबद्दल युक्रेनचे वक्तव्य हे अवमानकारक असल्याचे म्हटले. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांनी मोदींच्या रशिया भेटीवर टीका केली होती. भारताने युक्रेनला आपली नाराजी स्पष्ट शब्दांत कळवली होती.

रशियाकडून भारताने तेल खरेदी करण्याचे धोरण अवलंबले त्यावेळी आंतरराष्ट्रीय समुदायाने त्याविरोधात नाराजी व्यक्त केली होती.

---

## केशवप्रसाद मौर्य यांच्यावर सर्वांची नजर

# उत्तर प्रदेशमध्ये वाहतेय बदलाचे वारे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**लखनौ :** उत्तर प्रदेशात भाजपमध्ये काय सुरू आहे? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. मात्र, ज्या व्यक्तीवर सर्वाधिक नजर खिळलेली आहे, ती म्हणजे उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य. ते दिल्लीहून परतले तेव्हा काहीही न बोलता विमानतळावरून निघून गेले. सध्या त्यांची वक्तव्ये, सोशल मीडिया पोस्ट आणि हालचालींवर नजर ठेवली जात आहे.

केशवप्रसाद मौर्य यांनी नुकत्याच झालेल्या उत्तर प्रदेश राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत संघटन हे सरकारपेक्षा मोठे आहे, असे म्हटले होते. त्यांच्या या वक्तव्याचा अर्थ राजकीय विश्लेषक काढत आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासोबत त्यांचे फारसे जमत नाही. २०१७ मध्ये योगी मुख्यमंत्री झाल्यापासून, त्यांच्यामधील मतभेद वाढले आहेत.

माझ्या निवासस्थानाचे दरवाजे सदैव खुले आहेत, असे मौर्य यांनी कार्यकारिणीत सांगितल्यावर उत्तर प्रदेशमधील बदलाचा तोही एक संकेत मानला जात आहे. मौर्य यांनी पक्षात आपले स्थान मजबूत केलेले आहे. विशेषतः लोकसभा निवडणुकीनंतर, मौर्य यांनी जी विधाने केली, ती महत्त्वाची ठरली आहेत. उत्तर प्रदेशमध्ये भाजपच्या जागा अनपेक्षितपणे कमी झाल्यानंतर, भाजप त्याची कारणे शोधत आहे. अशावेळी मौर्य याची भूमिका निर्णायक ठरणार आहे.

कौशांबी, प्रतापगड आणि प्रयागराजमध्येही भाजपचा पराभव झाला. कौशांबी जिल्हा हा त्यांचा प्रभावक्षेत्र मानला जातो, पण २०२२ मध्ये तेथील सिराथु विधानसभेतून ते स्वतः पराभूत झाले. इतकेच नाही तर कौशांबीच्या पाचही जागा भाजपला गमवाव्या लागल्या. सपाने तीन तर राजा भैय्या यांच्या जनसत्ता दलाने दोन जागा जिंकल्या. त्यांच्यासाठी हा धक्काच होता. त्यानंतर २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपला प्रतापगड, कौशांबी आणि प्रयागराज या जागा गमवाव्या लागल्या. मौर्य यांचा प्रभाव या तिन्ही जिल्ह्यांत असल्याचे मानले जाते. या निकालांमुळे भाजपला मौर्य आणि कुशवाह यांची मते मिळाली नाहीत. हा मतदार विरोधकांच्या आघाडीच्या बाजूने गेल्याची चर्चा आहे. ओबीसी नेत्यांच्या दुर्लक्षामुळे हा निकाल लागल्याचे मौर्य गटाचे म्हणणे आहे. सध्या घडत असलेल्या घडामोडींमुळे अनेक अंदाज बांधले जात आहेत. त्याचवेळी राजधानी दिल्लीत जेपी नड्डा यांनी मौर्य यांना उत्तर प्रदेश सरकारला अस्वस्थ करणारी वक्तव्ये करू नयेत, असे स्पष्ट शब्दांत सांगितले असल्याची चर्चा आहे. #रा



'मी मोजले नाही, पण मला खूपवेळा याबाबत प्रश्न विचारण्यात आले आहेत. मी यापूर्वीही हे स्पष्ट सांगितलं आहे की ती त्या क्षणी आलेली प्रतिक्रिया होती. 'विराट त्याच्या फ्रँचायझीसाठी खेळत होता आणि मी माझ्या फ्रँचायझीसाठी खेळत होतो. जेव्हा बाब संघाबाबत असते, मग ते देशाचा असो किंवा फ्रँचायझीचा मी माझे सर्वस्व पणाला लावतो. शेवटी आपण सर्वच खेळाडू आहोत.' 'यातील काहीच वैयक्तिक नव्हते आणि सर्व गोष्टी आता संपल्यात. आजकाल सोशल मिडिया अशी गोष्ट आहे, त्यावर हे तोपर्यंत चालत राहते, जोपर्यंत काही मसाला मिळत नाही. वनडे वर्ल्ड कपवेळीच सर्वकाही संपले होते.'

— नवीन-उल-हक

Nippon india Mutual Fund
Wealth sets you free

Mutual Fund Investor Awareness Program

To increase awareness about Mutual Funds, we conduct Investor Awareness Programmes (IAPs) across the country. Schedule of upcoming IAP is as mentioned below:

| Date | Time | Location |
| --- | --- | --- |
| 19th July, 2024 | 04:00 pm | Pune |

Venue: The Central Park Hotel, Bund Garden Road, Nr Council Hall Pune - 411001.
Name: Aditya Sharma | Mob. No.: 9370413808
Nippon Life India Asset Management Limited | CIN : L65910MH1995PLC220793
Good gets better
Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

## पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय कुस्तीपटू चमकतील...

# हे 6 कुस्तीपटू पदकासाठी धडपडतील

**नवी दिल्ली : पॅरिस ऑलिम्पिक २०२४ सुरू होण्यास फार दिवस उरलेले नाहीत. पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलै ते ११ ऑगस्ट दरम्यान खेळवले जाणार आहे. पदक मिळविण्याची जबाबदारीही पॅरिसमधील भारतीय कुस्तीपटूंवर असेल. पाहिल्यास, हॉकीनंतर (एकूण १२ पदके) भारताने ऑलिम्पिकमध्ये कुस्तीमध्ये सर्वाधिक पदके जिंकली आहेत. आतापर्यंत भारताने कुस्तीमध्ये दोन रौप्य आणि पाच कांस्यांसह एकूण ७ पदके जिंकली आहेत. टोकियो ऑलिम्पिक २०२० मध्ये भारताला कुस्तीमध्ये दोन पदके मिळाली आहेत. त्यानंतर रवी कुमार दहियाने रौप्यपदक तर बजरंग पुनियाने कांस्यपदक पटकावले.**


**कुस्तीमध्ये भारताचे आतापर्यंत पदक विजेते**



● **केडी जाधव :** कांस्य पदक, हेलसिंकी ऑलिंपिक (१९५२)



● **योगेश्वर दत्त :** रिपेचेजमध्ये हरियाणाच्या कुस्तीपटूची बाजी
● कांस्य पदक: लंडन ऑलिंपिक (२०१२)



● **रवि कुमार दहिया :**
● रौप्य पदक: टोकियो ऑलिम्पिक (२०२०)



● **सुशील कुमार :** कांस्य पदक, बीजिंग ऑलिम्पिक (२००८)
● रौप्य पदक: लंडन ऑलिम्पिक (२०१२)



● **साक्षी मलिक :**
● कांस्य पदक: रिओ ऑलिम्पिक (२०१६)



● **बजरंग पुनिया :** कांस्य पदक: टोकियो ऑलिम्पिक (२०२०)

### अंतिम आणि अमन यांना प्राधान्य मिळाले आहे

● यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहा भारतीय कुस्तीपटू आपली ताकद दाखवतील. हे सर्वजण आपापल्या वजनी गटात पदकाचे दावेदार आहेत, पण नंतरचे पंघल आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चांगली कामगिरी करणारे अमन सेहरावत हे पदकाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. ५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या ऑलिम्पिक कुस्ती स्पर्धेसाठी अनहल्ट पंघल (महिला फ्रीस्टाइल ५३ किलो) आणि अमन सेहरावत (पुरुष फ्रीस्टाइल ५७ किलो) यांना आपापल्या वजन गटात चौथे आणि सहावे मानांकन मिळाले आहे. त्यामुळे या दोघांना सुरुवातीच्या लढतींमध्ये खडतर प्रतिस्पर्धी टाळण्यास मदत होईल.

● या पसंतीमुळे पदक फेरीपूर्वी अंतिम फेरीत जपानच्या अकारी फुजिनामी आणि चीनच्या कियान्यु पांग यांच्याशी सामना करावा लागणार नाही. फुजिनामी दोन वेळा विश्वविजेता आहे.



## श्रीमठ पोलुरी, विवान, आरव काळे, प्रथमेश यांना विजेतेपद

**पुणे :** जेकेज एक्सलंस चेस अकादमी व कल्याण तालुका बुद्धिबळ संस्था यांच्या वतीने आयोजित पहिल्या विविध वयोगटातील रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत श्रीमठ पोलुरी, विवान चिटणीस, आरव काळे, प्रथमेश शेरला यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले. त्रिबेका हायस्ट्रीट, एनआयबीएम पोस्ट ऑफिस रोड, कोंढवा या ठिकाणी सुरू असलेल्या या स्पर्धेत अ मध्ये ८ वर्षाखालील गटात सहाव्या फेरीत श्रीमठ पोलुरीने ऋत्वी हरपुडेचा पराभव करून ६ गुणांसह विजेतेपद पटकावले. १० वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत विवान चिटणीसने मीत लाढेचा पराभव करून ५ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. १२ वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत आरव काळेने शाश्वत गुप्तावर विजय मिळवत ४.५ गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. १४ वर्षाखालील गटात पाचव्या फेरीत प्रथमेश शेरलाने राकेश माथीयाझगनला नमवून ५ गुणांसह विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्यांना रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली.

## पुण्याच्या भूषण ढेरेला सुवर्णपदकाचा मान

**पुणे :** महाराष्ट्र रायफल संघटना आणि पुणे शूटिंग स्पोर्ट्स संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या २७ व्या कॅप्टन एस. जे. इजिकल स्मृती महाराष्ट्र राज्य शूटिंग अजिंक्यपद शॉटगन शूटिंग स्पर्धेत पुण्याच्या भूषण ढेरेने सुवर्णपदक संपादिले. म्हाळुंगे, बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडानगरीत झालेल्या या स्पर्धेत पुरुषांच्या वरिष्ठ गटात शॉटगन ट्रॅपमधे पुण्याच्या भूषण ढेरेने ३७ गुण मिळवून सुवर्णपदक पटकावले. रायगडच्या मोसा काझीने (३४ गुण) द्वितीय, सोलापुरच्या जाडेन मोंडोचाने ३४ गुणासह तिसरा तर पुण्याच्या स्वप्नील पठारेने ३४ गुण मिळवून चौथा क्रमांक मिळविला. या कामगिरीच्या जोरावर भूषण ढेरेची पतियाळा येथे होणाऱ्या इंडिया ओपन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याआधी गोवा येथे झालेल्या राज्य स्पर्धेत भूषण ढेरेने शॉटगन ट्रॅप (३६ गुण) आणि डबल ट्रॅप (२८ गुण) या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदक मिळविले होते. ३५ वषीय विजेता भूषण ढेरे कोल्हापूर येथील जेबीके फाउंडेशनचे प्रशिक्षक तेजस कुसाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यात म्हाळुंगे, बालेवाडी येथे सराव करत आहे.

## अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त एक दिवसीय जलद बुद्धिबळ स्पर्धा

**पुणे :** नाना काटे सोशल फाऊंडेशन आणि विश्व विजय चेस अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त २१ जुलै रोजी एकदिवसीय जलद बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. पुणे जिल्हा चेस सर्कल यांच्या मान्यतेने ही स्पर्धा होत आहे. वाकड येथील युरो स्कूल सीबीएससी,भुमकर चौक या ठिकाणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अंडर ७, ९, ११, १३, १५ या विविध वयोगटासह ओपन व सीनियर सिटीझन या गटात खेळवण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी एकूण ५५ हजार रुपयांची रोख पारितोषिके विजेत्या स्पर्धकांना देण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी विश्व विजय चेस अकॅडमी चे मुख्य संयोजक मिलिंद नाईक (९९७०१८७४८९),चिन्मय नाईक (९७६२८८४९०६) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.



## चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये खेळण्याची वॉर्नरची ऑफर नाकारली

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**नवी दिल्ली :** २०२५ मध्ये पाकिस्तानमध्ये होणाऱ्या एकदिवसीय चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियन संघात डेव्हिड वॉर्नरच्या नावाचा विचार केला जाणार नाही. वॉर्नरने एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले होते की, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतरही, क्रिकेट ऑस्ट्रेलियाची इच्छा असल्यास तो पाकिस्तानमध्ये एकदिवसीय चॅम्पियन्स ट्रॉफी खेळू शकतो.

ऑस्ट्रेलियाचे राष्ट्रीय निवडकर्ते जॉर्ज बेली म्हणाले की, डेव्हिड निवृत्त झाला आहे आणि तिन्ही फॉरमॅटमध्ये त्याने ज्याप्रकारे कारकीर्द घडवली त्याचे कौतुक करायला हवे. तो पाकिस्तानात राहणार नाही अशी आमची रणनीती आहे. वॉर्नरने टी-२० विश्वचषकानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. गेल्या वर्षी एकदिवसीय विश्वचषक जिंकल्यानंतर या फॉरमॅटमधील आपली कारकीर्द संपुष्टात आल्याचे त्याने जानेवारीमध्ये म्हटले होते. वॉर्नरने यापूर्वीच कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती.

जॉर्ज बेलीने वॉर्नरच्या पुनरागमनाच्या संदर्भात सांगितले की तो कधी विनोद करतो हे तुम्ही सांगू शकत नाही. त्याची एक आश्चर्यकारक कारकीर्द आहे, जी साजरी करणे कठीण आहे. मला वाटते की जसजसा वेळ जाईल तसतसे आम्ही ऑस्ट्रेलियन क्रिकेटमधील त्याच्या योगदानावर विचार करत राहू.

## पॅरिसमध्ये उभं राहणार 'India House'; भारताला प्रथमच मिळाला मान

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** भारताचा ११७ खेळाडूंचा चमू पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत पदाकांसाठी मैदानावर उतरणार आहे. २६ जुलैपासून सुरू होणारी ही ऑलिम्पिक स्पर्धा भारतासाठी आणखी एका गोष्टीमुळे खास असणार आहे. ते म्हणजे भारतीयांचे हक्काचे 'India House'!

'इंडिया हाऊस' ही भारतासोबतच देशाची गेल्या काही वर्षांतील उत्क्रांती आणि विकास जगाला दाखवण्याची संधी असेल. कंट्री बेस हाऊसची संकल्पना पहिल्यांदा १९९२ मध्ये बार्सिलोना ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये सुरू झाली. जेथे डच ऑलिम्पिक समितीने प्रथमच एक हाऊस स्थापन केले. या हाऊसचा उद्देश पूर्वी देशातील क्रीडापटूंसाठी भेटीचे ठिकाण म्हणून काम करायचे होते, परंतु ते आता बरेच मोठे आणि महत्त्वाचे झाले आहे. हाऊसेस आता स्थानिक तसेच भेट देणाऱ्या चाहत्यांसाठी ऑलिम्पिकमधील सर्वात मोठे आकर्षण आहे.



ऑक्टोबर २०२३ मध्ये भारतात IOC चे सत्र आयोजित करण्यात आले आणि ४० वर्षांच्या कालावधीनंतर देशाला हा मान मिळाला. 'इंडिया हाऊस' हे रिलायन्स फाऊंडेशन आणि इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन (IOA) यांच्या दीर्घकालीन भागीदारीच्या महत्त्वाकांक्षेखाली येते.

ऑलिम्पिक खेळांचे कोनशिला वैशिष्ट्य, ऑलिम्पिक हॉस्पिटॅलिटी हे सहभागी देशांना त्यांची संस्कृती, आदरातिथ्य आणि राष्ट्रीय अभिमान हे खेळाडू, पाहुणे आणि समर्थकांना दाखवण्यासाठी व्यासपीठ म्हणून काम करतात. स्पर्धेदरम्यान खेळाडू व त्यांच्या कुटुंबियांना आपण आपल्या देशात असल्यासारखे वाटणार आहे.

'ऑलिम्पिक हाऊस' प्रत्येक देशाच्या चाहत्यांसाठी स्पर्धेदरम्यान "वॉच-पार्टी" व सेलिब्रेशनसाठी एकत्र येण्याचे ठिकाण आहे.

## कोहली-बुमराहला विश्रांती मिळू शकते; २७ जुलैपासून दौरा सुरू होणार

# रोहित शर्मा श्रीलंकेविरुद्धच्या वन-डेचे नेतृत्व करेल

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा श्रीलंकेविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार आहे. याआधी अनेक रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला होता की, रोहित सहा महिने सतत क्रिकेट खेळल्यामुळे श्रीलंकेतील वनडे मालिकेत खेळणार नाही.

हिंदुस्तान टाईम्सने आपल्या वृत्तात पुष्टी केली आहे की, श्रीलंकेतील वनडे मालिकेत रोहित शर्मा टीम इंडियाचा कर्णधार असेल.



टी-२० मालिकेतील पहिला सामना २७ जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता पल्लेकेले येथे खेळवला जाईल. कोलंबोमध्ये २ ऑगस्टपासून वनडे मालिकेला सुरुवात होणार आहे. सध्या या दौऱ्यासाठी दोन्ही संघांची घोषणा झालेली नाही.

बीसीसीआय गत महिन्यात श्रीलंका दौऱ्यातून टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या भारतीय संघातील वरिष्ठ खेळाडू विराट कोहली आणि जसप्रीत बुमराह यांना विश्रांती देऊ शकते.

भारतीय संघाने नुकतीच झिम्बाब्वेविरुद्ध ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळली. या दौऱ्यासाठी निवडकर्त्यांनी शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली युवा संघ पाठवला होता. टीम इंडियाने मालिका ४-१ ने जिंकली.

गौतम गंभीर २ दिवसांपूर्वी टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक झाला होता. भारतीय प्रशिक्षक म्हणून गंभीरची ही पहिलीच नियुक्ती असेल. ४२ वर्षीय गंभीरने 'द वॉल' या नावाने प्रसिद्ध असलेल्या राहुल द्रविडची जागा घेतली आहे. टी-२० विश्वचषकानंतर द्रविडचा कार्यकाळ संपला. गंभीरचा कार्यकाळ जुलै २०२७ पर्यंत असेल.

## मुंबई उपनगर पुर्वच्या आकाश रुडले याची अष्टपैलू खेळी

# पुरुषांच्या नंदुरबार, पुणे शहर, पुणे ग्रामीण उपांत्य फेरीत दाखल

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बाणेर येथील बाबुराव चांदेरे सोशल फाउंडेशन व पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यांच्या संयुक्तविद्यमाने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, बाणेर, येथे ७१ व्या महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला गटाच्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी 'सतेज करंडक' स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी पुरुषांच्या पहिल्या झालेल्या उपांत्य पुर्व फेरीच्या सामन्यात नंदुरबार संघाने कोल्हापूर संघावर ३१-२४ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला नंदुरबार व कोल्हापूर ११-११ अशा समान गुणांवर होते. मध्यंतरानंतर नंदुरबारच्या वरुण खंडाळे यांने चौफेर आक्रमण करीत विजय मिळविला. त्याला दिपक शिंदे व जय महाजन यांनी पकडी घेत सुरेख साथ दिली. कोल्हापूरच्या ओंकार पाटील याने आक्रमक खेळ केला. तर दादासो पुजारी याने पकडी घेतल्या.



उपांत्य पुर्व फेरीच्या दुसऱ्या सामन्यात पुणे शहर संघाने तुल्यबळ पालघर संघावर ६०-४४ अशी मात करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मध्यंतराला पुणे शहर संघाकडे३०-२१ अशी आघाडी होती. पुणे शहर संघाच्या तेजस पाटील, शुभम शेळके व सुनिल दुबिले यांनी चौफेर हल्ला करीत पालघरचा बचाव भेदत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर गुंडू मोरेय याने चांगल्या पकडी केल्या. पालघरच्या प्रतिक जाधव व राहुल सवर या खेळाडूंनी चांगला खेळ केला. तर प्रेम मंडल यांने पकडी घेतल्या.

उपांत्य पुर्व फेरीच्या अत्यंत अटितटीच्या तिसऱ्या सामन्यात पुणे ग्रामीण संघाने मुंबई उपनगर पुर्व संघावर ३७- ३३ अशी मात केली. मध्यंतराला पुणे ग्रामीण संघ ९-१८ असा पिछाडीवर होता. मात्र पुणे ग्रामीण संघाच्या अजित चौहान, तेजस काळभोर, अक्षय सुर्यवंशी यांनी मध्यंतरानंतर जबरदस्त आक्रमक खेळ करीत आपल्या संघाला विजय मिळवून दिला. तर ऋषिकेश भोजने व तुषार अधावडे यांने सुरेख पकडी घेत विजयात मोलाचा वाटा उचलला. हा सामना निर्धारित वेळेत २९-२९ अशा समान गुणांवर संपला. त्यामुळे हा सामना पाच- पाच चढायांवर खेळला गेला. पाच पाच चढायांमध्ये पुणे ग्रामीण संघाने ८ गुण मिळविले तर मुंबई उपनगर पुर्व संघाने ४ गुण मिळविले. त्यामुळे अंतिम गुण संख्या पुणे ग्रामीण ३७ व मुंबई उपनगर पुर्व संघाने ३३ गुण मिळविले. मुंबई उपनगर पूर्वचा संघ मध्यंतरापुर्वी आक्रमक खेळ करीत होता. तर त्यांनी बचाव देखील जोरदार केला होता. मात्र मद्यंतरानंतर त्यांचा बचाव ढेपाळला आणि त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. मुंबई उपनगर पुर्वच्या आकाश रुडले याने अष्टपैलू खेळ केला. आर्यवर्धन नवले याने सुरेख चढाया केल्या. तर अरकम शेख, अक्षय बर्डे व अलंकार पाटील यांनी उत्कृष्ठ पकडी घेतल्या.

#रा